# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. १५/१०/२०१५**

आज गुरुवार दि. १५/१०/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०७ दि. ०९/१०/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १२) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १३) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १४) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १७) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १८) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २६) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २७) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २९) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३०) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३२) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३३) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३५) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३६) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३७) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३८) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३९) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४०) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४१) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४२) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४३) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४४) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४५) | संदिप मोहन पाटील | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४७) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४८) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४९) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५०) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५१) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५२) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५३) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५४) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५७) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५८) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५९) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ६०) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६१) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६२) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ६३) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६४) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | सदस्या |
| ६५) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६७) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६८) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६९) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ७०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७२) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७३) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७४) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७५) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७६) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७७) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७८) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७९) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ८०) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ८१) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८२) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८३) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८४) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८५) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८६) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८७) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८८) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८९) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ९०) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ९१) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ९२) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ९३) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ९४) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |
| | **<u>गैरहजर सदस्य –</u>** | |
| १) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| २) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| ३) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |

**<u>रजेचा अर्ज – निरंक</u>**

**नगरसचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी कृपया नाश्ता करुन घ्यावा आणि १५ मिनिटांनी महासभेला सुरुवात होईल. सर्व सन्मा. सदस्यांचे आजच्या विशेष महासभेसाठी हार्दिक स्वागत महापौरांच्या वतीने करतो आणि महापौरांच्या परवानगीने सर्व सन्मा. सदस्यांनी राष्ट्रगीतासाठी जागेवर उभे राहणे.

**मा. महापौर :-**

पहिला विषय घ्या.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा गुरुवार दि. १५/१०/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७, दि. ०९/१०/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम एक मिनिट. विशेष महासभो लावायचे कारण काय मॅडम? तुम्ही कारण सांगा ना. तुम्ही जनरल महासभा लावली नाही. विशेष महासभेचे विषय पण नाही आणि एवढी लांबलचक विषयपत्रिका दिली आहे. तर विशेष महासभेचे कारण काय? तुम्ही काय घाबरता का महासभा लावायला? आमचा तुम्ही हक्क का मारता? आम्ही लक्षवेधी टाकू शकतो, प्रश्नोत्तराचा तास आमचा आहे "ज" चे प्रस्ताव आम्हाला टाकायचे आहेत. तुम्ही हे का टाकु दिले नाही. तुम्ही का विशेष महासभा लावली? आणि या शहरामध्ये असे अनेक महत्वाचे प्रश्न आहेत. आज परिवहन सेवा नाही उत्तन शहराचे लोक अक्षरशः हैराण झाले आहेत. मिरारोडचे लोक हैराण झाले आहेत आणि आज तुम्ही तो विषय घेतला नाही. डेंग्यु मलेरिया तापाच्या साथीने लोक हैराण झाले आहेत. तो पण विषय तुम्ही घेतला नाही असे अनेक विषय आहेत. मॅडम आणि तुम्ही आज विशेष महासभा लावली आहे. याचे कारण काय मॅडम याचे कारण द्या.

**प्रमोद सामंत :-**

विशेष महासभाचे कारण तरी सांगा महापौर मॅडम ६ महिन्यात ही तिसरी विशेष महासभा आहे चौथी आहे.

**मा. महापौर :-**

आपण बसुन जा मी जवाब देते. आपल्या सगळ्यांना कळविताना मला खुप आनंद होतो की, या २४ तारखेला आपले मुख्यमंत्री साहेब आपल्या या मिरा भाईंदरला येणार आहेत. आपली पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन करायला, नविन इमारतीचे आणि आपल्या बसेसचे त्यामुळे ते २४ तारखेला यायच्या आधी आपल्याला सभा लावणे गरजेचे होते. म्हणून मी ही विशेष महासभा लावली आहे.

**जुबेर इनामदार :-**

विशेष महासभेमध्ये पाणी पुरवठ्याचा विषयाचा उल्लेख कुठे आहे. तुम्ही या शहरामध्ये इमारत बांधणार आहे. भव्यदिव्य इमारत बांधायला निघालात विलासराव देशमुख या राज्याचे मुख्यमंत्री त्या प्रशासनाने केला होता. विलासराव देशमुख या राज्याचे मुख्यमंत्री होते त्याच्याच आधारावर हा टाऊन प्लान तयार होणार आहे. त्याचा कुठे उल्लेख केला तुम्ही. तुम्ही बाकीचे विषय घेतले आहे.

**मा. महापौर :-**

आपण बसणार.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही जे निवेदन करतात त्या उत्तराला काही अर्थ पाहिजे का नाही.

**मा. महापौर :-**

मी या मंचावरुन आपल्या सगळ्या मा. नगरसेवकांना, नगरसेविकांना येथुन आमंत्रित करते की २४ तारखेला या कार्यक्रमाला ...........................

(सभागृहात गोंधळ)

**हेलन जॉर्जी :-**

सन्मा. महापौर मॅडम, आमच्या उत्तनच्या लोकांना बसेसचा खुप प्रॉब्लेम आहे. शाळा, कॉलेजला जाणाऱ्या मुलांचे किती हाल होतात. मॅडम त्याकडे आधी लक्ष द्या. बसेस कधी येणार आम्हाला व्यवस्थित बसेस कधी भेटणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ये तो साफ खुन है ये देखो पालिकेचा चिन्ह तुमच्या आमदारांनी हिरावुन घेतला आहे. चोरुन घेतला आहे त्याचे उत्तर तुम्ही द्या.

**मा. महापौर :-**

मला वाटते मी उत्तर दिले आहे. आपण सगळ्यांनी आपल्या जागेवर बसुन जा. शर्मिला मॅडम आपल्याला काय बोलायचे आहे बोला.

**शर्मिला बगाजी :-**

महापौर मॅडम, आता जो विषय झाला परिवहन बद्दल त्यावरच मला बोलायचे आहे. प्रशासनाला प्रश्न विचारायचे आहे तर संबंधित अधिकाऱ्यांना बोलावले तर बरे होईल. परिवहनशी संबंधित अधिकाऱ्यांशी बोलायची परवानगी द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विशेष महासभेचे कारण द्या.

**मा. महापौर :-**

शर्मिलाजी आपल्याला परिवहन बद्दल काही बोलायचे आहे का?

**शर्मिला बगाजी :-**

परिवहन बद्दल बोलायचे आहे आयुक्त साहेबांना काही प्रश्न विचारायचे आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विशेष महासभा का लावली याचे उत्तर दिलेच पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आपण सगळ्यांनी जागेवर बसुन घ्या. पहिला विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**वंदना चक्रे :-**

मनमानी कारभार करु नये ही विनंती आहे. उपमहापौर तुम्ही गप्प का?

**दिपिका अरोरा :-**

महापौर मॅडम, तुम्ही सभेला सुरुवात करा असा आमचा आग्रह आहे. कारण विकास कामामध्ये त्यांना दिलचस्पी नसेल.

**अनिल भोसले :-**

विरोधी पक्षाच्या सदस्यांनी बसुन घ्यावे अशी मी विनंती करतो.

**भगवती शर्मा :-**

इथे प्रायव्हेट लिमिटेड कंपनी चालतात तिथे महासभा नाही लोगो उतरुन घ्या.

**जुबेर इनामदार :-**

महापौरांच्या खुर्चीवरही लोगो आहे तो ही काढावा लागेल तुम्हाला अनधिकृत लोगोच्या आर्शिवादाखाली बसलात तुम्ही. ज्वलंत विषय लागतात विशेष महासभेसाठी. शहराला निगडीत विषय फक्त आर्थिक प्रशासकीय मंजुरी फक्त अर्थव्यवस्था इथे चालु आहे. फक्त तुमचे नाही तर राज्याचे मुख्यमंत्री आहेत ते.

**सुहास रकवी :-**

उपमहापौर साहेब तुम्हाला पण विषय माहित नाही तर मान्यता नव्हती द्यायची ना. विशेष महासभा ही रेग्युलर लावायची होती. तुम्ही त्यांना मान्यता द्यायला नव्हती पाहिजे साहेब. त्यांचे मुख्यमंत्री येणार म्हणुन विशेष महासभा. तुम्ही सुध्दा खुलासा करा की ही विशेष आहे की रेग्युलर आहे. उद्या तातडीची लावा विशेष न लावता त्यांना जर खरच विकास कामे करायची असेल.

(सभागृहात गोंधळ)

**मॉरस रॉड्रीक्स :-**

महापौर मॅडम, विशेष महासभा लावायचे कारण काय?

**सुहास रकवी :-**

उपमहापौर साहेब काही तरी निर्णय घ्या.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

विषेश सभा इसलिए बुलायी जाती है जो सब्जेक्ट जरूरी है। २ या ३ यह तो महासभा हो गई।

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

मा. उपमहापौर साहेब उत्तर द्या. मॅडम तो विशेष शब्द काढा महासभा लिहा झाल काम रेग्युलर महासभा लावायची तुम्ही एवढे विषय घेतल्यानंतर..........

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम आम्ही ठराव मांडत आहे. सभा तहकुबीचा ठराव मांडत आहोत मा. महापौर मॅडम ठराव करत आहोत आम्ही आजची बोलावलेली विशेष सभा तहकुब करण्यात यावी आणि तातडीने येणाऱ्या ७ दिवसाच्या कार्यपध्दतीनुसार महासभा बोलवण्यात यावी आणि हे जे विषय तुम्ही विषयपत्रिकेवर घेतलेत विशेष महासभाच्या ते विषय परत महासभामध्ये रेग्युलर मा. महासभेमध्ये सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आजची सभा चालु ठेवावी. मा. महापौर मॅडम १५ मिनिटासाठी ही सभा तहकुब करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**प्रशांत केळुसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

महासभा तहकुबीबाबत दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सन्मा. सदस्य जुबेर इनामदार व ध्रुवकिशोर पाटील यांचा दुसरा ठराव नरेंद्र मेहता यांचा आहे. दुसरा ठराव मतदानास टाकतो सुचक नरेंद्र मेहता व अनुमोदन प्रशांत केळुसकर यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधातअसतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक जुबेर इनामदार व अनुमोदक ध्रुवकिशोर पाटील यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत तटस्थ कोणी.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ४१ विरोधात ३८ इतकी मते पडली आहेत. श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**सभा तहकुबी ठराव क्र. ६० :-**

आजची मा. विशेष महासभा १५ मिनिटांकरीता तहकुब करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन एन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | भानुशाली वर्षा गिरीधर | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | मीरादेवी रामलाल यादव | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | कोठारी सुमन रमेश | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | डॉ. नयना मनोज वसाणी | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | सिमा कमलेश शहा | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | जैन गिता भरत | ११ | शबनम लियाकत शेख | |
| १२ | अरोरा दिपिका पंकज | १२ | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | |
| १३ | रावल भगवती जयशंकर | १३ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १४ | मेहता डिंपल विनोद | १४ | पाटील सुनिता कैलास | |
| १५ | मेघना दिपक रावल | १५ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १६ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १६ | पुजारी कांचना शेखर | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १७ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १८ | सुजाता रविकांत शिंदे | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | पाटील प्रेमनाथ गजानन | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | सिंग मदन उदितनारायण | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | कांगणे यशवंत ठकाजी | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | अनिल बाबुराव भोसले | २२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २३ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २३ | इनामदार जुबेर | |
| २४ | जैन दिनेश तेजराज | २४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २५ | जैन रमेश धरमचंद | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | डॉ. राजेंद्र जैन | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | म्हात्रे प्रभाकर प्रद्‌माकर | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| २८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २९ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | ३० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३१ | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३१ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | |
| ३२ | शाह राकेश रतिशचंद्र | ३२ | डॉ. आसिफ शेख | |
| ३३ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३३ | लियाकत शेख | |
| ३४ | केळुसकर प्रशांत नारायण | ३४ | नरेश तुकाराम पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | भोईर भावना राजू | ३५ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३६ | भोईर राजू यशवंत | ३६ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३७ | जाधव मोहन महादेव | ३७ | वंदना मंगेश पाटील | |
| ३८ | मुन्ना सिंग | ३८ | अशोक तिवारी | |
| ३९ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४० | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम आज आपण विशेष महासभा घेवून काही विषय घेतले या बद्दल या सभागृहामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सदस्यांनी त्यांच्या भावना मांडल्या आपण १५ मिनिट सभा तहकूबीचा ठराव केला सत्ताधारी पक्षाचे बहुमत असल्याने तो ठराव मंजुर झाला. एकंदरीत मला या सभागृहाला विनंती करायची आहे. मा.महापौर मॅडम आयुक्त साहेब मिरा भाईदर शहरामध्ये मुख्यमंत्री येत आहेत त्याचे आपल्या सगळयांना आनंद आहे.आणि आनंद यासाठी आहे की मुख्यमंत्री येतात म्हणून येऊन जातील अस नाही मुख्यमंत्री ह्या शहराला दिशा देण्याच्या दृष्टीने नागरिकांच्या ज्या विविध गरजा आहेत त्याला खरच मृतस्वरुप देण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री या शहरात येत आहेत. आमदारांनी विनंती केली मा. महापौरानी विनंती केली त्यानुसार मुख्यमंत्र्यानी त्याला मान्यता दिली. जो कार्यक्रम आहे तो आपल्या शहरासाठी मिळालेल्या ७५ एम.एल.डी पाणी योजना त्या योजनेचे उद्घाटन करायचे आहे. आपल्या शहराचे आता जे सभागृह आहे. शहराची वाढती लोकसंख्या नगरसेवकांची वाढती लोकसंख्या या दृष्टीकोनातून प्रशासकीय इमारत भव्य सर्व सुविधानिशी आणि त्या पेक्षाही अन्य ज्या महानगरपालिका पेक्षाही आपली महानगरपालिका इमारत प्रशासकीय इमारत वेगळी असावी प्रशासकीय इमारतीचे भुमिपूजन करायचे आहे आणि मगाशी जस म्हटल गेल की काही ज्वलंत विषय आहेत ते खर आहे. या शहरामध्ये अनेक ज्वलंत विषय आहेत त्या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे. त्यातीलच जो प्रवासी बसची जी सर्विस आहे मी सभागृहाला माहिती देतो. आणि जे खर आहे ते गटनेत्यांचे पण काम आहे. की जे जे काही घडतेय की जे कागदावर येतय त्याचे आपण साक्षीदार असतो. आयुक्तांच्या केबीन मध्ये आयुक्तांनी बोलवून मा. महापौरानी आणि सगळयासाठी चर्चा केली की तो ठेकेदार बस चालवू शकत नाही मग आपण पर्यायी व्यवस्था करायची. पर्यायी व्यवस्था काय करायची तर मा. आयुक्तांच्या सहीने आपण महाराष्ट्र परिवहन मंडळाला पत्र दिले की आमची योजना सूरु होईपर्यत तुम्ही जे काही बसेस जे काही रूट चालवता येईल ते चालवावे त्याचबरोबर आपण बेस्ट प्रशासनाला पत्र दिले की आमची जी परिवहन योजना आहे ती विस्कळीत झाली आहे. लोकामध्ये असंतोष आहे. आणि त्यामुळे आपण काही रुट चालू करावे असे आपण पत्र दिलेले आहे आपले प्रयत्न चालू आहे त्याच्यातच आनंदाची बातमी म्हणून की जे आपल्या बसेस यायच्या होत्या अस म्हणतात यायच्या होत्या अशी अनेकांनी आश्वासने दिली. अनेकांनी आश्वासने जरी दिलेली असली तर हा टिका टिप्पणीचा विषय नाही जे आहे ते सत्य आहे की, त्या बसेस येणार आहेत. त्या बसेसचे ही मुख्यमंत्री येतील ते उद्घाटन करतील त्यामुळे त्याच्यातून या शहरासाठी आवश्यक असलेली ट्रान्सपोर्ट सुविधा आहे ती मुख्यमंत्र्याच्या हस्ते त्याचेही उद्घाटन होईल. त्याचबरोबर या तिनही अगदी जिव्हाळयाच्या आपण अस म्हणतो की आपण प्रयत्न करतो कोणाच्या प्रयत्नाने काही याच्यात कुणाचा प्रयत्न नाही या सभागृहाच्या प्रयत्नाने अस मी मान्य करतो.या सभागृहाच्या प्रयत्नाने या शहरातले जे नागरिक आहेत मग काही कारखानदार असतील व्यापारी असतील डॉक्टर असतील वकील असतील आणखी ज्याला म्हणतो की आपण या शहराच्या विकासासाठी चिंता चिंतन करणारी जी लोक आहेत त्या सगळयांचा आपल्याला सहकार्य पाहिजे मुख्यमंत्री येतील अत्यंत नीटनेटका मुख्यमंत्र्याचे कार्यक्रम रोजच होतात पण काही कार्यक्रम त्याच्या नजरेत राहतात. सगळयाच्या माहितीसाठी सांगतो की आपण जो प्रयत्न केलेला आहे तो मुख्यमंत्री जेव्हा येतील त्यावेळी त्यांना आपण अस विनंती करू त्याच्याकडून अखेर पैसा त्यांच्याकडूनच घ्यायचा आहे. त्यावेळी तुमच आमच एक मत असणे गरजेच आहे तो पैसा शहराच्या विकासासाठी आहे. एखादया कोणा व्यक्तिसाठी नाही यासाठी प्रसन्न होऊन मुख्यमंत्र्यांनी मिरा भाईदरच्या महानगरपालिकेच्या कार्यक्रमाला गेलो होतो पुन्हा एकदा सांगतो भारतीय जनता पार्टीच्या कार्यक्रमाला नाहीए युतीच्या कार्यक्रमाला नाहीए मिरा भाईदर महानगरपालिकेच्या हद्दीतील किंवा या आपल्याबद्दल चिंता व्यक्त करणारे आपल्या परिसरातले जसे मुंबईतील असतील ठाणेतील असतील किंवा विरार महानगरपालिका हद्दीतील असतील हे जे आपले लोक आहेत हितचिंतक त्यांनी तो कार्यक्रम अत्यंत सन्मानाने आदराने समजुतीने शिस्तीने पार पाडला अस या विषयावर हा विषय पुरा करावा अशी माझी विनंती आहे. सभागृहाला दोन्ही पक्षांना सभागृहाच्या सन्मा सदस्यांनी त्याला साथ दयावी आणि पुढचे कामकाज चालवावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**शर्मिला बगाजी :-**

आता जे निवेदन केले काकानी चागलच होत की मुख्यमंत्री आपल्या शहरात येतात त्या बद्दल मा. महापौर मॅडम, मा. आमदार साहेबांचे धन्यवाद. कारण मुख्यमंत्री येणार म्हणजे चांगली योजना घेऊनच येतील

हे नक्की आहे. पण आज परिवहन सेवेबद्दल आज विशेष महासभा होती त्याच्यामध्ये जरा हंगामा झाला की, महत्त्वाचा विषय असताना देखील आपण तो घेतला नाही. परंतू चर्चा करायला दिली तर खुपच चांगले होईल. आता काकांनी जे निवेदन दिले की परिवहन जे आपले इमारतीचे भूमिपूजनासाठी मुख्यमंत्री येणार आहे की, नविन बस सेवा किती बसेस येणार आहे. की, नविन बस सेवा किती बसेस येणार आहे. त्या उद्‌घाटनासाठी किंवा त्या दिवसापासून चालू होणर आहेत का याच जरा क्लेरिफिकेशन द्या. संबंधित अधिका-यांशी पण बोलायच होत आता पुढारीमध्ये मा. आयुक्तसाहेबांनी जेव्हा मिटिंग झाली गटनेत्यांची तेव्हा सांगितले की एस.टी. आणि बी.ई.एस.टी साठी आपण मागणी केली आहे. समजा जर आपल्याकडे १०० बसेस किंवा किती बसेस आपल्याकडे रेडी असेल आणि एस.टी. महामंडळ किंवा यांच्याकडें मागणी केलेली असेल आपण कारण ते दोन तीन महिण्यासाठी आपल्याबरोबर करार करणार नाही किंवा त्यांची सेवा चालु झाल्यानंतर ते मध्येच आपल्याला थांबवून आपली सेवा चालू करू देतील का? कि त्या पण धावतील या पण धावतील अस आहे का? एवढा परिवहनचा गोंधळ दोन वर्षापासून चालु असताना आधीपासून का केल नाही आपण ही सेवा एस.टी. बी.ई.एस.टी सेवेसाठी आपण का मागणी केली कारण आमच्या उत्तन प्रवासी संघटनेने प्रत्येक वेळेला आपल्याकडे मागणी केलेली होती तरी कधी दाद न लावता आत्ता जेव्हा आपल्याकडे बसेस रेडी आहेत ट्रक टर्मिनल रेडी आहेत डेपो रेडी आहे आणि आज तुम्ही निवेदन करताय की एस.टी. आणि बी.ई.एस.टी साठी साकडं घालणार आपण त्यांच्याकडे मग याच्यामध्ये दुभाव दिसत आहे तर त्याच्याबद्दल आपण जरा निवेदन करावे की काय खर आहे काय सत्य आहे आणि काय असत्य आहे.

**जुबेर इनामदार :-**

धन्यवाद, मा. महापौर मॅडम २४ तारखेला सभागृह नेत्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे शहरात २४ तारखेला या राज्याचे मा. मुख्यमंत्री फडणवीस साहेब येणार आहेत त्याच आगमण होणार आहे.त्याच स्वागत आहे कारण मुख्यमंत्री हा एक पक्षाचा मुख्यमंत्री नसतो तो राज्याचा मुख्यमंत्री असतो आम्हालाही त्याचा स्वाभिमान आहे आणि त्यांनी वारंवार यावे मुख्यमंत्र्यानी या शहरासाठी व्ही.आय.पी. मोमेन्ट घालवला तर हे शहर स्वच्छ रस्ते व्यवस्थित लॉ इन ऑर्डर हा सगळा जो प्रकार आहे तो सुटसुटीत असतो. त्यांनी वारंवार या शहरामध्ये यावे त्याचे स्वागत आहे काय कारणाला येतात ते एक महत्वाचे आहे त्याच्यामागे प्रशासकीय इमारत हा २०१० मध्ये माझ्याकडे आता जी.आर नाही २०१०-१२ मध्ये कॉंग्रेसची सत्ता असताना एक योजना त्या क्षेत्रफळामध्ये प्रशासकीय इमारत तयार करायची असेल तर तिथल्या विकासकर्त्यानी ती इमारत ३० टक्के त्याच्या भूखंडाच्या ३० टक्के प्रमाणे त्यांनी ती इमारत पालिकेला बांधुन दयायची चांगली गोष्ट आहे पण त्याची माहिती कोणाकडे आहे. मुख्यमंत्री येणार त्याच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे आयुक्त महोदय हा प्रशासनाचा विषय आहे कमीत कमी गटनेत्यांना तरी बोलवून या विषयाची माहिती दिली पाहिजे की आपण अशाप्रकारे प्रशासकीय इमारत तयार करायला घेत आहोत त्या इमारतीची आपली काय तयारी आहे आपली वास्तू आपण त्याच्यमध्ये कशी बसवीली बाकीचे प्लान्स किती आपल्याला क्षेत्रफळ मिळणार, काय करणार आम्हाला माहिती पाहिजे आमचा विरोध नाही चांगल्या कामाला राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस कुठलाही पक्ष या शहराचा चांगल्या कामाला कधीच विरोध करत नाही. मात्र येणा-या मुख्यमंत्र्याची नामुष्की होता कामा नये. पाणी पुरवठा योजनेचे उद्‌घाटन समारंभासाठी आपल्याकडे आपली तयारी आहे का? कुठल्याही विषयाला करण्यासाठी त्याची मंजूरी असावी. पाणी पुरवठा विभागाच्या त्या योजनेसाठी मंजुरी प्राप्त झालेल्या आहेत का? वन विभागाच्या मंजूरी प्राप्त झाले आहे का एम.आय.डी.सी. बरोबर ॲग्रीमेंट झाले आहे का? कुठलीही परवानगी उपलब्ध नाही. बससेवा सुरू करणार डेपो आपण तयार केला का ते कर्तव्य आहे. आपल्याला साहेब त्या दिवशी गटनेत्याच्या मिटिंगमध्ये आम्हाला माहिती दिली जी.सी.सी. प्रणाली पध्दत वापरून त्याची टेंडर निविदा प्रक्रिया करायची बाकी आहे,ठेकेदार नेमायचा बाकी आहे. बसेस येणार उभ्या राहणार त्याच्या फिती कापणार परत या बसेस या चोरांना देणार का ५२ बसेस आपण ह्यांना दिल्या त्या ५२ चे १५ करून त्यांनी आपल्या हातामध्ये दिले १० वर्षाचा करारनामा होता ५ वर्षामध्ये आपला सत्यानाश करून त्यांनी दिला पालिकेचा मोठा आर्थिक नुकसान करून दिला त्या माणसाने आर्बिटेशनमध्ये विषय आहे त्यांनी ४० कोटी रूपयाचा आपल्याकडे मागणी केलेली आहे आपण त्याच्यावरती ४५ कोटीचे केले आहे. साहेब अशा परिस्थितीमध्ये मुख्यमंत्री येत आहेत त्यांना तशी माहिती दिली का आमच्याकडे असा विषय झाला आहे तुम्ही येणार आणि त्या बसेसच्या फिती कापणार ते आमचेही मुख्यमंत्री आहेत आम्हालाही वाईट वाटेल म्हणून अस काही करायच असेल तर त्याच्याआधी व्यवस्थित शासनाने आणि प्रशासनाने सभागृहाला त्याची माहिती दयावी की त्याची या विषयावर काय तयारी आहे सत्ताधा-यांनी हा विषय आणला मान्य आहे त्यांनी आपली मुख्यमंत्री बोलवले पण ते त्यांचेच मुख्यमंत्री नाहीत ते राज्याचे मुख्यमुत्री असणार आहे अशाप्रकारे काही झाल्यानंतर या शहरासाठी चांगले नाही की या शहरातले असेच आहे माझी फसवणूक करतात मी काही देणार नाही याच्यानंतर यांना अस व्हायला नको म्हणून मी मा. आयुक्त महोदयांना विनंती करेल की या विषयाचे त्यांनी निवेदन करावे की सत्य परिस्थिती काय? त्यांची भूमिका काय असणार प्रशासनाची त्यांची काय तयारी आहे. ते करु शकतात का? एका इमारतीमध्ये आपल्याला कुठल्याही मुख्यमंत्र्याला बोलायचे असेल त्या इमारतीला ओ.सी. नसेल तर मुख्यमंत्री येत नाही त्याचा प्रोटोकॉल आहे हा प्रोटोकॉल त्यांना लागु राहील का किंवा त्यांना ही माहिती पुरविली का? ते महत्वाचे आहे त्यांना यायचं असेल प्रोटोकॉल बंद करुन यायच असेल त्यांनी याव त्यांचे स्वतंत्र निर्णय असेल मात्र प्रशासनाने आपली भुमिका बजावली का? ते महत्वाचे आहे साहेब म्हणून मी आपल्याला विनंती करील की या विषयावर तुम्ही आपले निवेदन करावे. धन्यवाद.

**सुरेश खंडेलवाल :-**

ज्यादा नही बोलुंगा सिर्फ दो मिनिट क्योंकी मेरी सारी बाते जुबेर साहबने पुरी कर दी। कमिशनर साहब जैसे की उन्होंने कहाँ की प्रशासकीय जो इमारत है कमिशनर साहब वैसे तो इसके बारे में थोडी जानकारी सभागृह को देंगे ही मुझे उम्मीद है यह तिनों विषय पे थोडी जानकारी सभागृह भी चाहेगा की मुख्यमंत्री आ रहे है। क्या-क्या होनेवाला है शहर में हम सभी को जानकारी थी बहुत जादा अभिलाषा है लेकिन कमिशनर साहब मैं यह भी आपसे जानना चाहूँगा की यह जो प्रशासकीय इमारत जिस प्लॉट के उपर यह जो बिल्डींग आनेवाली है मुझे जहाँ तक याद है मार्च की सभा में ज के प्रस्ताव के अंदर उसके उपर एक रिर्झव्हेशन का ठराव हुआ था। आज जैसा की वो ठराव विखंडित के लिए गया है। विखंडित होके आया नही आया कुछ मालुम नही जानकारी लेकीन जैसे की अभी हमारे जुबेर इनामदार साहबने कहा की तीनो योजनाओकी प्रशासन की तरफसे क्या भुमिका है क्या उसकी पुरी तयारी है। यह पुरे सभागृह को आप जरा विशेष में बताऐंगे तो जादा आसानी होगी हमे समझने में।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम और मा. आयुक्त साहब या नवीन प्रशासकीय भवनच्या उद्‌घाटनाकरीता मा. मुख्यमंत्री येणार आहेत ज्या प्रशासकीय भवनामध्ये जे नगरसेवक बसणार आहेत त्यांना याची कल्पनाच नाही ते प्रशासकीय भवन कस बनणार आहे त्याच्यामध्ये किती सिटींग कॅपेसिटी नगरसेवकांसाठी असणार आहे त्याच्यामध्ये आपले कार्यालय कस असणार आहे तुम्ही आत्ताच तुमच्या कॅबीनला एक करोडचा खर्च केला आणि या प्रशासकीय इमारतीला खर्च करणार इथे महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडला आहे आणि आत्ताच तुम्ही विषय घेतला की आपण सहायता निधी बरोबर ना मग तुम्ही ते पैसे तिथे लावाना त्याच्यामध्ये हा एक विषय होता आणि तुम्ही या संपूर्ण याची माहिती मा. सदस्यांना दिली पाहिजे तुम्ही ती दिली नाही. तुम्ही ती दया. नंबर दोन परिवहन समस्या जी आत्ता शर्मिला मॅडमने मांडलेली आहे उत्तन आणि मिरारोडच्या नागरिकांना हैराण झाले आहे आणि तुम्ही गटनेत्यांची बैठक घेतली त्या बैठकीमध्ये तुम्ही डिसीजन घेतले होते टी.एम.टी.च्या बसेस आम्ही आणू, बी.एस.टी. बसेस आणू, प्रायव्हेट बसेस आम्ही आणू परंतू आज त्याला जवळ जवळ १० दिवस होत आले तुम्ही काहीही केले नाही सर हा तुमचा फॅल्यूअर सत्ताधारी पक्षाचा फॅल्यूअर आहे साहेब तुम्ही गाडया उभ्या करू शकत नाही जस चक्रे मॅडम म्हणतात जर तुम्ही करू शकत नाही तर खुर्च्या खाली करा उदयाच्या उदया गाडया आम्ही आणतो आणि उत्तन आणि मिरारोडच्या प्रवाशांना आम्ही बस देतो सर ही चॅलेन्ज आहे तुम्ही उदया द्या नाहीतर आम्ही देतो एक दिवसात बसेस उभ्या करून देतो सर आम्ही तुम्हाला तर नसेल देत ता तुम्ही खुर्च्या खाली करा. नंबर तीन प्रशासकीय भवनाचे आणि बसचे जवळ-जवळ तुमचे प्रशासकीय कामकाज जे आहे ते झाले नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे ज्या विकासकाबरोबर तुम्ही ते ॲग्रीमेंट करणार आहेत. तुम्ही प्लान पास करणार आहोत तो अजुनही फाइनल झालेला नाही. नंबर २ तुम्ही बसेस त्या तिथे उभ्या आहेत २०१४ पासुन परंतु तुम्ही त्या बसेसचे टेंडर सुध्दा काढले नाही मग मुख्यमंत्री साहेब उद्‌घाटन कसं करणार. तो तुमचा कॉन्ट्रॅक्ट सुध्दा फिक्स झाला नाही. आणि त्यानंतर तुमचे पाणी. पाण्याचे पण संपूर्ण टेंडर प्रोसेस पूर्ण झालेली नाहीत. काही २-३ टेंडर अर्धवट आहेत आणि अस सगळ अर्धवट असताना पुर्णवट मुख्यमंत्री आहेत पण ते अर्धवट कामाच उद्‌घाटन करणार का? साहेब तुम्ही आयुक्त आहात आणि महापौर मॅडम मुख्यमंत्री आपल्या पक्षाचे आहेत तर त्यांचा अपमान व्हायला नाही पाहिजे म्हणून जे सांगितलेले आहे त्याचा कृपया आपण खुलासा करावा धन्यवाद.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम अच्छी बात सुनाई आपने की मुख्यमंत्री यहाँ आ रहे है और ३ परियोजना का उद्‌घाटन करने के लिए खुशी की बात है की ७५ एम.एल.डी. पाणी की योजना आज कार्यान्वित होने जा रही है। हमारी महापौर जब कॅटलिन परेरा थी उसी समय के अंदर में मंजुर हुई थी। हमारे और काँग्रेस के परिवार से ठिक है परियोजना को अंजाम तक पहुँचने मैं समय लगता है। जैसा की सभी सदस्यों ने बताया की उसकी निविदा प्रक्रिया जो शुरु हुई उसके अंदर में कही ना कही तांत्रिक रुप से अडचणे आई है वो पूर्ण अभी तक की गई नही उसके अलावा माजी विरोधी पक्षनेता श्री. आसिफ शेखजी अभी यहाँ पे नही है। उन्होने एक पत्र के माध्यम से सी.एम. साहब के पास जाकर के वो संपूर्ण प्रक्रिया जो निविदा प्रक्रिया हुई उस समय आक्षेप लेते हुए सभी पानी प्रक्रिया पे उन्होंने विस्तारीत रुप से लिखीत उनको निवेदन दिया था जिसके अंदर में जुबेरजी ने भी कहाँ था जैसे की एम.आय.डी.सी. की भी वहाँ पे कोई मंजुरी है सी.आर.झेड की है अन्य कई जो मंजुरीयाँ है वो न लेते हुए उससे निविदा प्रक्रिया को पूर्ण करने की कोशिश की गई है। मा. मुख्यमंत्री साहबने उसी पत्र के उपर में संबंधित विभाग को आदेश दिया था की, उसके उपर त्वरीत कारवाई करके और मा. मुख्यमंत्री साहब के सामने प्रस्तुत किया जाए। मैंने वो लेटर भी देखा है। वो भी पत्र का जवाब अभी तक यहाँ से दिया गया नही है। यु.डी. से आपके पास में आया है ऐसी संपूर्ण प्रक्रिया प्रलंबित होते हुए मुख्यमंत्री साहब मेरे खयाल से उद्‌घाटन के लिए आ रहे है। या तो उनको कोई जानकारी नही दी गई है। उनको अंधरे में रखा गया है। पाणी योजना होनी चाहिए लेकिन यह सब क्लिअरन्स करके होनी चाहिए। दुसरी बात इन्होने जो अभी परिवहन का विषय गंभीर रुप से बार-बार उत्तनवाले प्रवासी संघटना उत्तनवाले रहिवासी थे परिवहन के अंदर के अंदर मैं देखा जाए तो यह पुरा मिरा भाईंदर में एकमात्र योजना आता है। तो उत्तन के कारण से आ रहा है। बार-बार नियोजन करने के बाद के अंदर में लास्ट में आपने जो मिटींग लगाई गटनेता की उसमें कही पे खुलासा नही किया आपने की कुछ समय के अंदर में मुख्यमंत्री साहब आ

रहे है। और हमने यह परिवहन को क्रियान्वित करने जा रहे है। मुझे जहाँ तक जानकारी है की इस परिवहन सेवा के अंदर में बसे पडी हुई है। लेकिन कुछ टेंडरो के कारण से की उसको चलाएगा कौन कीस तरीके से चलाएगा डेपो की क्या व्यवस्था होगी इसके कारण से वो प्रलंबित पडा है। बसेस हमारी कबसे है लेकिन क्या वो सब प्रक्रिया पूर्ण हो चुकी है? जिस दिन मुख्यमंत्री साहब आऐंगे उसी दिन रिबन काटेंगे क्या परिवहन सेवा पूरे मिरा भाईंदर में शुरु हो जाएगी? की क्या खाली एक रिबन काटने के लिए आ रहे है और यह उत्तन वालों को और मिरा भाईंदर वासियों को दिलासा देने आ रहे है। मेरा आपसे निवेदन है प्रशासन की तरफ से महापौर मॅडम ने लगाया कार्यक्रम अच्छी बात है। लेकिन प्रशासन की तरफ से इस शहरवासियों को कोई दिशाभुल न करते हुए इस सभागृह के अंदर में जो जनता के प्रतिनिधी है उनके सामने पूर्ण जानकारी दि जानी चाहिए। ताकी हम आम जनता के बीच में प्रसारित कर सकते है। की इस शहर मैं क्या योजना लागु हो रही है और किस तरीके से लागु हो रही है। और दुसरा इस कार्यक्रम के अंदर के अंदर में आप कार्यक्रम करने जा रहे है। २४ को कार्यक्रम होने जा रहा है और आज हमको पता चला है। जैसे ध्रुवकिशोरजी ने भी बोला था की सभी गटनेताओं की मिटींग होनी चाहिए सभी पदाधिकारीओंकी मिटींग होनी चाहिए। हम सब को भी उससे जानकारी मिले। मेरा आपसे निवेदन है की कही पक्षपात न करते हुए सर्व पक्षीय गटनेता को बुलाना चाहिए उनको पूरी जानकारी देनी चाहिए इसके अलावा सभी पक्ष के यहाँ प्रमुख है। उनको इस कार्यक्रम में आमंत्रित करना चाहिए। कही ऐसी घटना फिर ना घट जाए की डॉ. बाबासाहेब आंबेडकर का एक भवन का उद्‌घाटन अभी हुआ था जो आज भी तनातनी का विषय चल रहा है। मेरा यह मानना है की सन्मा. जो नेता है यहाँ पे सभी पक्षों के जैसे उद्धवजी ठाकरे हमारे पवार साहब है इनके अशोकलालजी चव्हाण है पृथ्वीराजी चव्हाण है इन सबको भी इसके अंदर मे निमंत्रण देना चाहिए धन्यवाद।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम सर्वप्रथम आपलही अभिनंदन करतो की मोठी योजना या शहरामध्ये राबविण्यासाठी आपण वेळोवेळी योग्य भूमिका घेतलेली आहे आणि हे आपलं सौभाग्य आहे की आपल्या सर्वांच्या प्रयत्नांनी मुख्यमंत्री महोदय या शहरात येत आहेत. मुख्यमंत्री महोदयांची तारीख की ज्यावेळी चर्चा झाली की विशेष सभा कारण काय त्यावेळी महापौर मॅडम आणि आमच गणेशात्सवा पासून पाठपुरावा चालु होता की मुख्यमंत्री महोदयांनी वेळ द्यावा पण गणेशोत्सवाला त्यावेळी त्यांना जमल नाही त्यानंतर त्यांच्याकडून डेट आम्हाला दिली गेली आणि पितृपक्ष म्हणून त्या काळात नको १७ तारीख दिली दुस-या बाजुला आम्हाला वाटल की २० तारखेपर्यंत सभा लावता येते दुसरे म्हणजे सभा मागच्या वेळेला यासाठी सभा लागली नाही महासभा न लावण्याचे आमचं काही कारण नाही मागच्या महिन्यात बकरी ईद होती. गणेशोत्सव जैन समाजाचा पर्युषण पर्व हे अनेक धार्मिक सण होते त्यामुळे मागच्या महिन्यात घेता आली नाही आणि या महिन्याच्या २० तारखेच्या आत घ्यायचे पण मुख्यमंत्र्यांचे १५ आणि १७ महिन्याच्या २० तारखेच्या आत घ्यायचे पण मुख्यमंत्र्याचे १५ आणि १७ आलं म्हणुन आम्हाला घाईघाईने ते निर्णय घ्यावे लागले की विशेष सभा लावावी. त्यानंतर आता जस सांगितले गटनेत्याला बोलवुन चर्चा झाली पाहिजे नक्कीच त्यात काही दुमत नाही सर्वांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे की आपल्या शहरात एवढ्या मोठमोठ्या योजना होत आहेत. गेल्या आता २ दिवस अगोदर कन्फम केले की २४ तारखेला संध्याकाळच्या वेळेला ते येणार टेन्टेटीव्ह त्यांनी २३ दिले होते पण दोन दिवस अगोदर २४ तारीख संध्याकाळी मी आणि आयुक्त महोदय त्यावेळी मंत्रालयात होतो महापौर मॅडम हा मुख्य जो उद्‌घाटन आपण लावला त्याचे अभिनंदन यासाठी करतो की आता मगाशी सांगितले भगवती शर्माजीने की पाणी हा जो विषय आहे त्यांच्या काळात झाला आणि योजना आली तर माहिती देतो आपल्या काळात तो पाणी मंजुर झाला नाही १०० एम.एल.डी.चे होर्डिंग्ज लागले अनेक लोकांनी बघितले गाव त्याला विटनेस आहे. या सभागृहाचे अनेक लोक त्याला विटनेस आहेत. एका पक्षाने लावले ३० एम.एल.डी. दुस-याने लावले १०० एम.एल.डी. पण पाणी कधी आले नाही योजना कधी केली गेली नाही.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, या सभागृहात जबाबदारीने आणि जबाबदार व्यक्ती म्हणून बोलतो. माजी महापौर कॅटलीन परेरा मॅडम या ठिकाणी उपस्थित आहे. त्यांच्या काळात ठराव झाला होता ५० एम.एल.डी. पाणी सरकारकडून मागायचं.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यांनी चुकीचे आरोप केलेत आम्ही सहन नाही करणार.

**मा. महापौर :-**

आपण बसुन जा.

**नरेंद्र मेहता :-**

मी पहिले तर कुठल्याही पक्षाचे नाव घेतले नाही. नंबर दोन मी जबाबदारीने बोलतो कॅटलीन मॅडम महापौर होत्या तेव्हा तो ५० एम.एल.डी. ७५ एम.एल.डी. ठराव आपण गर्व्हमेंटला पाठविले आपण ते काढा हे रेकॉर्डवर आहे. ते जाऊच शकत नाही म्हणजे मी बोललो तर काही बदलेल का हे रेकॉर्डवर आहे लाखे साहेब, कमिशनर होते मी, लाखे साहेब, प्रकाश मेहता साहेब त्यावेळी मिनिस्टर तिथपर्यंत शिवसेना आणि बी.जे.पी. चे अनाऊन्स झाल नव्हतं सरकारमध्ये ३० दिवसांमध्ये सरकारने आल्या आल्या मिरा भाईंदरला ३०

दिवसाच्या आतमध्ये ती नोटिंग काढली तर प्रकाश मेहताजी मंत्री महोदयाची सही आहे आता त्यांच्याकडे खात पण नाही आता सुभाष देसाईकडे देत आहेत. ३० दिवसामध्ये झाले हे रेकॉर्ड काय मी बदलू शकत नाही ते ऑन रेकॉर्ड आहे तेवढच नाही त्यानंतर पाठपुरावा करुन मागच्या तीन महिन्याच्या आतमध्ये सरकारने १८० कोटी एक्झॅक्ट फिगर माहित नाही २०० का १८० कोटी ग्रॅन्ड मंजूर केली विदिन ३ महिन्यात भाजप सरकार गतिशील आहे. त्यांची शंका त्याला मी नाकारत नाही त्यांची संख्या योग्य आहे. पण ते मागील सरकारसाठी होती पण ते या सरकारसाठी नाही ही सरकार गतिशील सरकार आहे जो बोलेगी वो करेगी। महापौर मॅडम आपण जबाबदारी व्यक्ती आहात आयुक्त महोदय पण जबाबदार व्यक्ती आहे. आम्ही सगळे सदस्य जबाबदार व्यक्ती आहोत. आम्ही जे काम करतो आम्हाला माहित आहे काय करतो. पाण्याची योजना ही जी योजना आहे यामध्ये वेगवेगळे आहे पाण्याची टाकी आहे. इंटरलाईज डिस्ट्रीब्युशन सुध्दा आहे आपल आऊटलाईन डिस्ट्रीब्युशन अनेक त्यामध्ये वेगळीवेगळी आहे. ही योजना आपण सुरु करत आहोत यामध्ये कदाचित जसं काही ठिकाणी फॉरेस्ट सिस्टम काही ठिकाणी हे सगळ symulteniously चालत असेल हे काही वेगळे राहणार नाही मला एक सांगा शहरात टाक्या बनवायला कोणाची परवानगी पाहिजे का? गरज नाही. या शहरात इंटरनल डिस्ट्रीब्युशन लाईन टाकायला आम्हाला कुणाची परवानगी पाहिजे का? गरज नाही. ही योजना आम्ही चालु करतोय आम्ही ही योजना आणली आहे. तर महापौर मॅडम, काही चालू योजना असतील काही भागामध्ये ते असतील त्या गोष्टी ज्या आहेत त्या symulteniously होत राहणार एका कामासाठी पूर्ण योजना थांबवता येणार नाही ७५ टक्के होईल ५० टक्के होईल आणि आम्हाला विश्वास आहे ना सरकारने ज्यावेळी योजना मंजूर केली २०० कोटी ग्रॅड दिली ना त्या डि.पी.आर. चेक केले असच आम्हाला घरी बसून दिले नाही की मनपाला २०० कोटी घेऊन जा त्यांनाही या गोष्टी माहित आहेत आणि ते ही कॉन्फीडन्ट आहे की हे परवानगी सगळी मिळणार आहे. संबंधित विभागाची लोक तिकडे होती ना ते संबंधित विभाग सर्व काही देणार आहे त्याला प्रोसेस असेल पण ती योजना होणार, चालु होईल आणि या शहराला लवकरच पाणी मिळणार आहे हे आम्ही ठामपणे आज मंचावरुन सांगतो राहिला प्रश्न आता प्रशासकीय इमारतीचा महापौर मॅडम प्रशासकीय इमारत मुख्यमंत्री महोदय येणार आपण त्यांचा वेळ घेणार या कामासाठी. आम्हालाही कल्पना नव्हती पण योगायोगाने ते येतात आणि विकासकाचा आयुक्त महोदयांनी आपल्याबरोबर अनेक टायमापासून चर्चा चालु होती की इमारत बांधायची आहे पण काही कारणास्तव ते बसत नव्हते पण अल्टीमेटली तो मंजूर झाला आणि ३० टक्के इमारत नंतर आयुक्त साहेब आपल्याला ती माहिती देतीलच आणि आपण पण ती द्यावी अशी माझी पण इच्छा आहे. परंतु आम्ही जी माहिती घेतली प्रशासनकडून १ लाख ८० हजार स्क्वेअर फूट इमारत ही इमारत जवळपास ६०००० स्क्वेअर फुटची आहे आणि आज आपल्याकडे सगळे कार्यालय वेगळे. अधिकाऱ्याला बसायला जागा नाही. व्यवस्थित दालन नाही. गटनेत्याला बसायला व्यवस्थित दालन नाही आणि आज ही गरज आहे की या शहराला मोठी इमारत पाहिजे यासाठी १,८०,००० स्क्वेअर फुट याची तीन पट इमारत महानगरपालिकेचा १ रुपया खर्च न होता आम्ही ते बांधुन घेणार आहोत. सन्मा. सदस्य खंडेलवालजीने जे प्रश्न केले नक्की तो ठराव झालेला आहे म्हणून आज तो विषय आणलेला आहे की आम्ही तो मागे घेऊन त्या इमारती बांधावे असा तो निर्णय आम्हाला घ्यायचा आहे. म्हणून सभागृहासाठी तो विषय आणलेला आम्ही आणि त्या विषयावर सगळे मिळून निर्णय घेऊया. १८०००० ची ज्यावेळी इमारत होईल त्यावेळी सगळे एखादे सन्मा. सदस्य असतील त्यांच्या वेटींग लॉबी असतील आज काही लोकांना आयुक्त दालनाच्या बाहेर उभे रहावे लागते. या सगळ्यांना व्यवस्थित मान सन्मान दिले जाईल. व्यवस्थित योजना केल्या जाईल त्यासाठी मी मनापासुन आयुक्त साहेब आपले अभिनंदन करतो की चांगले निर्णय घेतले योग्य वेळी निर्णय घेतले तुम्हाला मनापासून शुभेच्छा देतो, धन्यवाद देतो. आता बसेसचा विषय उदा. म्हणून सांगतो सरकारचे एक घोषणापत्र होते की महाराष्ट्र सरकार टोलमुक्त करणार टोल आम्ही बंद करणार पण ज्यावेळी टोल बंद करायचे होते त्या वेळी काय झाले ॲग्रीमेंट काढले गेले त्या ॲग्रीमेंटमध्ये सरकारने मागील सरकारने बाय बसचे कंडीशनच नाही म्हणजे हे आम्हाला परत घेता येईल अशी कंडीशनच नाही म्हणून त्याला घेता आले नाही आणि हेवी वेहिकलला टोल लावा आणि याला कार्यकाल वाढुन द्यावा हा निर्णय घ्यावा लागला कारण ती ॲग्रीमेंटमध्ये कंडीशन नाही आजपर्यंत या परिवहन सेवा बद्दल अनेकदा आम्ही लक्षवेधी केली. अनेकदा “ज” चे प्रस्ताव आणले आपण इतिहास बघा आपण सत्तेत असताना आजचीही परिस्थिती नाही ठिक आहे. आजची परिस्थिती जास्त गंभीर आहे. त्यावेळी पण ती गंभीर परिस्थिती होती आणि त्यावेळी आम्ही ठोकून सांगायचे मिरा भाईंदर २००३ ला परिवहन सेवा सुरु झाली त्यावेळी साहेब ५० बसेस होते लोकसंख्या होती ५ लाख २००९ ला ५० बसेस अजुन आल्या १०० बसेस झाल्या. लोकसंख्या होती साधारण ८००००० आज लोकसंख्या १२,००,००० गेली आणि बसेस धावतात ५ ही आमची परिस्थिती आणि याच कारण काय आपणही अनेकदा बैठक घेतली आम्ही घेतली महापौर मॅडमने घेतली त्या ॲग्रीमेंटमध्ये त्याला शिक्षा करावी त्याला काढावे अशी कुठलीही कंडीशन नाही, कुठलेही क्लॉज नाही. करायचं तर कसं करायचे. शेवटी काय केले कोर्टात गेला मागच्या वेळी ते महालक्ष्मी ट्रान्सपोर्ट ते ही झाल त्यांना ३-४ कोटी द्या. अनेकदा सभा तहकुब झाली त्या विषयावर कॉंग्रेसने दोनदा तिनदा त्यानंतर विषय सहमत झाले शेवटी शहराच्या हिताचा निर्णय त्याला द्यावे लागले खिशातनं महालक्ष्मीला पैसे द्यावे लागले ५० बस ॲक्वायर करायला आज या ठेकेदारची तीच परिस्थिती झाली आहे. अग्रीमेंट करताना किंवा निविदा मागविताना किंवा करारनामा करताना भविष्यातल कोणी विचारच केला नाही की भविष्यात त्यांनी बसेस नाही चालविली तर काय? भविष्यात त्याने टाईम टू टाईम मेन्टेन नाही केले तर मग काय? का बाबत कोणीही लक्ष दिले नाही

विचार केले नाही म्हणून आजही परिस्थिती निर्माण झाली. आपल्याकडे ३-४ महिन्यापासून रेडी आहेत बसेस परंतु आपल्या कंडीशन आहेत, काही सरकारचे केंद्रशासनाचे काही वर्ड बँकचे की त्याला डेपो आणि इतर सामग्री तुम्ही करावी. आता शर्मिला मॅडमने विचारले ठेकेदार नेमले नाही मग त्याच ठेकेदारला देणार का काय करणार हाही एक प्रश्न आहे. म्हणून आयुक्त महोदय महापौर मॅडम आम्ही हा निर्णय घेतला आहे की आम्ही शहराच्या हितासाठी आहेत या बसेस आपल्या ज्या उभ्या आहेत त्या आता या महानगरपालिकेच्या बसेस आहेत ते काणी चालवायचे हे महानगरपालिकेने ठरवायचे. महानगरपालिकेने चालवायचे की नविन ठेकेदाराने चालवायचे की त्याच ठेकेदाराने चालवायचे पण आपल्या कंडीशनप्रमाणे मागील ॲग्रीमेंट प्रमाणे ते आपल्याला बंधनकारक करायचे हे कदाचित आपल्याला माहित नसेल हे आपल्याला बंधनकारक आहे की त्या ॲग्रीमेंट क्लॉजमध्ये तुम्ही २०० केलेले आहे हे गाड्या पण त्यांनाच द्याव्या लागेल आणि त्यांना दिली तर काय परिस्थिती होईल यामध्ये कोणी एकही सन्मा. सदस्य साथ देणार का त्या ठेकेदाराला? पण आज आम्ही सत्तेत आहोत म्हणून ते आम्हाला समोर जावे लागते कारण आज त्या आम्ही निविदा घेतल्या आहेत की महानगरपालिका जे नविन ठेकेदार यायला अजुन कदाचित ३-४ महिने लागणार कारण जस्ट सभागृहाच्या माहितीसाठी त्याचे टेंडर डॉक्युमेंट मला वाटते आयुक्त साहेब वर्ल्ड बँकवाले देणार आहे. केंद्र शासनातर्फे आपल्यालाही ते करता येणार नाही या सगळ्या बाबीचा विचार केला मिरा भाईंदरची परिस्थिती असेल इतर शहराची असेल या सगळ्याचे विचार करुन अनेक मिटींग झाल्या अनेक कमिट्या गठित झाले की परिवहन सेवा सगळीकडे हीच परिस्थिती आहे. आपल्याला व्यवस्थित कसे चालवता येईल म्हणून तो टेंडर आम्हाला काढता आला नाही आता तेही काम आम्ही सुरु केले आहे. आज शेवटी नागरिकांना किती कोण त्रास द्यायचं त्यांनी किती सहन करायचे आता उत्तन परिसर आहे त्याला परिहवन सेवा हाच एकमात्र ट्रान्सपोर्ट व्यवस्था आहे. दुसरी व्यवस्था नाही सामान्य व्यक्ती रिक्षा किंवा गाडीने जाऊ शकत नाही. म्हणून आज आम्ही हा निर्णय घेत आहोत की आपले बसेस रेडी आहेत. महानगरपालिकेला चालवायचा अधिकार आहे त्यामध्ये कोणाचा हस्तक्षेप होऊ शकत नाही म्हणून ठेका पध्दतीने कॉन्ट्रॅक्ट आणि ड्रायव्हर घेऊन जिथपर्यंत आपला नविन करारनामा होत नाही तिथपर्यंत आपण या शहरामध्ये किमान तरी २५-३० बसेस चालु करावी आणि ते बसेस चालवावे आणि मी खात्रीने सांगतो २४ ला उद्घाटन होईल या युती सरकारचे तुम्हाला शब्द आहे आणि २५ तारखेपासुन त्या बसेस रस्त्यावर धावतील. २४ ला संध्याकाळी त्याचे उद्घाटन होईल. आपण ठरावाच्या बाबतीत चिंता करु नये आणि मुख्यमंत्री महोदय हे सक्षम आहे त्यांना सगळ माहिती आहे कुठल्या कामाला उद्घाटनला जायला पाहिजे त्यांनी अगोदरच सगळी माहिती घेतली आहे. त्यांच्या डिपार्टमेंटनी की उद्घाटनाला काय पाहिजे काय नाही पाहिजे आणि नक्की आयुक्त साहेबांना सुध्दा माहित आहे ते ही जबाबदार व्यक्ती आहेत. तेही सरकारचे व्यक्ती आहेत त्यांनाही माहित आहे. काही गोष्टी symulteneously होत असतात काही गोष्टी पूर्वी होत असतात. पण सभागृहाला आम्ही खात्री देतो पण जे काही आपल्याला सगळे नियमाप्रमाणे करायचे आहे ते उद्घाटनाच्या आधी होतील आणि चांगल्या रितीने आपण उद्घाटन करुया तीनही गोष्टी महत्वाच्या आहेत या शहराला पाणी या शहराला परिवहन सेवा या शहरासाठी नागरिकांसाठी मोठी एक शहराला परिवहन सेवा या शहरासाठी नागरिकांसाठी मोठी एक चांगली इमारत आणि मिरारोडचे सौभाग्य आपली ही इमारत मिरारोडला चालली आहे. जुबेर साहेब मला वाटते तुम्ही तेथील प्रभाग समिती अध्यक्ष सुध्दा आहेत. नक्कीच कार्यालय सुध्दा त्याच इमारतीत करता येईल. पण महापौर मॅडम मला आज सभागृहाला विनंती करायची आहे की आपण मध्ये तहकुबचा ठराव मांडला आहे आणि आज सभागृहाची मानसिकता तशी दिसत नाही की सभागृहात चर्चा होऊन पण काही २-३ विषय महत्वाचे आहेत. एक मुख्यमंत्री येतात तर दुष्काळ भाग जो आहे त्या ठिकाणी आपण त्यांना आर्थिक मदत करायची आहे आणि शेवटचे २ विषय आहेत आराखडाचा आणि रस्ते विषयक हे ३ विषय. सभागृहाला विनंती आहे आपण एकमताने तो निर्णय घेऊया. ३ विषयावर चर्चा करु बाकी सर्व तहकुब करुया अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**सुहास रकवी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो आमदार नगरसेवकांनी बराचसा खुलासा केला आहे त्या विषयाची माहिती पण दिली आहे. आमच एक म्हणण आहे की तुम्ही एवढी मोठी प्रशासकीय इमारत उभारता तर साधारण सदस्य जो आम्ही असतो इकडचा आम्ही ट्रस्टी असतो तर आम्हाला माहिती नको का आपल्या शहरात काय चालले आहे विषयपत्रिका नसताना सुध्दा उद्घाटन होतात तुम्हाला चांगली माहिती आहे की किती करोड येणार किती खर्च होणार किती लाख सुट होणार तुमचा अभ्यास चांगला आहे आमचं म्हणणे एवढच आहे जस आमचे सदस्या शर्मिला बगाजीने उपस्थित केले गेल्या वेळी सुध्दा त्या रोडवर बसेस हा एकमेव पर्याय असताना आम्ही वारंवार त्या वडे-पिंपळे मॅडम परिवहन त्यानंतर दिपक सावंत होते मग गतिशील सरकार तुमचे आल्यानंतर एवढे दिवस का झाले नाही ते आमच्या काळचे निर्णय होते त्याकाळचे तुम्ही फॉलो अप करुन चांगली गोष्ट आहे मुख्यमंत्री येणार उद्घाटन होणार त्यांच्या निमित्ताने तरी या मिरा भाईंदरला सेवा उपलब्ध होईल दुसरी गोष्ट प्रशासन इमारत किती फुटाची आहे उद्या आम्हाला कोणी सामान्य माणसाने विचारले काय तुम्ही अडाणी आहात का? ८ वी पास आहेत का तुम्ही? असं विचारल्यावर आम्ही काय करणार. आम्हाला त्या विषयाची माहिती असायला हवी तुमच्या शहरामध्ये जी विकासाची कामे होतात तुमच्याकडे काय-काय पाण्याचे प्रकल्प परिवहन असो, प्रशासकीय असो यांची संपूर्ण माहिती ही सदस्यांना देणे

यांचे खरे निवेदन मा. आयुक्त साहेब तुम्ही केले पाहिजे यांची माहिती यांचा अभ्यास फार दांडगा आहे पण तुम्ही सुध्दा माहिती दिली असती तर आम्हाला आनंद झाला असता.

**मा. आयुक्त :-**

त्यांची भाषा एकीकडे करायची आणि दुसरीकडे उत्तर द्या म्हणून मला सांगायच.

**सुहास रकवी :-**

साहेब पण आम्हाला विषयच माहित नाही प्रशासन इमारत कुठे आहे. आम्हाला कोणी एक पत्र दिले आहे का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाच्या सर्व सन्मा. सदस्यांच्या चर्चेतुन हा विषय निर्माण झाला. अजेंडा वरच्या विषयावरती उत्तर देणे मला बंधनकारक आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त साहेब एखाद्या विषयावर कुठल्याही महानगरपालिकेचा शहराचा विषय असेल आणि आपल्याला महापौरांनी उत्तर द्यायला सांगितल असेल मग ते अधिनियमावर असु द्या की नसु द्या त्यामध्ये उत्तर देणे आणि सदस्यांना समाधान करणे हे आपले कर्तव्यच आहे.

**सुहास रकवी :-**

पण त्यांच्याकडे विषयपत्रिका नसेल तर त्यांना बंधनकारक कसं असेल साहेब. अस नसत पहिली गोष्ट विषय नाही ना.

**मा. आयुक्त :-**

मान्य आहे आमदार साहेब मला काय म्हणायच आहे ते आपणही समजुन घ्याव. मला हा विषय असाच मांडायचा आहे की आपल्याला जे सांगायच मी मा. महापौरांनी सांगितल्यानंतर उत्तर द्यायला नकार देत नाही परंतु ही विशेष सभा आहे. विशेष सभेमध्ये अजेंडाच्या व्यतिरिक्त दुसऱ्या विषयावर चर्चा घडून येऊ शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

पण कमिशनर साहेब, २४ तारखेला मुख्यमंत्री साहेब येत आहेत शहरामध्ये आम्हाला काही माहिती तर पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण ही इमारत आता मंजूर करतात एक समजुन घ्या इमारतीला आपण परवानगी देणार म्हणजे मुख्यमंत्रीच्या हस्ते उद्घाटन आहे. आता सदस्यांची भावना काय त्याबद्दलची माहिती आम्हाला पाहिजे एक विषयपत्रिकेवर अजेंडा नाही मला हेही पटते. परंतु त्या टाऊन सेंटर किंवा कर्मशिअल झोनचे याच्यामध्ये काय बांधायचे हा संपूर्ण अधिकार आयुक्तांचे आहेत म्हणून त्या अधिकारखाली आपण ती प्रशासकीय इमारत बांधावी हा आपला निर्णय आता सभागृहापुढे आम्ही सत्ताधारी म्हणून त्यामध्ये सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले खंडेलवाजीने की मध्ये तो ठराव झाला त्यावेळी आम्ही मागे घेतला होता तो ठराव म्हणून त्या ठिकाणी ते इम्प्लीमेंट आपल्याला करता येईल.

**भगवती शर्मा :-**

मागे घेतलाय ठराव मागे घेतलाय कोणाला काय माहित नाही. तुम्ही कधी ठराव करतात कधी मागे घेतात.

**नरेंद्र मेहता :-**

भगवती शर्माजींना समजलं नाही कदाचित मी चर्चा महासभेमध्ये हीच केली की आपण विषय घेऊया आणि ते विषय आल्यावर आम्ही तो ठराव मागे घेणार आहोत हे पूर्वी केलेल असं.

**भगवती शर्मा :-**

सेटींग झाली.

**नरेंद्र मेहता :-**

नीट ऐका आणि आम्ही मांडणार तो आमचा अधिकार आहे.

**सुहास रकवी :-**

आमदार साहेब आमच ऐका २४ तारखेला मा. मुख्यमंत्री साहेब येतात याची माहिती नाही दिली. आजची तारीख झाली १५. नंतर महासभा लावणार आहे का मधल्या काळामध्ये किंवा कुठली माहिती मिळणार आहे का? म्हणजे तुमचा कार्यक्रम नियोजित आहे. काही कळतच नाही आता इमारत कुठे बांधणार? तुम्ही १,८०,००० सांगितले प्रत्यक्ष प्रशासनाने सांगितले पाहिजे किती फुट आहे त्याच्यात काय काय आहे?

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय हा धोरणात्मक निर्णय आहे. प्रशासन स्वबळावर घेऊ शकतो का? याचं उत्तर पाहिजे. ही महानगरपालिका आहे सर्व सन्मा. नगरसेवक उपस्थित आहेत किंवा हे काय विधानसभा नाही जिथे मंत्रीमंडळ असेल आणि मंत्र्यांनी त्यांच्या विभागाचं उत्तर द्याव म्हणून सन्मा. आमदार साहेबांना नरेंद्र मेहताजींना विनंती करेल उत्तर प्रशासनाशी आम्हाला अपेक्षित आहे त्यांनी द्यावे.

**सुहास रकवी :-**

सर तुम्ही काय सांगितले हा विषय नाही. म्हणजे आम्हाला काय माहितीच नाही बिल्डींबद्दल. तुम्ही म्हणतात विषयपत्रिकेवर नाही म्हणून मी खुलासा नाही करु शकत.

**मा. आयुक्त :-**

जरी आपल्या चर्चेतुन आपण विषय घडवून आणला तरी पण मा. मुख्यमंत्रींच्या हस्ते उद्‌घाटन होण्यापूर्वी सर्व नियमांची पूर्तता करुन घेण्यात येईल एवढ मात्र माझे या प्रश्नाला उत्तर आहे.

**सुहास रकवी :-**

नियमांची पूर्तता करणारच सर तुम्ही आम्ही कुठे नाही म्हणतो पण तिकडे काय होणार हे माहित पाहिजे की नाही.

**भगवती शर्मा :-**

आयुक्त महोदय आपने नियोजन किया या सभी सदस्योंने अपने विषय के उपर चर्चा की जो भी चर्चा की उसमें आपसे यह अपेक्षा थी की प्रशासन के माध्यम से हमको उत्तर मिलेगा।

**मा. महापौर :-**

मला वाटते सगळ्यांना उत्तर भेटले आहे बसा.

**सुहास रकवी :-**

अहो आमदार साहेब त्यांना खुलासा तर करायला सांगा कुठे बनणार आहे. आयुक्त साहेब तुमचा खुलासा फक्त नियमापुरताच होता. तुम्ही म्हणाले नियमानुसार तिकडे प्रशासकीय इमारत होणार.

**मा. आयुक्त :-**

कार्पोरेशनमध्ये उद्‌घाटन होत आहे तर ते गैरकायदेशीर कसं करणार.

**जुबेर इनामदार :-**

धोरणात्मक निर्णय आहे याचा निर्णय पालिकेने या सभागृहामध्ये घेतलेला नाही.

**भगवती शर्मा :-**

ओपन ॲमिनिटी स्किम के अंदर में हेड ऑफिस बांध ही नही सकते। नियम में है ये आप कैसे बांध रहे है वहाँ पे।

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम, आपल्याला विनंती आहे की आता येणाऱ्या २४ तारखेला या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय फडणवीस साहेब येत आहेत आणि आमच्या पक्षाच्या वतीने त्यांचे स्वागत तर करतच आहोत. ते केवळ बी.जे.पी चे नाही किंवा शिवसेनेचे नाही मुख्यमंत्री सर्वांचे आहेत. महानगरपालिकेची एवढी मोठी इमारत आपण बनवत आहोत त्यामध्ये केवळ गटनेतेच नव्हे तर सन्मा. सगळे सदस्य नगरसेवक या सगळ्या नगरसेवकांची वेगळी बैठक घ्यावी आणि त्या बैठकीमध्ये जे संबंधित अधिकारी असतील सगळ्यांना विश्वासात घ्यावे अशी माझी एक सुचना आहे. त्याच कारण की तुम्ही गटनेत्यांना सांगाल पण आम्हालाही कळले पाहिजे.

**मा. महापौर :-**

तुमची विनंती ऐकली बसा तुम्ही. प्रशासकीय इमारतीची तुम्हाला जी जी माहिती पाहिजे इथे घेवारे साहेबांना मी बोलावले आहे ते द्यायला रेडी आहेत ती माहिती तुम्ही ऐकून घ्या.

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम एक शब्द राहिला त्यामध्ये जो बिल्डर कोणी बांधुन देत आहे त्याच्याबद्दलची माहिती फक्त गटनेत्यांनाच नाही तर सर्वांना माहिती मिळाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

मॅडम आपण बसुन जा.

**लियाकत शेख :-**

महापौर मॅडम, आम्हाला आता सन्मा. आयुक्तांकडून म्हणजे एकंदरित प्रशासनाकडून उत्तर अपेक्षित होतं. आम्हाला या संपूर्ण सभागृहाला जे उत्तर अपेक्षित होत ते आपल्या प्रशासनाकडून अपेक्षित होतं म्हणजे साहजीकच आम्हाला कमिशनर साहेबांकडून उत्तर अपेक्षित होत आता त्यांच्याकडे काही माहिती नसेल किंवा काय पूर्ण डिटेल नसेल आता या प्रश्नाच उत्तर देण्यासाठी त्यांनी घेवारे साहेबांना इथे पाचारण करण्यात आलं तुमही अगोदरच कन्सन ऑफिसरना का इथे बसवून ठेवत नाही. परत परत आम्ही त्यांना समजावून द्यायच का?

**मा. महापौर :-**

कन्सन ऑफिसर सगळेच इथे असतात. जेव्हा बोलावण्यात येते तेव्हा ते इथे येतात आणि आपल्याला आन्सर देतात ते. आपण बसुन जा. घेवारे साहेबांच ऐका.

**लियाकत शेख :-**

मॅडम पण पुढच्या मिटींगमध्ये कन्सन ऑफिसरना संबंधित ठेवा ना आता आम्हाला परिवहन बद्दल काही माहिती हवी होती प्रत्येक वेळेला कमिशनर साहेबच उत्तर देतील का? गॅरेंटी आहे का उत्तर देतीलच याचं.

**मा. महापौर :-**

सगळेच अधिकारी बाजुच्या रुममध्ये आहे तुम्हाला पाहिजे ते अधिकारी इथे हजर होतात आता घेवारे साहेबांना बोलावले ते २ मिनिटात इथे आलेच आहेत.

**लियाकत शेख :-**

नेक्स्ट टाईम इथे बसवून ठेवा ना.

**मा. महापौर :-**

मी तसं करु शकत नाही.

**लियाकत शेख :-**

का?

**मा. महापौर :-**

माझा अधिकार आहे आपण बसुन जा.

**दिलीप घेवारे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो सर्व्हे नं. ४७८ आणि ४८१ ही भाईंदर मौजे भाईंदर येथे ६०,००० स्क्वेअर फिट जागा आहे. आर.एन.ए. बिल्डरची, एस.के. स्टोनच्या पाठीमागची जी मोकळी जागा आहे. एस.के. स्टोनच्या समोर जो मिरारोडला रस्ता जातो, विरार स्टेशनकडे त्याच्या डाव्या बाजुची पत्रे लावलेली जागा तिथे एस.के. स्टोन बस स्टॉप अस लिहिलेल आहे. तिथे ६०००० मीटर जागा आहे. आणि ते टाऊन सेंटरच्या झोनिंगला आहे आरक्षणामध्ये नाही. शासनाने १३-९-२०१० ला एक नोटझोन काढलेला आहे. त्यानुसार त्या जागेवर आपल्याला ३० टक्के ॲमिनिटी बांधुन घेऊन आयुक्तांच्या अधिकारामध्ये कुठलीही महानगरपालिकेची जी आवश्यक आहे ॲमिनिटी बांधुन विनामुल्य विदाऊट कॉस्ट त्याच्याकडून बांधुन घेऊन त्याला विकास करण्याची परवानगी आहे अशा पध्दतीने आपण तिथे प्रशासकीय इमारतीचे नियोजन त्या बिल्डरने आमच्याकडे प्रस्ताव ४ दिवसांपूर्वीच दिलेले आहे अजुन ते अंतिम झालेले नाही. त्याच्या मंजुरीची प्रक्रिया सुरु आहे आणि दरम्यान २ दिवसांपूर्वीच आमदार साहेबांनी आणि महापौर मॅडमनी सी.एम. साहेबांची भेट घेतलेली आहे. पाणी पुरवठा योजनेसाठी आणि त्याच्यामध्येच हे प्रस्ताव होईल अशारितीने आपण हा प्रस्ताव केलेला आहे. आज या इमारतीचा एरिया ५०००० स्क्वेअर फिट आहे आणि तिथे ६०००० चौ.मी. मध्ये १८००० चौ.मी. जागा त्याच्याकडून विनामुल्य बांधुन घेतो सुमारे १,८०,००० फुट आणि आज आपले ५०००० जे आहे ते आमच्या साडेतीन पट प्रशासकीय इमारत मोठी होणार आहे. त्याच्यामुळे त्याच प्लानिंग २५ वर्षांकरिता २०० नगरसेवक होतील अस एवढा भव्य आपण हॉल बनवत आहेत. आमच हे सगळे प्लानिंग नवी मुंबई महानगपालिका ज्यांनी बांधली आहे आर्किटेक्ट हितेन शेट्टी त्यांच्याकडूनच आम्ही हे करतो परंतु ही प्राथमिक अवस्था असल्यामुळे आपण त्याची माहिती दिली नव्हती आणि त्याच्याबद्दल मा. महापौर मॅडमशीही आम्ही चर्चा केली आहे की, ज्यावेळेस हे मंजुर होईल त्यावेळेस आपणा सर्वांना ह्यची माहिती दिली जाईल आणि नक्कीच ते उद्घाटनाच्यापूर्वीच देण्यात येईल भुमीपूजनाच्या समारंभाच्या अगोदर. पूर्वी ठराव झालेला आहे "ज" च्या प्रस्तावानुसार आणि त्याबद्दल आम्ही मा. महापौर मॅडमशी बोललो होतो. आम्हाला हा ठराव रद्द करुन तुमचे जे काही आहे ते क्लिअर करुन देऊ असे त्यांनी सांगितले होते. त्यामुळे आम्ही हे करतो आणि अजुन हा अत्यंत प्राथमिक अवस्थेचा प्रस्ताव आहे. आणि सी.एम. साहेबांची डेट मिळाली ह्याला गती येऊन त्याच्यातील कायदेशीर कारवाई, परवानग्या पूर्ण केल्या जातील.

**जुबेर इनामदार :-**

साहेब म्हणजे तुम्ही प्राथमिक स्टेजवर असताना एकदम मग उद्घाटन समारंभामध्ये प्रशासनाचा भाग असणार आहे की नाही कारण मा. महासभेची मंजुरी घेतलेली नाही. हा धोरणात्मक निर्णय असणार आहे. प्रशासकीय इमारत बांधायची आहे मग ह्याच्यात प्रशासनाचा हिस्सा काय? प्रशासन ह्या उद्घाटन समारंभामध्ये त्यांनी पक्षाच्यावतीने त्यांनी कुठे जाऊन नारळ फोडावे. आमचे काही देणे घेणे नाही प्रशासन ह्याच्यात भाग घेणार आहे की नाही हे फक्त स्पष्ट करावे.

**मा. आयुक्त :-**

हा कार्यक्रम प्रशासनाचाच आहे. मा. मुख्यमंत्र्यांचा कार्यक्रम जो आहे तो महानगरपालिका मिरा भाईंदर साठीचा कार्यक्रम आहे. म्हणजे तो प्रशासकीय कार्यक्रम आहे. आणि आपल्याला आता घेवारे साहेबांनी एवढी प्रायमरी स्टेज काय आहे त्याच्यामुळे मी आपल्याला उत्तर दिले नाही की मा. आमदार आणि मा. महापौर यांनी दोन दिवसांपूर्वी जो मा. मुख्यमंत्री साहेबांकडून डेट घेतली आहे पाणी पुरवठा योजनेच गांभिर्य काय आहे या शहरामध्ये याची आपल्याला कल्पना आहे आणि दिड वर्षाच्या आतमध्ये पाणी देण्याची आमची तीव्र इच्छा आहे म्हणून आम्ही युध्द पातळीवर हे मंजूर करुन घेतले आहे आणि ६ महिन्यामध्ये ही पाणी पुरवठा योजना मंजूर करुन घेतली आणि आमच्या डोक्यामध्ये फक्त पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन करण्याचे प्रस्तावित होते मात्र आपल्या एम.आर.टी.पी. ॲक्टनुसार किंवा जी नियमावली आहे त्यानुसार आयुक्तांना ती ३० टक्के एखाद्या विकासकाकडून म्हणजे आपण आतापर्यंत फायर स्टेशन घेतल्या लायब्ररीज घेतल्या आहेत अनेक प्रकारच्या गोष्टी घेतल्या आहेत. नाट्यगृह घेतलेले आहे आता आपण परवा ते नाट्यगृहाचे उद्घाटन पण अशाच प्रकारे केलेले आहे त्यामुळे महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीकोनातून हा विषय घेतला असल्याकारणाने आम्ही मा. मुख्यमंत्री साहेबांना त्यामध्ये २-३ गोष्टींची विनंती केली आणि दरम्यानच्या काळात आपण आता जे म्हटलात की काय तुमची परिवहन सेवेची अवस्था झाली आहे. त्याबद्दल गटनेत्यांची बैठक बोलाविली. त्यानंतर आपल्या

बरोबर चर्चा करुन आम्ही बेस्टला पत्र दिले एस.टी महामंडळला पत्र दिले पण त्यांच्याकडून आम्हाला काही रिस्पॉन्स मिळाला नाही. या दृष्टीकोनातून मग मी पुन्हा मा. महापौर आणि आमदार साहेबांना विनंती केली की परिवहन सेवेची खुप दिवसेंदिवस बेकार परिस्थिती होत चालली आहे आणि आम्हाला जवळपास डिसेंबर, जानेवारी नविन प्रोसीजर करायला उजडणार आहे आपल्या १०० बसेस येऊन पडलेल्या आहेत तर त्याच्यातल्याच आपण या नागरिकांचे हाल होऊ नये या दृष्टीकोनातून २०-२५ बसेस या मिनी बसेस किंवा १० मिनी आणि १० मोठ्या अशा बसेस आणुन आपण आपल्याकडे पूर्वी ज्या ड्रायव्हर कंडक्टरनी या ठिकाणी काम केलेले आहे त्यांना आपण कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घेऊन २-३ महिन्यासाठी ही बस सेवा चालवु या उद्घाटनामध्ये उद्घाटन आपल्याला आनंद झाला पाहिजे की येत्या उद्घाटनामध्ये ४ उद्घाटन होत आहे आणि आम्ही बेकायदेशीर काम कधीच करणार नाही आणि आता घेवारे साहेबांनी सांगितल की दोन दिवसांपूर्वी आम्हाला मुख्यमंत्री साहेबांची एकतर डेट भेटत नाही मिळाली डेट आणि मिळाल्यानंतर त्याचा आता प्लान प्रोसेसिंग आम्ही जवळपास इथे काय करायचे नेमके म्हणून त्यांच सगळ चालु आहे आणि आपण जे म्हणताय की मनपाची प्रशासकीय इमारत आपल्याला विश्वासात घेतल्या शिवाय होणार नाही कारण त्यांच प्लानिंग सगळ चालु आहे सगळ्या गटनेत्यांबरोबर बैठक घेणार आता हे भूमिपूजन आहे आणि त्याचे आराखडे तयार होऊन आल्यानंतर मंजुरी वगैरे हे सगळी प्रोसेस आम्ही तुमच्यासमोर आणु. आज बटण दाबलं की इमारत उद्या सकाळी उभी राहणार अस नाही कारण योगायोगाने पाणी पुरवठा योजनाचे महत्व लक्षात घेऊन साहेब येतात तर आपण त्या कार्यक्रमामध्ये हा कार्यक्रमाचे उद्घाटन, भुमीपुजन करतोय इमारतीचे उद्घाटन तर आपल्याला नंतर करायचे आहे आणि ही इमारत तयार होत असताना सगळ्या गटनेता बरोबर चर्चा करुन कोणत्या माळ्यावरती प्रशासकीय, प्रशासनाचा कसा असावा. कुठे महापौर बसतील, कुठे उपमहापौर, गटनेते कुठे असावे, सभापतीला केबीन कुठे ही सगळी चर्चा आपल्या सोबत केल्यानंतरच आपण प्लान मंजूर करणार आहोत. त्यामुळे याच्यामध्ये शंकाकुशंका आणण्याचे काही कारण नाही असे मला वाटते.

**वंदना चक्रे :-**

मा. आयुक्त महोदय, आपण चांगले बोलले मागच्या वेळी नाट्यगृहाचे उद्घाटन झाले त्यावेळी असे लक्षात आले की, आमच्या मिरा भाईंदर शहराची परिस्थिती अशी होती की हा पक्षाचा कार्यक्रम आहे की नक्की महानगरपालिकेच्या माध्यमातून घेतला आहे असे तिथे चित्र होते तर आता येणाऱ्या उद्घाटनामध्ये पण तस होणार का? त्या ठिकाणी आयुक्त महोदय महापौर मॅडम आपण आधी बोलला होता नाट्यगृहाचे उद्घाटन करायचे त्याचा विचार नाही करायचा उद्घाटन कुठे होते मिटींगचे कार्यक्रम कुठे होतात. आम्ही सदस्य नगरसेवक आहोत कॉंग्रेसचे, राष्ट्रवादीचे आणि इतर पक्षाचे त्यांनी कुठे जावे काय करावे कस करावे. त्या दिवशी दोन्ही पक्षाचे नेते मान्यवर आले होते आणि बाकीचे सदस्य नगरसेवकांना बसायला एका साईटला दिले होते आणि तिथे असं वाटत होते ती परिस्थिती बघितली तर सन्मा. सदस्यांना मी विनंती करते की जे-जे त्या ठिकाणी कार्यक्रमाला उपस्थित नव्हते किंवा आले नव्हते त्यांना मी सांगु इच्छिते की त्या दिवशीची परिस्थिती जी मी पाहिली डोळ्यांनी ती फार आगळीवेगळी होती अस लक्षात आल की त्या दिवशी दोन पक्षाचा कार्यक्रम आहे का? त्या दिवशी नाव ठाकरे साहेबांचे देण्याचे ठरले आणि महापौर मॅडमने लगेच चेंज केले की अब्दुल कलाम साहेबांच आम्ही अब्दुल कलाम साहेबांचा अपमान करत नाही ते तसे होते. परंतु ज्या वेळेला ज्यांच्या नावाचा उल्लेख केला ज्यांच्या नावाचे ठरले होते त्यांच्याच नावाच तिथे व्हावे ही आमची मागणी आहे आणि अब्दुल कलाम साहेब आम्ही त्यांचा सन्मान करतो ते काम करत असताना त्यांचे तिथे निधन झालेले आहे. तर माझी आपणांस विनंती आहे तस आयुक्त महोदय होणार का? महापौर मॅडम तस होणार का? उपमहापौर तुम्हालाही विचारते तुम्ही पण याकडे गंभीर लक्ष द्या. आपण इमारत बांधणार आहात मंत्री महोदय इथे येतात त्यांना विश्वासात घेतले नाही काहीच नाही आणि तुम्ही लगेच त्याचे उद्घाटन करायला निघालेत या मिरा भाईंदर शहराचा विकास संपूर्ण कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने झालेला आहे. आता जे राहिलेले काम आहेत वरचे ते तुम्ही करत आहात. विसरु नका या शहराचा विकास कोणी केला आहे. महापौर मॅडम माझ्याकडे लक्ष द्या आणि माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या. आयुक्त महोदय मला उत्तर द्या त्या दिवशी झालेला कार्यक्रम खरा कसा होता दोन पक्षाचा होता का सेना भाजपचा होता का महानगरपालिकेतील सदस्य त्यात समावेश होते की नाही हे उत्तर मला द्यावे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय चांगला विषय आहे. १८०००० स्क्वेअर फुटची आपल्याला भव्य इमारत मोफत बांधून मिळणार आहे चांगली गोष्ट आहे. आम्ही त्याचा विरोध करुच शकत नाही आणि करणारही नाही. एक चांगली इमारत एक चांगली वास्तु या शहरामध्ये निर्माण होईल माझा फक्त आयुक्त महोदय एक छोटासा प्रश्न आहे शहराचा धोरणात्मक निर्णय आहे. आमदार विकास निधीमधून आरक्षणामध्ये कम्युनिटी हॉल बांधायचा असेल तर त्याला महासभेची मंजूरी पाहिजे असा ठराव केला जातो इतके भव्य तुम्ही इमारत उभी करायला निघालात भुमीपुजन सुध्दा करताना तुम्हाला त्याची ह्या धोरणात्मक निर्णयाला तुम्हाला महासभेची मंजूरी नको हवी होती का? अनेक प्रश्न असे आहेत त्याची प्रशासकीय मंजुरी देऊन झालेली आहे त्या कामाला गती आलेली आहे त्यांनी यावे मुख्यमंत्र्यांचे स्वागत आहे त्यांनी ते कार्यक्रम केले पाहिजे जसं तुम्ही सांगितले आम्ही त्यांच्यासाठी त्यांना बोलावणार होतो. हा एक नविन पायंडा आहे. त्याच्यामध्ये त्याची तांत्रिक बाबी तपासा त्याचे नियमाची बाबी तपासा त्यानंतर या कार्यक्रमाला प्रशासनाने हात घालावा ही माझी तुम्हाला विनंती आहे. बसेस सेवा संदर्भात आता कस आहे प्रशासन उत्तर देत नाही. प्रॉब्लेम तो होतो आमचा जे काही

२०,२५,५० बसेस आपल्याला चालवायची आहेत ते ही डायरेक्ट तुम्ही तुमच्या स्तरावर करु शकता का? त्याच्यासाठी तुम्हाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल विशेष सभा लावली जाते ज्वलंत विषयासाठी. हे ज्वलंत विषय होते याच्यासाठी खरोखर बोलवायला पाहिजे होती ते विषय बाजुला ठेवले डावलले आणि नको ते विषय भरुन ही अशी विशेष सभा बोलाविली जाते. आयुक्त महोदय तुम्ही प्रशासनाचे हेड आहात कोणी कुठे चुकत असेल कितीही अनुभवी असला तरी तुम्ही त्याला व्यवस्थित दिशा दिली पाहिजे हीच आमची तुम्हाला विनंती आहे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने, याच विषया संदर्भात मी तुम्हाला सांगतो साहेब तुम्ही आता भूमीपूजन कराल म्हणजे तिकडे आपण वास्तू कोणत्या स्वरुपात उभी करणार त्याचं चित्र तर असेल ना किंवा ते कशा पध्दतीने करायचं त्याच्या सूचना साहेब आमच्याकडून मागविल्या असत्या आमच्या काही सूचना तुम्ही बघितल्या असत्या तर आम्हाला आणखी आनंद वाटला असता. परंतु कुठल्याही बाबतीत तुम्ही आमचा विचार नाही करत. भले ती आर्थिक बाब असो ती आर्थिक बाब त्या बिल्डरने घेतली असेल परंतु मंजूरी देताना महासभेची मंजूरी आवश्यक असते असे आपल्या घटनेमध्ये असा उल्लेख पण आहे.

**मा. महापौर :-**

सुहासजी आपल्याला आताच सांगितले की ते एकदम प्राथमिक ...................

**सुहास रकवी :-**

अहो, प्रायमरी स्टेजला आहे मग तुम्ही लास्ट स्टेजला जाणार नाही का? तुमचा विचार काय तुमच्या योजना असतील ना म्हणजे तुम्ही प्रायमरी केल्यानंतर बंद होणार आहे का.

**मा. आयुक्त :-**

तसे आपल्याला विश्वासात घेतल्याशिवाय त्याची ....................

**सुहास रकवी :-**

आमचे एकच म्हणणे आहे असा उद्या आम्हाला कोणी प्रश्न विचारला की तिथे भूमिपूजन होणार आहे त्याची माहिती द्या तर आम्ही काय उत्तर देणार आम्हाला काहीच माहिती नाही.

**मा. आयुक्त :-**

भूमिपूजन होण्याच्या अगोदर उत्तर माझ्याकडून सगळ १०० टक्के देणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, सभागृहाने तहकूबची भूमिका घेतली त्यामध्ये आम्ही सत्ताधाऱ्यांना विश्वासात घेऊन सांगितले २-४ महत्वाचे विषय आहेत ते आपण घेऊ आणि सभा पुढे तहकूब करुया. मला जुबेर इनामदारजींना हेच सांगायचे आहे ॲम्युनिटी स्पेस या जागा बिल्डरच्या मार्फत विकास होत असेल किंवा एखाद्या बिल्डरकडून आपल्याला होत असेल तर त्याला आर्थिक प्रशासकीय मान्यता लागत नाही म्हणून ते सभागृहापूढे येत नाही. राहिला प्रश्न आयुक्त साहेबांनी जे सांगितले की आपण त्या इमारतीचे त्या ठिकाणी भूमिपूजन करत आहोत आणि एवढी मोठी २००००० फुटाची इमारत आपण २ बी.एच.के. च्या डिझाईन वेळोवेळी चेंज करतो. वेळोवेळी ते चेंज होणारच आहे. उद्या सभागृहामध्ये ते ठरलं तरी ते प्रोग्राम चेंज होणार आहे. आपल्या माहितीसाठी जस्ट सांगतो राम नगरला एक इमारत बांधली आहे त्याचे काही धोरणात्मक................

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

१ रुपया खर्च न होता महानगरपालिकेला एवढी मोठी इमारत बांधकामासाठी देणे ते मला बंधनकारक आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही पहिलेच सांगितले आम्ही जो निर्णय घेतो तो जबाबदारीने घेतो. आणि मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे हा नगरपालिका खाते त्यांच्याचकडे आहे. नक्कीच ते आपण जे करणार ते सगळे बघूनच ते येणार आहे. नाहीतर मुख्यमंत्री पण त्या कार्यक्रमात येणार नाही. त्याच्यापेक्षा अजुन मोठा शिक्का तुम्हाला कोणता पाहिजे मुख्यमंत्री व त्याचे डिपार्टमेंट यु.डी. ते सगळ तपासणारच आहे की आम्ही जे केलेले आहे सभागृहाने किंवा आयुक्त महोदयांनी ते नियमात आहे की नाही त्याला सर्टिफिकेट मिळणारच म्हणजे आपण एखादे चुकीच घडल तर नगरविकासकडेच तक्रार करतो ना तो डिपार्टमेंट नक्की करणार आहे ना आणि आपल्याला ................

**भगवती शर्मा :-**

प्रशासन उत्तर देता ही नही। मेहताजी हर बार उत्तर देते है हमको उत्तर प्रशासन से चाहिए।

**मा. महापौर :-**

आपको उत्तर प्रशासनने भी दिया और आप सभी लोग प्लीज बैठ जाईए।

**नरेंद्र मेहता :-**

तो विषय होईल त्यावर परत आपण बोलु आता आमची सभागृहाला ही विनंती आहे की आजचे जे ठराविक महत्वाचे चार विषय जे आहेत.

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम ॲम्युनिटी ओपन स्पेसमधून आपण नाट्यगृहाचे उद्‌घाटन महानगरपालिकेने मागच्या वेळी केलेले आहे. महानगरपालिका ॲम्युनिटी ओपन स्पेसमध्ये नाट्यगृह बांधून घेण्याचे उध्दवजी ठाकरे साहेबांच्या हस्ते उद्‌घाटन केले आणि तिथे तावडे साहेब आपले शिक्षण मंत्री मा. मंत्री त्या ठिकाणी अध्यक्ष म्हणून होते आणि सर्व सन्मा. नगरसेवकांना सर्वांना पत्रिका महानगरपालिकेने पाठविल्या होत्या. त्यामुळे ते उद्‌घाटन पूर्वीच झालेले आहे. थोड्याच दिवसात काम चालु होईल ते आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या मनात जी शंका आहे तर असा भव्य कार्यक्रम मा. मुख्यमंत्री साहेबांचा करु की आपण असा कार्यक्रम यापूर्वी कधीच पाहिला नसेल अशा पध्दतीचा कार्यक्रम करु त्याची शंका मनात आणू नका.

**वंदना चक्रे :-**

साहेब, माझा प्रश्न असा होता की तिथे पक्षवादी कार्यक्रम आहे महानगरपालिकाचे सन्मा. सदस्य जे निवडून आलेले आहेत तुम्ही त्यावेळेला तिथे तशी परिस्थिती नव्हती का? सेना-भाजप, सेना-भाजप हेच चालले होते.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल भोसले :-**

मा. जुबेर इनामदारजी महाराष्ट्र के मुख्यमंत्री देशमुख साहब आए तब सभीको नही बुलाया गया था। भुल गए।

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो मागच्यावेळी नाट्यगृहाचा जो कार्यक्रम झाला त्याचप्रमाणे आजचा हा आता मा. मुख्यमंत्री येणार आहेत आपल्या प्रशासकीय इमारतीचा कार्यक्रम होणार आहे. एकच विनंती आहे प्रशासनाला सर्व नगरसेवकांना हा फक्त उद्‌घाटनाचा कार्यक्रम आहे. भूमीपूजन म्हणजे फक्त भूमीपूजनच होणार. सगळ्यांना एक विनंती आहे माझी तिथे कोणी नामकरणाचा विषय करु नका कारण आपल्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमात नामकरणाचा कार्यक्रम पण होऊन जातो त्यासाठी फक्त भूमिपूजनाचा कार्यक्रम करा तिथे ओघाओघाने कोणतरी बोलुन जातो की इमारतीला हे नाव द्या त्याला ते नाव द्या मग प्रशासनाची आणि सगळ्यांची फार अडचण होते. नामकरणाचा विषय असेल तर सगळ्यांच्या संमतीने निर्णय घ्यावा.

**मा. महापौर :-**

उपमहापौरजी मी आपल्याला एक सांगु इच्छिते की तेव्हा मी विनंती केलेली नामकरण केले नव्हते.

**सुहास रकवी :-**

मॅडम तुमच्या पत्रिकेवर तस नाव होत.

**मा. महापौर :-**

आपण ते दाखवा मग बोलुया.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम, सभागृहाला आम्ही विनंती केली आहे की, त्यांची इच्छा कशी आहे तुम्ही ऐकले नाही कदाचित की आपण तहकूब सांगितल आम्ही सांगितल चालवायची नंतर चर्चा होणार महत्वाचे ३-४ विषय आहेत. या विषयावर आपण चर्चा करुन सभा तहकूब करुया तुमच्या संमतीने. तुमची संमती नसेल तरी आम्ही बहुमत...............

**भगवती शर्मा :-**

आम्हाला चालवायची आहे.

**शबनम शेख :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते, आपण जेव्हापासून या पदावर आला आहात. आपणासाठी हा सभागृह आणि सभागृहातील सर्व सदस्य एकसमान आहेत. माझ्या निदर्शनास असं आल आहे की जेव्हापासून या पदावर आला आहात सत्ताधारी पक्ष आणि मी विशेष करुन मा. नरेंद्रजी मेहता यांचा उल्लेख करु इच्छिते की जेव्हा-जेव्हा ते हात वर करतात त्यांना आपण विशेष संधी देतात आणि मनसोक्त बोलु देता माझी आपणास आग्रहाची विनंती आहे ही की ह्या सभागृहात दुजाभाव किंवा मतभेद करु नये कारण मी पाहत आहे आपण पदावर आल्यापासून मी ऑब्झर्व्ह करते इकडे आणि जेव्हा विरोधी पक्ष आपणासाठी जेव्हा विनंती करतो की आम्हाला बोलु द्या आपण पटकन सहजतेने बोलुन जातात मी आपणावर आरोप करीत नाही. बसुन जा, आपण एकदाही त्यांना म्हटल नाही की बसुन जा आपण हा मतभेद का करता?

(सभागृहात गोंधळ)

**शबनम शेख :-**

आजच जीवंत उदाहरण आहे. सकाळपासून ते पाच वेळा बोलले. आपण त्यांना अगदी बेझिजक इजाजत दिली. एकदा दोनदा ठिक आहे मात्र आमचा विचार करता आपण.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

ते उठून बोलले कारण मी तुम्हाला संधी दिली म्हणून तुम्ही मला हे प्रश्न विचारले. रेशो बघणार तर आमच्या पक्षाची भूमिका एक किंवा सभागृह नेते बोलणार एक किंवा दोन व्यक्ती बोलणार. आमचे कुठलेही

सदस्य उभे राहून बोलत नाही. सगळ्या पक्षाची भूमिका दोन व्यक्ती मांडतात तुमच्याकडे आणि तुमचा रेशो बघणार तर तुमच्याकडून १० माणूस बोलतात.
(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या सात (७) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन सात (७) सदस्यांची नेमणूक करणे. तसेच स्थायी समितीच्या तीन सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये तीन (३) सदस्यांची नेमणूक करणे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
२) डॉ. राजेंद्र भ. जैन -- भारतीय जनता पार्टी
३) श्री. अश्विन श्यामजी कासोदरीय -- भारतीय जनता पार्टी
४) श्रीम. मंदाकिणी आत्माराम गावंड -- शिवसेना
५) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगांवकर -- शिवसेना
६) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील -- भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी
७) श्री. हंसुकूमार कमलकुमार पांडे -- भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्रीम. वंदना मंगेश पाटील -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
२) श्री. मोहन जाधव -- भारतीय जनता पार्टी पुरस्कृत
३) डॉ. नयना वसाणी -- भारतीय जनता पार्टी स्थायी समिती सदस्यांपैकी निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत. १) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २) डॉ. राजेंद्र भ. जैन - भारतीय जनता पार्टी ३) श्री. अश्विन श्यामजी कासोदरीय - भारतीय जनता पार्टी ४) श्रीम. मंदाकिणी आत्माराम गावंड - शिवसेना ५) श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगांवकर - शिवसेना ६) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी ७) श्री. हंसुकूमार कमलकुमार पांडे - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी तसेच ३ सदस्यांनी राजीनामे दिले आहेत त्यांची नावे १) श्रीम. वंदना मंगेश पाटील - राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी २) श्री. मोहन जाधव - बहुजन विकास आघाडी ३) डॉ. नयना वसाणी - भारतीय जनता पार्टी स्थायी समितीमध्ये जे ८ सदस्य निवृत्त झाले आहेत त्यांच्या ठिकाणी त्याच पक्षाच्या ८ सदस्यांची नावे द्यायची आहेत तसेच ज्यांनी राजीनामा दिलेला आहे त्याच पक्षाच्या सदस्यांची नावे उर्वरित कालावधीसाठी द्यायची आहे.

**मा. महापौर :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ अन्वये, मा. स्थायी समितीच्या रिक्त सदस्यांच्या जागी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०,५ अन्वये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने खालीलप्रमाणे सदस्यांची नेमणूक करण्यात यावी. १) डिसा मर्लिन मर्विन आणि बगाजी शर्मिला. राष्ट्रवादीचे १) वेंचर मेन्डोंसा २) रविंद्र माळी भारतीय जनता पार्टीचे १) शरद पाटील २) दिनेश जैन ३) रवि व्यास ४) मोहन जाधव शिवसेनेचे १) प्रभाकर म्हात्रे २) हरिश्चंद्र आमगावकर. सर्व नविन सदस्यांचे अभिनंदन.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, ही सदस्यांची नियुक्ती किती काळासाठी आहे.

**नगरसचिव :-**

२ वर्षांसाठी आहे. जे निवृत्त सदस्य आहेत त्यांच्या जागी जे सदस्य आलेले आहेत ते २ वर्षांच्या कालावधीसाठी.

**मा. महापौर :-**

जे राजीनामाच्या जागी आले आहेत ते ॲड. रवि व्यास आणि मोहन जाधव.

**प्रकरण क्र. ९० :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या सात (७) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन सात (७) सदस्यांची नेमणूक करणे. तसेच स्थायी समितीच्या तीन सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये तीन (३) सदस्यांची नेमणूक करणे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

१) श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे -- राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
२) डॉ. राजेंद्र भ. जैन -- भारतीय जनता पार्टी
३) श्री. अश्विन श्यामजी कासोदरीय -- भारतीय जनता पार्टी
४) श्रीम. मंदाकिणी आत्माराम गावंड -- शिवसेना

५)	श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगांवकर -- शिवसेना
६)	श्रीम. प्रभात प्रकाश पाटील -- भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पार्टी
७)	श्री. हंसुकूमार कमलकुमार पांडे -- भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पार्टी

राजीनामा दिलेल्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे :-

३)	श्रीम. वंदना मंगेश पाटील -- राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी
४)	श्री. मोहन जाधव -- भारतीय जनता पार्टी पुरस्कृत
३)	डॉ. नयना वसाणी -- भारतीय जनता पार्टी

**ठराव क्र. ६१ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१५ च्या पहिल्या तारखेस निवृत्त होत आहेत. यापैकी श्रीम. वंदना मंगेश पाटील (राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी) यांनी दि. ०६/१२/२०१४ रोजी स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.

उर्वरीत आठ सदस्यांपैकी १) श्री. मोहन जाधव (भारतीय जनता पार्टी पुरस्कृत) व २) डॉ. नयना वसाणी (भारतीय जनता पार्टी) यांनीदेखील आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे. करिता त्यांचे रिक्त जागी उर्वरीत कालावधीसाठी दोन सदस्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी २, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी २, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस २ व शिवसेना २ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व राजीनामा दिलेल्या दोन सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची दोन वर्षाकरीता नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्री. दिनेश तेजराज जैन | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | शिवसेना |
| ४. | श्री. हरिश्चंद्र रामचंद्र आमगांवकर | शिवसेना |
| ५. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेंडोंसा | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ६. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ७. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये राजीनामा दिलेल्या दोन सदस्यांच्या जागी एक वर्षाकरिता नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | ॲड. रवि व्यास | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्री. मोहन जाधव | भारतीय जनता पार्टी |

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१, महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणुक करणेबाबत.

**शरद पाटील :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व ३१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतुद आहे. मनपामध्ये महिला व बालकल्याण समिती १५ सदस्यांची गठित करण्यात आली होती. त्यानुसार समितीचे सभापती व उपसभापती यांची निवड करण्यात आली व संपूर्ण वर्षभर चांगल्याप्रकारे कामकाज झाले. महापालिकेने यापूर्वी सभाकाम नियमांचे प्रारुप उपविधी तयार केली आहे. परंतु अद्यापर्यंत सदर उपविधीस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली नाही. सदर प्रारुप उपविधीमध्ये सदस्यांची संख्या ९ आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(७) अन्वये समितीमध्ये रचना करण्याचे अधिकार महासभेस आहेत. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे व उपरोक्त कलमान्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे पुढील वर्षासाठी १५ सदस्यांची समिती गठित करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळ प्रमाणे तौलानिक संख्यानुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत, असा ठराव मांडत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | फ्रंट/आघाडी |
|---|---|---|
| १ | श्रीम. वर्षा भानुशाली | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. दिपीका अरोरा | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्रीम. सुनिला शर्मा | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. डिंपल मेहता | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. मेघना रावल | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. जयमाला किशोर पाटील | शिवसेना |
| ७ | श्रीम. शुभांगी महिन कोटीयन | शिवसेना |
| ८ | श्रीम. भावना राजु भोईर | बहुजन विकास आघाडी |

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने महिला व बालकल्याण समितीवर सदस्य नेमणूकीचा विषय मा. महासभेपुढे प्रस्तावित केला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २९ चे कलम ४५४ ते ४५७ अन्वये प्रारुप उपविधी २००२ व त्याचे मर्यादित नियम तयार केलेले आहेत. प्रारुप उपविधी २००२ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांना अधिन राहूनच मसुदा तयार केलेला आहे. प्रारुप उपविधी २००२ व त्याच्या मर्यादित नियमाच्या आधारे मा. विशेष समितीची स्थापना व कामकाज ४(अ) व (ब) प्रमाणे दिर्घ काळापासून करत आहे. तसेच सभा कामकाज उल्लेखनिय लक्षवेधी प्रश्न उत्तरांचा निश्चित काळ व इतर शिस्तीचे कामकाज उपविधी २००२ प्रमाणे केले जाते. सदरच्या उपविधीमध्ये भर घालण्याचा फेरफार करण्याचा असल्यास अधिनियमांचे कलम ४५७ अन्वये करायचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिकेच्या अधिनियमाचे कलम ४५७(२) अन्वये समितीची रित व गणसंख्या निश्चित करुन कलम ४५५ नुसार कार्यपध्दत अवलंबून प्रारुप उपविधी २००२ व त्याच्या मर्यादित नियम महाराष्ट्र शासन राजपत्र व असाधारण जुन १२/२००२/जेष्ठ/२२, शके १९२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले व आज वर्तमान परिस्थितीत अधिनियम व प्रारुप उपविधीच्या नियमाप्रमाणे पालिका सभा कामकाज करत आहे व समितीतील सदस्यांची गणसंख्याही निश्चित आहे.

ज्याअर्थी महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची संख्या निश्चित आहे व त्याअर्थी पक्षाच्या संख्याबळानुसार नऊ सदस्य संख्या असलेली समिती गठित करण्यात यावी.

संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | २८<br>---- X ९ = २.७३<br>९२ |
| २ | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २७<br>---- X ९ = २.६४<br>९२ |
| ३ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १९<br>---- X ९ = १.८५<br>९२ |
| ४ | शिवसेना | १५<br>---- X ९ = १.४६<br>९२ |
| ५ | बहुजन विकास आघाडी | ३<br>---- X ९ = ०.२९<br>९२ |

प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलानिक संख्याबळातुन पुर्णांकाच्या आधारे प्रथमपक्ष गटनिहाय नेमणूका करावे.

| | | |
|---|---|---|
| १. | भारतीय जनता पार्टी | ०३ |
| २. | राष्ट्रवादी कॉंग्रेस | ०३ |
| ३. | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ०२ |
| ४. | शिवसेना | ०१ |
| ५. | बहुजन विकास आघाडी | ०० |

तसेच सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी सदस्य संख्येप्रमाणे आपल्या सदस्यांच्या नावांची नेमणूक करुन घोषीत करावे असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

आमची २ नावे देण्यात आली आहे. श्रीम. मनिषा पिसाळ व कांचन पुजारी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्री. शरद पाटील व अनुमोदन राकेश शहा. दुसरा ठराव सूचक श्री. जुबेर इनामदार अनुमोदन श्री. वंदना चक्रे.

**भगवती शर्मा :-**

मतदान होना आवश्यक है क्या यह?

**मा. महापौर :-**

भगवतीजी जब दो ठराव आते है तब मतदान तो होता है।

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम प्रशासनने गोषवारा दिया है और गोषवारा देते टाईम उन्होंने महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम के अंतर्गत ....................

**मा. महापौर :-**

भगवतीजी मैंने आपको पहले भी कहाँ है की मतदान होने दिजीए फिर आपको जो कहना है वो मतदान की प्रक्रिया शुरु हो गई है दोनो ठराव आ गए है। प्लीज बैठ जाइए।

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने फक्त जे नियमात आहे तेच करावे नियमाप्रमाणे गोषवारा प्रशासनाने दिला आहे कुठलही रदद्वद बादल करायचं असेल तर कार्यपध्दत अवलंबवावी लागेल अस थातुर मातुर ठराव करुन चालत नाही.

**नगरसचिव :-**

दुसरा ठराव मतदानास टाकत आहे. श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. पहिला ठराव मतदानास टाकत आहे. श्री. शरद पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. शरद पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ४०, विरोधात ३४ इतकी मते पडली आहेत. श्री. शरद पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे. भारतीय जनता पार्टीने दिलेली नावे श्रीम. वर्षा भानुशाली, श्रीम. दिपीका अरोरा, श्रीम. सुनिला शर्मा, श्रीम. डिंपल मेहता, श्रीम. मेघना रावल. शिवसेनेने दिलेली नावे श्रीम. जयमाला पाटील, श्रीम. शुभांगी कोटियन, राष्ट्रवादी पक्षाने चार सदस्यांची नावे द्यायची आहेत आणि कॉंग्रेस पक्षाने तीन सदस्यांची नावे द्यायची आहेत. बहुजन विकास आघाडी पक्षाने एका सदस्याचे नाव द्यायचे आहे.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम प्रशासन की तरफ से महिला व बालकल्याण समिती के लिए गोषवारा लेट आया लेकिन आया उसके अंदर जो लिखा है वाक्य वो पढके सुनाना चाहता हूँ क्योंकी प्रशासन हमेशा जो गोषवारा देता है वो कानुन को मध्य नजर रखते हुए देता है कईबार हम लोग "ज" के प्रस्ताव रखते है। जिनके उपर प्रशासन अंमलबजावणी नही करने का तहत कारण नही होता है वो बोलते है यह अशासकीय ठराव है तो महिला बालकल्याण समिती की जो नियुक्तीयाँ होनी थी उसके लिए प्रशासन ने जो गोषवारा दिया महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३१ (अ) तरतुदी अनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतुद आहे. महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची गठित करण्याकरिता खालीलप्रमाणे आजमितीस असलेल्या सदस्य संख्या व तौलानिक संख्या निश्चित करण्यात येत आहे. संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे आहे भारतीय जनता पार्टी २.९३, राष्ट्रवादी कॉंग्रेस २.५४, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस १.६६, शिवसेना १.४६, बहुजन विकास पार्टी ०.२९ वरील प्रत्येक गटाचा तौलानिक संख्याबळातून पुर्णांकाच्या आधारे प्रथम पत्र गटनिहाय नेमणूक करण्यात प्रस्थापित भारतीय जनता पार्टी ३, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस २, शिवसेना १, बहुजन विकास पार्टी ० अभी भारतीय जनता पार्टी द्वारा इसके अंदर में फेरफार करते हुए १५ का सदस्य की नेमणूक करने का ठराव किया इसके पिछले बार भी महापौर मॅडम, उन्होंने ठराव किया था। जिसका हमने अपोज किया था लेकिन उस समय में भी वो समिती गठित करने के लिए उन्होंने प्रेशर किया और वो गठित किया। लेकिन उसके उपर में भी तब हमने उसको विखंडीत के लिए कहाँ था। और विखंडीत करने के लिए उस समय हमने तत्कालीन महापौर कॅटलीन परेराजी को पत्र दिया था। उन्होंने भी प्रशासन को पत्र दिया था लेकिन वो पत्र आगे विखंडीत को गया था लेकिन उसका कुछ जवाब नही आया इसके पहले भी मैं आपको २००७-०८ इसके पहले भी कई बार ऐसी घटना घडी एकबार २१ का ठराव आया था। एकबार २५ का आया था। उस समय

भी तत्कालीन आयुक्तजीने उस ठराव को मा. प्रधान सचिव को भेजा था और प्रधान सचिव को भेजने के टाईम में उन्होंने स्पष्ट लिखा था की मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उपविधी नियम २००२ च्या तरतुदीमध्ये असा बदल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ च्या राज्यशासनाची मंजुरीच्या आणि पूर्वप्रसिध्दी नंतर नियम करण्याच्या शर्तींना अधिन आहे. नियमामध्ये केलेला बदलाव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ प्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे. तोपर्यंत महिला बालकल्याण समिती गठित होऊ शकत नाही. तरी अस्तित्वातील नियमाप्रमाणे सदस्य संख्या ९ ग्राह्य धरुन समिती रचना करता येईल किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करावे. उस समय भी आयुक्त साहबने यह पत्र दिया था उसके बाद भी पब्लिकेशन करने के लिए नोटिफिकेशन हुआ था लेकिन उसको अंतिम मंजुरी नही मिली थी। उसके बाद वो ९ सदस्य की गठित हुई मुझे आपके माध्यम से निवेदन करना है की इसके अंदर मैं कायदे के हिसाब से यह संख्या ९ की ही गठीत हो सकती है इसलिए अगर इसको ऐसे ठराव के अंदर के अंदर में करके हमने एक ठराव किया इन्होंने एक ठराव किया इस वक्त के पहले भी एकबार महिला बाल कल्याण पेंडींग में रह चुकी थी। ६-६, ८-८ महिना गठित नही हुई मेरा आपसे निवेदन है की कानुन के अनुसार ९ सदस्य की महिला समिती गठित करने के लिए मंजुरी दे कर के प्रस्तावित जो नाम है उनके अनुसार गठित करे अन्यथा इसको प्रशासन के पास में विखंडीत करने के लिए भेज दे।

**नगरसचिव :-**

श्री. राजू यशवंत भोईर, सदस्य स्थायी समिती यांनी पत्र दिलेले आहे. गटनेता म्हणून बहुजन विकास आघाडीचे गटनेता ते त्यांनी प्रती महापौर साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिका, महिला व बालकल्याण समिती सदस्य नाव निर्देश करणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, महिला बालकल्याण समिती व सदस्य संख्या हे कुठून निश्चित झाली ते एक महत्वाचे आहे. त्या आधारावर प्रशासनाने आपल्याला गोषवारा पाठवलेला आहे. आपला कामकाज चालतं आपल्या ग्रंथ आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम त्या ॲक्ट ज्या आहेत म्हणजे अधिनियम ज्या आहेत आपल्याला नियम परत तयार करायची, आपल्याला नियम तयार करावे अशी आपल्याला त्याच्यामध्ये सूचना आहे. आणि त्याला अधिकार दिला. अधिनियमामध्ये प्रकरण २९ नियम उपविधी दिलेली आहे. मा. स्थायी आदेश वेळोवेळी सुधारण्यात आलेले अनुसूची (ड) कसे कामकाज चालले पाहिजे महानगरपालिकेचे, सभागृहाचे कसे चालले पाहिजे, समितीचे कसे चालले पाहिजे त्याची सुचना आपल्याला अनुसूची (ड) मध्ये नियम आहे. अधिनियमाचा भाग असा आहे असे मानले जाईल. म्हणजे नियम अधिनियमाचा भाग आहे. उपविधी तयार केली ४५४ अन्वये उपविधी तयार झाली ४५७ अन्वये त्याच्यामध्ये कुठल्या समित्या असतील, समित्यांमध्ये गणसंख्या किती असे, हे सगळे निश्चित केल्यानंतर ही उपविधीला मान्यता प्राप्त झाली. राजपत्रामध्ये प्रसिध्दी करण्यात आली आणि पालिकेचे कामकाज त्या आधारावर त्यांनी फक्त महिला बालकल्याण नाही पूर्ण महानगरपालिका कशा पध्दतीने चालली पाहिजे त्या अधिनियमाच्या अधिनियमाचा भाग आहे. आपल्याला काहीही करता येईल महासभा आहे. महासभेला अधिकार बहुसंख्येने ठराव करायचा. तुम्ही ९,१०,१५ करा. २० करा, २५ करा, १०० करा मात्र त्याच्या कार्यपध्दतीला अवलंबल्यानंतर उपविधीमध्ये कुठल्याही तुम्हाला वाढ किंवा घट किंवा कुठलाही बदल, कुठल्या समितीच्या कामकाजामध्ये बदल करायचा असेल तुम्हाला परत हा विषय ठरावाद्वारे हरकती सूचना मागविल्यानंतर तुम्हाला परत महासभेची मंजूरी घेऊन शासनाकडे पाठवावे लागेल. शासनाची मंजूरी आल्यानंतर तुम्हाला अंमजबजावणी करता येते. नाहीतर तुम्हाला करता येत नाही. हा नियम बाह्य काम आहे. आपण याची मान्यता दिली नाही. याला मान्य केल नाही. म्हणजे उपविधी मूळच्या संख्येला याचा अर्थ आपण उपविधी मानत नाही आणि उपविधी मानत नाही याचा अर्थ प्रश्नोत्तर तास उद्‌भवतात किती तास चालेल "ज" चे प्रस्ताव किती असावेत अधिनियमामध्ये लक्षवेधी हा विषय नाही आहे. नियमामध्ये उपविधी आहे आणि असे चालले तर महापालिकेच्या सदस्यांचे खर तर लोकतांत्रिक अधिकार जो आहे तो हिसकाऊन घेण्यासारखा होतो. संविधान अधिकारही आपल्याला लक्षवेधी आपल्याला मांडता येणार नाही. प्रश्नोत्तर तास, तासनी तास तुम्हाला चालवावे लागतील. बाकीचे कामकाज सगळेच तुम्हाला बंद करावे लागतील म्हणून महापौर मॅडम, माझी आपल्याला विनंती आहे. आयुक्त महोदय आपल्याला ठराव आलेले आहेत. आम्ही नियमाप्रमाणे ठराव करुन दिलेले आहेत. नियमाप्रमाणे आम्ही दोन सदस्यांची नाव, राष्ट्रवादीचे तीन सदस्यांची नावे दिलेली आहेत. तुम्हाला याच्यामध्ये निर्णय घेता आला ना तर शासनाकडे हा विषय पाठवा. त्यानंतरच या समिती गठीत.

**मा. महापौर :-**

ठराव बहुमताने मंजूर.

**प्रकरण क्र. ९१ :-**

महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ६२ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व ३१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतुद आहे. मनपामध्ये महिला व बालकल्याण समिती १५ सदस्यांची गठित करण्यात आली होती. त्यानुसार समितीचे सभापती व उपसभापती यांची निवड करण्यात आली व संपूर्ण वर्षभर चांगल्याप्रकारे कामकाज झाले. महापालिकेने यापूर्वी सभाकाम नियमांचे प्रारुप उपविधी तयार केली

आहे. परंतु अद्यापर्यंत सदर उपविधीस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली नाही. सदर प्रारुप उपविधीमध्ये सदस्यांची संख्या ९ आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(७) अन्वये समितीमध्ये रचना करण्याचे अधिकार महासभेस आहेत. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे व उपरोक्त कलमान्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे पुढील वर्षासाठी १५ सदस्यांची समिती गठित करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळ प्रमाणे तौलानिक संख्यानुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत, असा ठराव मांडत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | फ्रंट/आघाडी |
|---|---|---|
| १ | श्रीम. वर्षा भानुशाली | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. दिपीका अरोरा | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्रीम. सुनिला शर्मा | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. डिंपल मेहता | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. मेघना रावल | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. जयमाला किशोर पाटील | शिवसेना |
| ७ | श्रीम. शुभांगी महिन कोटीयन | शिवसेना |
| ८ | श्रीम. भावना राजु भोईर | बहुजन विकास आघाडी |

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन एन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | पाटील सुनिता कैलास | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | पुजारी कांचना शेखर | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | डिसा मर्लिन मर्विन | **निरंक** |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | वंदना रामदास चक्रे | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | अनिता जयवंत पाटील | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २० | अनिल बाबुराव भोसले | २० | काझी रशीदा जमील | |
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | इनामदार जुबेर | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २५ | जयमाला किशोर पाटील | २५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २६ | संध्या प्रफुल्ल पाटील | २६ | सामंत प्रमोद जयराम | |
| २७ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | ३७ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २८ | खण्डेलवाल सुरेश | |
| २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २९ | डॉ. आसिफ शेख | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | ३० | नरेश तुकाराम पाटील | |
| ३१ | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३१ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३२ | शाह राकेश रतिशचंद्र | ३२ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३३ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३३ | वंदना मंगेश पाटील | |
| ३४ | केळुसकर प्रशांत नारायण | ३४ | अशोक तिवारी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | भोईर भावना राजू | | | |
| ३६ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३७ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३८ | मुन्ना सिंग | | | |
| ३९ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४० | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९२, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**रोहिदास पाटील :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल असे रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींचे मिळून बनलेल्या एका वृक्ष प्राधिकरणाची रचना करता येईल. अशी तरतुद उपविधी (प्रारुप) मध्ये आहे. महापालिकने यापूर्वी सभाकाम नियमांचे / समिती स्थापना बाबतची प्रारुप उपविधी तयार केली आहे. परंतु अद्यापर्यंत सदर उपविधीस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली नाही. सदर प्रारुप उपविधीमध्ये सदस्यांची संख्या ९ आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(७) अन्वये समितीमध्ये रचना करण्याचे अधिकार महासभेस आहेत. सदर तरतुदीनुसार त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे व उपरोक्त कलमान्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याचप्रमाणे पुढील वर्षासाठी १५ सदस्यांची समिती गठित करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळ प्रमाणे तौलानिक संख्यानुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत, असा ठराव मांडण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | फ्रंट/आघाडी |
|---|---|---|
| १ | श्री. प्रेमनाथ पाटील | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. कल्पना म्हात्रे | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. अश्विन कासोदरीया | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. सिमा शाह | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. भगवतीबेन रावल | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. अरविंद दत्ताराम ठाकूर | शिवसेना |
| ७ | श्रीम. प्रणाली संदिप पाटील | शिवसेना |
| ८ | श्री. राजु यशवंत भोईर | बहुजन विकास आघाडी |
| ९ | श्रीम. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १० | श्रीम. वंदना विकास पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ११ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १२ | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १३ | श्री. राजेश शंकर वेतोस्कर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष |
| १४ | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष |
| १५ | श्री. प्रमोद जयराम सामंत | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष |

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय १५ हा अधिनियमाचा भाग आहे ना. खर करुन घ्यायचं आहे त्यांच्याकडून हे अधिनियमाप्रमाणे चालल तर नियमाप्रमाणे चालाल. १५-५ ते १५-८ हा अधिनियमाचा भाग आहे ना, बोला ना जरा माईक घ्या.

**भगवती शर्मा :-**

नियम आहे की अधिनियम आहे.

**जुबेर इनामदार :-**

अधिनियमामधून नियम होते.

**भगवती शर्मा :-**

आयुक्त साहब को तो मालूम होगा ना।

**नगरसचिव :-**

महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण ०२ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल अशा रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेले अध्यक्ष व इतर या असे कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींची मिळून समिती बनू शकते.

**भगवती शर्मा :-**

हा नियम आहे की अधिनियम आहे.

**नगरसचिव :-**

हे वेगळच आहे ना संकलन महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम याच्या अंतर्गत ती नेमणूक होते.

**भगवती शर्मा :-**

हा ते मला माहित नव्हतं. बुक माझ्याकडे नाही आहे म्हणून तुम्हाला विचारलं.

**मा. महापौर :-**

भारतीय जनता पार्टीने दिलेले नावे श्री. प्रेमनाथ पाटील, श्रीम. कल्पना म्हात्रे, श्री. अश्विन कासोदरिया, श्रीम. सिमा शहा, श्रीम. भगवतीबेन रावल. शिवसेनेने दिलेली नावे श्री. अरविंद दत्ताराम ठाकूर, श्रीम. प्रणाली संदिप पाटील, राष्ट्रवादीचे श्रीम. वंदना चक्रे, श्रीम. वंदना विकास पाटील, श्रीम. अनिता जयवंत पाटील, श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा, काँग्रेसतर्फे आलेली नावे श्री. वेतोसकर राजेश, श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम, श्री. प्रमोद जयराम सामंत, बहुजन विकास आघाडी यांनी दिलेली नावे श्री. राजू यशवंत भोईर. सर्व नविन सदस्यांचा खूप खूप अभिनंदन सचिवांनी पुढचा विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. ९२ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ६३ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल असे रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींचे मिळून बनलेल्या एका वृक्ष प्राधिकरणाची रचना करता येईल. अशी तरतुद उपविधी (प्रारुप) मध्ये आहे. महापालिकने यापूर्वी सभाकाम नियमांचे / समिती स्थापना बाबतची प्रारुप उपविधी तयार केली आहे. परंतु अद्यापर्यंत सदर उपविधीस महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली नाही. सदर प्रारुप उपविधीमध्ये सदस्यांची संख्या ९ आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(७) अन्वये समितीमध्ये रचना करण्याचे अधिकार महासभेस आहेत. सदर तरतुदीनुसार त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे व उपरोक्त कलमान्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याचप्रमाणे पुढील वर्षासाठी १५ सदस्यांची समिती गठित करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळ प्रमाणे तौलानिक संख्यानुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत, असा ठराव मांडण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | फ्रंट/आघाडी |
|---|---|---|
| १ | श्री. प्रेमनाथ पाटील | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. कल्पना म्हात्रे | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. अश्विन कासोदरीया | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. सिमा शाह | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. भगवतीबेन रावल | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. अरविंद दत्ताराम ठाकूर | शिवसेना |
| ७ | श्रीम. प्रणाली संदिप पाटील | शिवसेना |
| ८ | श्री. राजु यशवंत भोईर | बहुजन विकास आघाडी |
| ९ | श्रीम. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १० | श्रीम. वंदना विकास पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ११ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १२ | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १३ | श्री. राजेश शंकर वेतोस्कर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| १४ | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |
| १५ | श्री. प्रमोद जयराम सामंत | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष |

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार दुष्काळग्रस्तांसाठी महानगरपालिका फंडातुन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये अनुदान देणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

महाराष्ट्र राज्यात अपुरा पाऊस पडल्याने विविध ठिकाणी दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होऊन अनेक गावे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेले असून तेथील नागरीकांना जिवनावश्यक वस्तु व जनावरांना चारा अभावी अनेक ठिकाणी परस्थिती भयानक होत आहे.

तसेच अपेक्षित पाऊस न पडल्याने पिकांचे नुकसान होऊन अनेक शेतकरी बांधव कर्जबाजारी झाले आहेत व त्यातुन सुटका करुन घेण्यासाठी आत्महत्या करीत आहेत. याकरीता दुष्काळजन्य भागातील नागरीक, शेतकरी बांधवांना मानवतेच्या दृष्टीकोनातुन सहाय्य करणे अत्यावश्यक आहे.
महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार महानगरपालिका फंडातुन निधी उपलब्ध करुन देण्याची तरतुद असून उक्त अधिनियमातील नमुद कलमा नुसार रु. २५ लक्ष इतकी रक्कम महानगरपालिका फंडातुन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये अनुदान स्वरुपात द्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, दुष्काळ महाराष्ट्र मै जो पुरा सुका दुष्काळ पडा है। राज्य सरकार पूर्णपणे असक्षम साबीत हुई है। इसके पहिले भी महाराष्ट्र के अंदर में दुष्काळ पडा था उस समय के अंदर में केंद्र के अंदर में कृषी मंत्री शरद चंद्रजी पवार, उस समय के अंदर में केंद्र शासनद्वारा कॉंग्रेस और राष्ट्रवादी कॉंग्रेस युती की जो सरकार थी उसके माध्यम से बडा पॅकेज दिया था। सुका ग्रस्त सहने के लिए ७ हजार करोड का एक पॅकेज दिया गया था, उसमें काफी हद तक उनको पूर्ण पाने को नही कर सकते लेकिन काफी हद तक उनको एक मदत मिली थी और उसके अंदर में पुरे महाराष्ट्र राज्य के अंदर में गर्व्हमेंट की प्रशंसा की गई थी। ठीक है, अभी केंद्रसरकार असक्षम है, वह मदत नही कर पा रही है, राज्य सरकार को, महानगरपालिका हमारी भली गरीब हो लेकिन हम कुछ ना कुछ देंगे यह विषय पचीस लाख दिया है। कोई बात नही है और भी दो, पाच लाख बढा के दे सकते हो, लेकिन यह कौनसी, कौनसा फंड से दिया जा रहा है। क्योंकी इसके लिए कोई रिझर्व्ह फंड किया गया नही था। तो मैं प्रशासन के माध्यम से यह जानना चाहता हूँ, यह जो पचीस लाख वर्क किया गया है, कौनसे खाते से वर्क किया गया है। इसकी खाली एक जानकारी दीजिए।

**प्रभात पाटील :-**

दुष्काळग्रस्तांना मदत करणे हे आपले खूप चांगले धोरण आहे. त्याबद्दल विषय पण आणला आहे. परंतु या विषयाला अनुसरुन प्रशासनाची काय बाजू आहे हा एक महत्वाचा भाग आहे. प्रशासनाच्या वतीने त्यांनी खुलासा करावा. दुसरी गोष्ट अशी की आपण मुख्यमंत्री निधीला पैसे देतो माझं स्वतःच अस मत आहे की आपण जे २५ लाख रु. देतो कुठून देतो आपण एफ.डी. करतो काय करतो ही सगळी बाजु आपल्या समोर आली पाहिजे. कुठून देणार आहे आपल्याकडे आपण काय स्पेसिफाय फंड ठेवलेला नाही. महानगरपालिका अंदाजपत्रकात अशी कोणतीच तरतुद केली नाही तेव्हा हा पैसा कुठून देणार याच ही विवेचन व्हायला पाहिजे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपण मुख्यमंत्री निधीला पैसे देतो आपण अस का करत नाही आपण एखादे खेडेगाव दत्तक घेऊया त्यातल्या मुलांच्या शिक्षणाची सोय करुया गरीब घरांना अन्नदान करा तुमचे स्वतःचे महानगरपालिकाचे अस्तित्व निघून जाईल. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करा त्यांना अवजारे द्या बियाणे द्या, काहीही करा तुमचे एक डेडिकेशन जाऊ द्या. महापौर, आमदार, आयुक्त सगळे चार तुमच्या पक्षाचे गटनेते तुम्ही वैयक्तिक स्वरुपात का मदत करत नाही हा एक प्रस्ताव आहे जिथे तुमच्या पालिकेचे स्वतंत्र अस्तित्व तिथे तयार होऊ शकते निर्माण होऊ शकते. ह्या पालिकेने हे गाव दत्तक घेतले या महानगरपालिकेने हे १०० विद्यार्थी दत्तक घेतले या महानगरपालिकेने हे १० शेतकरी कुटुंब दत्तक घेतली की त्यांच्या अन्नपाण्याचा त्यांचा निवाऱ्याचा त्यांचा रोजगाराचा प्रश्न तुम्ही सोडवता मला या प्रश्नाचे देखील उत्तर द्या की आपण अस का करु शकत नाही आणि आपण हा पैसा कुठून उपलब्ध करणार हा ही माझा मुद्दा आहे.

**शरद बेलवटे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो कलम ८९ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८९ नुसार नगरपालिका निधी कोठे खर्च करावयाचा महानगरपालिकेने नगरपालिका निधीतून करावयाचा खर्च या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त फक्त शहरातच केला जाईल. परंतु एकूण पालिका सदस्यांपैकी निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या महानगरपालिकेच्या ठरावाद्वारे असा खर्च या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी शहराच्या बाहेर करता येईल अंदाजपत्रक पृष्ठ क्र. ४३, २०१५-१६ आपत्कालीन निधी रक्कम ८५.०० लक्ष सदरचा खर्च भागवण्यात येईल.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे आकस्मित जर काही घटना घडली असली तर त्याच्यामध्ये तरतूद आहे. त्याच्यामध्ये आपण बजेटमध्ये तरतूद केली आहे. बजेटला आपण मंजुरी दिली आहे आणि महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये कलम ८५ नुसार अशी तरतूद आहे त्याच्या अंतर्गत आपण हा प्रस्ताव मांडलेला आहे. आपल्या सभागृहाने दुष्काळग्रस्त भागाला मदत करण्यासाठी जर समजा मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी जर मान्यता दिली. द्यायची की नाही हा तुमचा प्रश्न आहे परंतु ते कोणत्या कलमाखाली आहे देता येते की नाही हा विषय आहे.

**भगवती शर्मा :-**

त्या खात्यामध्ये किती अमाऊंट आहे.

**मा. आयुक्त :-**

त्या खात्यामध्ये ८५ लक्ष अमाऊंट आपल्याकडे शिल्लक आहे.

**भगवती शर्मा :-**

आम्हाला जास्त द्यायचे आहे.

**मा. आयुक्त :-**

आधी हे मंजुर करावे नंतर पुढचं काय द्यायचे ते द्या.

**आसिफ शेख :-**

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नाव झाले पाहिजे ८५ लक्ष ही अमाऊंट कमी आहे आमची अशी सूचना आहे की कमीत कमी ५ करोड रुपये द्यायला पाहिजे. जे-जे करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नाव झाले पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम आमची सुचना आहे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना रु. ५१ लाखाची मदत मिरा भाईंदर महानगरपालिकातर्फे देण्यात यावी तसेच मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात अर्थात निवासस्थानी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना मिरा भाईंदर महानगरपालिका निधी मुख्यमंत्री साहेब यांच्याकडे सुपूर्त करताना मिरा भाईंदरचे सर्व पदाधिकारी व सर्व राजकीय पक्षाचे गटनेता सोबत घेऊन जावे अशी मी सूचना मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

महापौर मॅडम आम्ही जो ठराव मांडला आहे आणि सन्मा. प्रभात ताईंनी सूचना केली आहे योग्य सूचना आहे २५ लाख रु. निधी देण्यात यावे आणि ज्या सूचना दिल्या त्या अनुषंगाने मा. आयुक्त साहेबांनी आणि मा. महापौर मॅडम आपण कुठल गाव आपल्याला दत्तक घेता येईल कुठल्याप्रकारे घ्यायचे तसा विषय आणू तरीही आपण दत्तक घेऊन मदत करु अर्थात २५ लाख देवू उरलेले पैसे ध्रुवकिशोरजीने ठराव मांडला आहे ते आपण त्या कामासाठी वापरु.

**मा. महापौर :-**

आपला ठराव आहे का सूचना आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमची सूचना तुम्ही घेणार आहात की नाही जर सूचना घेत नसाल तर आम्ही ठराव करतो. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे एकूण ५१ लाखांची मदत करावी. त्यातील २५ लाख रु. एखादे गाव दत्तक घेऊन तेथील शेतकऱ्यांसाठी किंवा विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्यात यावेत.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

अतिउत्तम आयुक्त साहेबांचे स्वतःचे गाव दुष्काळग्रस्त आहे. आयुक्त साहेब आपणच चांगली सुचना करा. कुठे, कसे खर्च करायचे विषय आणा आणि ते घ्या आता आम्ही ठराव मांडला आहे.

**आसिफ शेख :-**

महापौर मॅडम, ताईंची सूचना योग्य आहे. गाव दत्तक घ्यायची आपलं सगळ एल.बी.टी काही माहिती आहे का एल.बी.टी. बंद झालेली आहे. १५०-२०० करोड आपल्याला येत होते ते येणार नाही. आपली परिस्थिती अशी येईल उद्या कर्मचाऱ्यांना पगार द्यायला पैसे राहणार नाही. आपलं गाव किंवा महानगरपालिकाच दत्तक घ्यायची पाळी शासनावर येईल.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९३ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. रोहिदास पाटील, अनुमोदन श्री. राकेश शहा. दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार.

**रोहिदास पाटील :-**

हा महानगरपालिकेचा गंगाजळीतला पैसा आहे हे लक्षात घ्या. आपण आणि सभागृहातील सर्व जे मान्यवर नगरसेवक आहेत. पक्षाचे पदाधिकारी आहेत सगळे दिलदार आहेत, दानशूर आहेत त्याही पलीकडे

महाराष्ट्राचा दुष्काळ जो आहे त्याची तिव्रता त्यांनाही समजते. गंगाजळीतला पैसा घेते वेळी कायदा कानून सर्व बघून आपण आणखी २५ लाखाची सूचना मांडली आहे. आपल्याला जर वाटते की आपण आणखी मदत करायला पाहिजे मुख्यमंत्री येत आहेत आपण २ कोटी ३ कोटी देवूया ना सर्व पक्षांनी द्या सर्व मान्यवरांनी द्या आमदार देतील नगरसेवक देतील खासदार देतील आणि या सभेमध्ये पण देवूया.

**मा. महापौर :-**

सचिव ठराव मतदानास घ्या.

**नगरसचिव :-**

सूचक श्री. ध्रुवकिशोर पाटील व अनुमोदन श्री. जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सूचक श्री. रोहिदास पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सूचक श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४०, विरोधात ३३ इतकी मते पडली आहेत. सूचक श्री. रोहिदास पाटील यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ९३ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार दुष्काळग्रस्तांसाठी महानगरपालिका फंडातुन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये अनुदान देणेबाबत.

**ठराव क्र. ६४ :-**

महाराष्ट्र राज्यात अपुरा पाऊस पडल्याने विविध ठिकाणी दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होऊन अनेक गावे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केलेले असून तेथील नागरीकांना जिवनावश्यक वस्तु व जनावरांना चारा अभावी अनेक ठिकाणी परस्थिती भयानक होत आहे.

तसेच अपेक्षित पाऊस न पडल्याने पिकांचे नुकसान होऊन अनेक शेतकरी बांधव कर्जबाजारी झाले आहेत व त्यातुन सुटका करुन घेण्यासाठी आत्महत्या करीत आहेत. याकरीता दुष्काळजन्य भागातील नागरीक, शेतकरी बांधवांना मानवतेच्या दृष्टीकोनातुन सहाय्य करणे अत्यावश्यक आहे.

महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार महानगरपालिका फंडातुन निधी उपलब्ध करुन देण्याची तरतुद असून उक्त अधिनियमातील नमुद कलमा नुसार रु. २५ लक्ष इतकी रक्कम महानगरपालिका फंडातुन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये अनुदान स्वरुपात द्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील      अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | जैन गिता भरत | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | पाटील सुनिता कैलास | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | पुजारी कांचना शेखर | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | इनामदार जुबेर | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २५ | जयमाला किशोर पाटील | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | संध्या प्रफुल्ल पाटील | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| २८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २९ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३० | प्रविण मोरेश्वर पाटील | ३० | डॉ. आसिफ शेख | |
| ३१ | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३१ | नरेश तुकाराम पाटील | |
| ३२ | शाह राकेश रतिशचंद्र | ३२ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३३ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३३ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३४ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३५ | भोईर भावना राजू | | | |
| ३६ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३७ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३८ | मुन्ना सिंग | | | |
| ३९ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४० | दिप्ती शेखर भट | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९४, महानगरपालिका कर्मचायांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्याची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचायांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

चालू वर्षासाठी कर्मचारी वर्ग व कठामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१५ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेल्या कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना अर्थसंकल्पिय तरतुदीचे अनुसार सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास, खर्च पुढील प्रमाणे येणार आहे.

***<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीताः-</u>***

| अ.क्र. | कर्मचायांचा तपशिल | कार्यरत अधिकारी /कर्मचारी | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजूर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | सन २०१५ मध्ये कार्यरत कर्मचायांना अनुदानापोटी होणारा अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४९५ | १४,००० | २,०९,३०,०००/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ६९ | ११,००० | ७,५९,०००/- |

| अ.क्र. | कर्मचायांचा तपशिल | कार्यरत अधिकारी /कर्मचारी | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजूर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | सन २०१५ मध्ये कार्यरत कर्मचायांना अनुदानापोटी होणारा अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ७,००० | ३५,०००/- |
| ४. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. कर्मचारी व आर.एन.टी.सी.पी. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३४ | ६,५०० | २,२१,०००/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ११२ | ७,००० | ७,८४,०००/- |
| ६. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,००० | ८,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १४ | १०,५०० | १,४७,०००/- |
| ८. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ६,००० | ३०,०००/- |
| ९. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३२ | ६,५०० | २,०८,०००/- |
| १० | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | ११,००० | ७७,०००/- |
| एकुण | | १७७५ | | २,३१,९९,०००/- |

*शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता*

| अ.क्र. | कर्मचायांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजूर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | सन २०१५ मध्ये कार्यरत शिक्षक वर्गास अनुदानापोटी होणारा अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | २०६ | १२,५०० | २५,७५,००० |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचायांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रुपये २,३१,९९,०००/- (अक्षर रुपये - दोन कोटी एकतीस लाख नव्याण्णव हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु. २.५० कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचायांसाठी रक्कम रुपये २५,७५,०००/- (अक्षरी रुपये - पंचविस लाख पंच्याहत्तर हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाज पत्रकात रक्कम रु. २५ लाख इतकी तरतुद आहे.

सबब वरील प्रमाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचायांना सन-२०१५ मध्ये दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान वाटपास व येणाया खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

तसेच सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील संगणक चालक व लघुलेखक यांना मा. महासभा दि. १९/०७/२०१४ ठराव क्र. १५ अन्वये दरमहा रु. ११,५००/- इतके मानधन अदा करण्यांत येत आहे. यापुढे माहे ऑक्टोंबर २०१५ पासून संगणक चालक व लघुलेखक यांना दरमहा रु. १४,५००/- इतके मानधन अदा करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

**प्रभाकर म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ९४ :-**

महानगरपालिका कर्मचायांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दरवर्षी दिवाळी सण कालावधीत सानुग्रह अनुदान देण्याची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार

करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचायांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

चालू वर्षासाठी कर्मचारी वर्ग व कठामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१५ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेल्या कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना अर्थसंकल्पिय तरतुदीचे अनुसार सानुग्रह अनुदान द्यावयाचे झाल्यास, खर्च पुढील प्रमाणे येणार आहे.

***<u>महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता:-</u>***

| अ.क्र. | कर्मचायांचा तपशिल | कार्यरत अधिकारी /कर्मचारी | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजूर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | सन २०१५ मध्ये कार्यरत कर्मचायांना अनुदानापोटी होणारा अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४९५ | १४,००० | २,०९,३०,०००/- |
| २. | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ६९ | ११,००० | ७,५९,०००/- |
| ३. | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ७,००० | ३५,०००/- |
| ४. | कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. कर्मचारी व आर.एन.टी.सी.पी. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३४ | ६,५०० | २,२१,०००/- |
| ५. | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ११२ | ७,००० | ७,८४,०००/- |
| ६. | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,००० | ८,०००/- |
| ७. | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १४ | १०,५०० | १,४७,०००/- |
| ८. | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०५ | ६,००० | ३०,०००/- |
| ९. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३२ | ६,५०० | २,०८,०००/- |
| १० | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०७ | ११,००० | ७७,०००/- |
| एकुण | | १७७५ | | २,३१,९९,०००/- |

*<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता</u>*

| अ.क्र. | कर्मचायांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१५-१६ या वर्षाकरीता मंजूर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | सन २०१५ मध्ये कार्यरत शिक्षक वर्गास अनुदानापोटी होणारा अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | २०६ | १२,५०० | २५,७५,००० |

वरील प्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचायांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रुपये २,३१,९९,०००/- (अक्षर रुपये - दोन कोटी एकतीस लाख नव्याण्णव हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु. २.५० कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचायांसाठी रक्कम रुपये २५,७५,०००/- (अक्षरी रुपये - पंचविस लाख पंच्याहत्तर हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. आणि या वर्षीच्या मंजुर अंदाज पत्रकात रक्कम रु. २५ लाख इतकी तरतुद आहे.

सबब वरील प्रमाणे महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचायांना सन-२०१५ मध्ये दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान वाटपास व येणाया खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

तसेच सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील संगणक चालक व लघुलेखक यांना मा. महासभा दि. १९/०७/२०१४ ठराव क्र. १५ अन्वये दरमहा रु. ११,५००/- इतके मानधन अदा करण्यांत येत आहे. यापुढे माहे ऑक्टोंबर २०१५ पासून संगणक चालक व लघुलेखक यांना दरमहा रु. १४,५००/- इतके मानधन अदा करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. प्रभाकर म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९५, भारतरत्न पं. भिमसेन जोशी रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिकारी (वर्ग-०१) संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये भाईंदर (प) येथील भारतरत्न पं.भिमसेन जोशी रुग्णालयाकरीता, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पदांसाठी उमेदवारांच्या दि.२५/०६/२०१५ रोजी थेट मुलाखती घेण्यात आल्या होत्या. सदर थेट मुलाखतीमध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर निवड केलेल्या उमेदवाराचे नाव खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | निवड केलेल्या उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) (वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००) | अनिस करीम न्हावकर | इमाव |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा.आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहेत."

त्यामुळे वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या पदावर वरीलप्रमाणे निवड केलेल्या उमेदवारास नियुक्ती देणेकरीता ही सभा मंजूरी देत आहे.

**अरविंद ठाकूर :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दि. २३/०३/२०१५ रोजी जी महासभा झाली होती त्या महासभेमध्ये सुध्दा अशाच वैद्यकिय आणि कर्मचारी अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत ठराव होता त्यामध्ये जे ९ वैद्यकिय अधिकारी होते वैद्यकिय अधिकारी स्त्री रोग प्रसुती शास्त्र अधिकारी होती. त्यावेळी जो ठराव मांडला होता ते वाचतो मी तथापी इस्पितळ सुरु झाले नसल्यामुळे इस्पितळ सुरु होण्यापूर्वी नजीकच्या महासभेमध्ये प्रस्तुत वैद्यकिय उमेदवाराची नियुक्ती आदेश देण्याच्या मान्यतेचा प्रस्ताव मा. महासभेस सादर करावे. त्यांनी पण नियुक्ती दिली होती परंतु त्यांना रुजु करुन घेतले नाही त्यांनी सांगितले ज्यावेळी हॉस्पीटल सुरु होईल त्यावेळी तुम्ही त्यांना नियुक्ती द्या मग आज जे हे वैद्यकिय अधिकारी आहेत मग त्यांना आता नेमण्याची गरज काय? जे ऑलरेडी २३ तारखेच्या महासभेमध्ये जे आपण १० वैद्यकिय अधिका-यांना दिलेले आहे मग त्यांची नियुक्ती का नाही केली. दुसरी आणखी एक गोष्ट वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांची अजुन आपण नियुक्ती केली नाही हे असं गोलगोल का प्रशासनाने याचा खुलासा करावा.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, इंदिरा गांधी हॉस्पीटल शुरु करने के लिए यह सब प्रयत्न किए जा रहे है। अच्छी बात है लेकिन जैसे की इसके पहले भी ३-४ वैद्यकिय अधिकारी दुसरी पोस्टो के लिए नियुक्ती के लिए महासभा में विषय आया था और आज यह वैद्यकिय अधिकारी के लिए विषय आया मेरी सिर्फ आपसे यह जानकारी चाहिए थी की हमलोग जब भी यह अगले महिने या १-२ महिने के बाद जब ये रुग्णालय चालू करनेवाले है तो उसके अंदर में जो व्यवस्था आज कर रहे है वो कितने बेड के अस्पताल के लिए कर रहे है और अभी तक कितनी नियुक्तीयाँ ऐसी होगी और कितनी नियुक्तीयाँ बाकी है। जरा इसकी जानकारी दिजीए।

**मा. महापौर :-**

भगवतीजी आप कौनसे अस्पताल के लिए बात कर रहे है।

**भगवमी शर्मा :-**

भारतरत्न पंडित भिमसेन जोशी सॉरी भुल हुई।

**कल्पिता पिंपळे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते आता सध्या २०० खाटाचे रुग्णालय जरी आपण बांधणार असलो तरी सध्या ५० खाटाचे रुग्णालय आपण सुरु करणार आहोत. आणि त्यासाठी मागे आपल्याकडे जी विविध पदे भरावयाची आहे ती अशी पदे आहेत त्यापैकी आपण तीन वेळा निवड प्रक्रिया केली त्या निवड प्रक्रियेत आपल्याला ५३ पदे अव्हेलेबल झालेली आहेत. त्याच्यामध्ये वैद्यकिय अधिकारी एक आहे म्हणजे स्त्री रोग प्रसुती शास्त्रज्ञ त्याच्यानंतर वैद्यकिय अधिकारी आपल्याला १२ हवे आहेत त्यातले आपण १० पदाची निवड केलेली आहे. १० वैद्यकिय अधिकारी परिचारीका आपल्याला एक लागणार आहे त्याची सुध्दा निवड आपली झालेली आहे. एक आपल्याला क्ष किरण तंत्रज्ञ ते दोन हवे आहेत परंतु एकच आपल्याला मिळालेले आहे. प्रयोगशाळा तंत्रज्ञ आपल्याला ३ पैकी ३ मिळाले आहेत. आणि अधिपरिचारिका आपल्याला ३६ हव्या होत्या त्यातील २४ जणांची निवड आपण केलेली आहे. त्याच्यामध्ये फार्मसिस्ट आहेत, ६ लोक मिळाली आहेत आणि प्रसविका ज्या महिला आहेत त्या ७ अशाप्रकारे एकुण ५३ पदे आपण भरलेली आहेत. या ५३ पदांपैकी आपण आवश्यकतेनुसार २२ लोकांना रुजु करुन घेतले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गोषवारा आहे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालयाकरिता आणि तुम्ही म्हणताय हे आपण इंदिरा गांधी रुग्णालय करिता आयुक्त साहेब बघा काय चाललय.

**कल्पिता पिंपळे :-**

आवश्यकतेनुसार सर आपण डॉक्टर जे आहेत ते आपण फिरवत आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम बघा दोन ठराव आले आहेत. दि. २३/०३/२०१५ रोजी महासभा झाली होती त्यावेळी आपण १० वैद्यकिय अधिकारी घेतले होते आणि त्याच्यामध्ये आणखी ७ ते ८ लोक प्रतिक्षा यादीमध्ये आहे. मग इथे हा जो वैद्यकिय अधिकारी घेतलेला आहे मग तुम्ही आता याला अपॉइंटमेंट देणार आणि जे १० लोक आहेत ज्यांची ऑलरेडी अपॉइंटमेंट झालेली आहे मग तुम्ही त्यांना का घेत नाहीत?

**कल्पिता पिंपळे :-**

नाही नाही मी तेच सांगते १० पैकी आपण जी अपॉईंटमेंट दिली आहे परंतु त्याच्यापैकी फक्त ४ लोकांनाच आपण रुजू करुन घेतले आहे. आपण अगोदर जेव्हा निवड प्रक्रिया केली २५ जूनच्या अगोदर तेव्हा आपल्याला १२ पैकी ९ वैद्यकिय अधिकारी मिळाले होते. आता २५ जूनला जी आपण निवड प्रक्रिया केली त्याच्यामध्ये आपल्याला एक मिळाला त्यांना आपण आता सहा. आयुक्त या दर्जाचे असल्यामुळे आपल्या महासभेची मान्यता आवश्यक आहे. म्हणून आपण त्यांना नियुक्ती देण्याकरिता मान्यतेसाठी आपण हा प्रपोजल ठेवला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे तुमच अस म्हणणे आहे हा वर्ग १ चा अधिकारी आहे आणि हे वर्ग १ चे अधिकारी नाहीत.

**कल्पिता पिंपळे :-**

नाही, आहेत ना. फक्त महानगरपालिकेच्या मान्यतेकरिता ....................

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यांच्यामध्ये घेतले पाहिजे ना मॅडम हे ऑलरेडी सिनियर आहेत. यांची तुम्ही पहिली निवड केली आहे. हा तर ज्युनिअर आहे तुम्ही यांच्यापैकी घेतले पाहिजे ना कोणीतरी.

**कल्पिता पिंपळे :-**

हो आपल्याला सगळे लागणारच आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह असत की नाही. हे १० लोक पहिल्यांदा आली आहेत मग तुम्ही यांना अगोदर घेणार की नाही आणखी प्रतिक्षा यादीमध्ये ६ लोक आहेत. मग तुम्ही या सगळ्यांना डावलून या अनिष साहेबवरती एवढी मेहरबानी का? हे पण वर्ग १ चे आहेत ते पण वर्ग १ चे आणि आमचा ठराव असा झालेला आहे की ज्यावेळी हॉस्पीटल सुरु होईल त्याच्या अगोदर तुम्ही ह्यांची अपॉईंटमेंट करा. आपल अजुन हॉस्पीटल सुरु झाल नाही आणि कधी सुरु होणार हे पण डेट फिक्स नाही.

**कल्पिता पिंपळे :-**

मान्य आहे सर हे फक्त मंजुरीसाठी प्रस्ताव आलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे तुम्ही याची सुध्दा बघा मॅडम आता ठराव जो मांडला होता प्रेमनाथ साहेबांनी तो म्हटला नियुक्त करुन टाका. मंजूरी देऊन टाका आणि यावेळी रोहिदास पाटीलजीने जो ठराव मांडला होता त्याच्यामध्ये क्लिअर कट असे म्हटले होते की ज्यावेळी आपल हॉस्पीटल सुरु होईल त्याच्या अगोदर याची अपॉईंटमेंट करा. माझी अशी सुचना प्रेमनाथ पाटीलजीच्या ठरावामध्ये तीच ओळ कन्टीन्यू करा की ज्यावेळी गरज लागेल त्यावेळी यांची अपॉईंटमेंट घ्या ना.

**भगवती शर्मा :-**

ती पण महासभेची मान्यता घेऊन.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम माझी सुचना ॲक्सेप्ट केली की नाही.

**मा. आयुक्त :-**

पानपट्टे साहेब येत आहेत. दोन मिनिटांमध्ये ते तुम्हाला खुलासा करतील.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांच म्हणणे सोप आहे एकदम की मागच्यावेळी आपण काही कॅटेगिरीची जाहिरात काढली त्यामध्ये डॉक्टर आले आपण ठराव केला यांना घ्या पण १ कंडीशन टाकली होती की ज्यावेळी हॉस्पीटल चालु होईल त्या जवळच्या काळात त्यांना नियुक्ती करावी आणि महासभेपूढे ती मान्यता घ्यावी. आता आपण नवीन एक कॅटेगिरीसाठी जाहिरात काढली होती. डॉक्टर आपल्याला भेटले आपण ते दिले. ठरावाने मांडले की आपण नियुक्ती देऊ या. त्यामध्ये सूचना सन्मा. सदस्यांनी मांडली आहे की त्याला तुम्ही घ्या परंतु त्याला पण ज्यावेळी हॉस्पीटल चालु होईल त्याचवेळी त्यांची महासभेला माहिती द्या.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ९५ :-**

भारतरत्न पं. भिमसेन जोशी रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिकारी (वर्ग-०१) संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवाराच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र. ६६ :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये भाईंदर (प) येथील भारतरत्न पं.भिमसेन जोशी रुग्णालयाकरीता, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पदांसाठी उमेदवारांच्या दि.२५/०६/२०१५ रोजी थेट मुलाखती घेण्यात आल्या होत्या. सदर थेट मुलाखतीमध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर निवड केलेल्या उमेदवाराचे नाव खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | निवड केलेल्या उमेदवाराचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) (वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४००) | अनिस करीम न्हावकर | इमाव |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा.आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहेत." त्यामुळे वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या पदावर वरीलप्रमाणे निवड केलेल्या उमेदवारास नियुक्ती देणेकरीता ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील** **अनुमोदन :- श्री. अरविंद ठाकूर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९६, पुर्नविनियोजन पत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाखाली तरतूद करण्यात आलेली आहे. सदर अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार आवश्यक लेखाशिर्षात तरतूद करण्यासाठी खालील प्रमाणे पुर्नविनियोजन पत्रक सादर करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र लेखा सहीता १९७१ नमूना क्र. १० नियम ३०(३)**

| **या शिर्षातून** | | | | | | **ह्या शिर्षात** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मूळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **उपलब्ध शिल्लक** | **प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मूळ अनुदान** | **आज तारखे पर्यंतचे खर्च** | **प्रस्तावित वाढीची रक्कम** | **अभिप्राय** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** | **१२** |
| १ | सार्व. सुरक्षितता अग्निशमन विभाग | अग्निशमन इमारत बांधकाम/ फर्निचर | १२५०.०० लक्ष | १५७.०० लक्ष | १०९३ लक्ष | सार्वजनिक बांधकामे (पृष्ठ क्र.४८) | नविन गटारे/ नाले बांधकाम | १४१५.०० लक्ष | ९३५.५४ लक्ष | १५५०.०० लक्ष | "अग्निशमन इमारत बांधकाम/ फर्निचर" या लेखाशिर्षातुन ३१ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (पृ.क्र. ६३) | (पृ.क्र.६३) | | | | | | | | | मार्च २०१६ पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन रु.१०००.०० लक्ष व |
| २ | कर विभाग (पृ.क्र. ३५) | मालमत्ता कर पुर्न मुल्यांकन करणे | ६००.०० लक्ष | - | ६००.०० लक्ष | | | | | | "मालमत्ता कर पुर्न मुल्यांकन करणे" या लेखाशिर्षातुन ३१ मार्च २०१६ पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन रु.५५०.०० लक्ष असे मिळून एकूण १५५०.०० लक्ष रक्कम "नविन गटारे/ नाले बांधकाम" या लेखाशिर्षात वर्ग करण्यात मान्यता देण्यात येत आहे. |

वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

सर याचा प्रशासनाने गोषवारा दिला नाही.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम प्रमोद सामंतजी जो पूछ रहे है उस चिज से संबंधित मेरा यह लाईन आगे जोड देता हूँ की, प्रशासन ने गोषवारा दिया नही है। और अभी सन्मा. सदस्य मेहताजी ने जो वर्गीकरण किया जिन-जिन खातो से वो जो खातेवाले है उनकी सहमती है क्या की, उसके अंदर में इतना खर्च हुआ और बाकी का नही होनेवाला है वो वर्ग कर सकते है क्या?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम एक बात समझ मैं नही आ रही है की, महानगरपालिका की यह जो बजेट है हमको दिया नही है तो मेहताजी को कैसे दिया? और मेहताजी को सारी डिटेल पता कैसे है? यह कॉन्फीडेन्शल रिपोर्ट बाहर कैसे लिक हुआ की, कौनसे हेड में कितना पैसा बचा है। कौनसे हेड से निकालना है। कौनसे हेड में कम पड रहा है। यह सारी फिगर इन्फॉमेशन प्रशासनने हमको देनी चाहिए तो वो इनको कैसे दी।

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त महोदय महापौर मॅडम, आम्ही जो पुर्नःवियोजनचा विषय दिलेला आहे. ज्यावेळी विषयपत्रिकेवर विषय आला संबंधित विभागाकडून माहिती घेतली त्यामध्ये अग्निशमन इमारत बांधकाम फर्निचर यासाठी आपल्याकडे साडे बारा कोटी तरतूद आहे. १ कोटी ५७ लाख खर्च झाले. शिल्लक आपल्याकडे १० कोटी ९३ लक्ष आहे. याच्यात काही बदल करत नाही त्या बांधकाम विभागाने अग्निशमन इमारत जी बांधली त्यासाठी १० कोटी रु. वर्ग करतो आहे त्याच हेडखाली आहे. आयुक्त साहेब मधल्या काळात आपण ६ कोटी रुपये तरतुद केली होती की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये ज्या कर आकारणी झालेली आहे त्याचे पूर्ण सर्व्हे करणे ही तरतूद केली होती. मधल्या काळात शासनाचे काही गाईडलाईन आले त्यामध्ये आपल्याला हे ही करायला सांगितले म्हणून ते टोटल ६ कोटी रुपये तसेच आपल्याकडे शिल्लक बॅलेन्स आहे त्यामधुन साडे पाच कोटी रु. आम्ही वर्ग केले म्हणजे एकूण साडे पंधरा कोटी रुपये आम्ही वर्ग करतोय. आणि ही माहिती अधिकाऱ्यांकडे ही उपलब्ध आहे. जे जे संबंधित त्यांच्याकडेही कुठे कीती खर्च झालेले आहे कुठलेही हेड बदलले नाही. अग्निशमनमध्ये इमारत बांधण्यासाठी ते काही बांधकामामध्ये वर्ग केले आहे आणि कर आकारणी सर्व्हेसाठी ६ कोटी होते. त्याचे सर्व्हे काही शासनाचे धोरण बदलले आहे आणि त्यांनी हे ही करायला सांगितल्यामुळे खर्च पडणार नाही म्हणून साडे पाच कोटी तिकडे वर्ग केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय प्रशासनाचा आहे आणि प्रशासनाने गोषवारा दिला पाहिजे. महासभेमध्ये कुठला विषय आणायचा तो महापौरांचा अधिकार आहे. परंतु पुर्नःविनियोजन कुठल्या खात्यामध्ये पैसे कमी पडतात, कुठल्या खात्यामध्ये पैसे पाहिजेत कुठल काम करायचं आहे, कुठल काम करायच नाही हा आयुक्तांचा विषय आहे आणि त्या संबंधित विभागाचा प्रश्न आहे आणि त्या विभागाने तो गोषवारा दिला पाहिजे. आयुक्त साहेब हा तुमच्या अधिकारावर गदा आहे ना. तुम्ही तिथे बसताय पण हे आम्हीच करतोय. हा विषय तुमच्याकडून आम्हाला आला पाहिजे की खात्यामध्ये पैसे कमी आहेत. या खात्यामध्ये पैसे ट्रान्सफर करायचे आहे आणि आता असं ऐकण्यात आल आहे मॅडम की आता मार्केट मिरा भाईंदरमध्ये मार्केट

बांधण्याकामी साडे चार कोटी रुपये तरतूद शिल्लक होती ती महासभेची मंजूरी न घेता डायरेक्ट पुर्नःविनियोजन केले आणिदुस-या खात्यामध्ये वर्ग करण्यात आली. साहेब हे काय चालले आहे.

**मा. आयुक्त :-**

महासभेच्या पटलावर कोणते विषय घ्यायचे कोणते नाही घ्यायचे हा महापौरांचा विषय आहे. हे अनेकवेळा आपल्याला सांगितले आहे. आपण जुने नगरसेवक आहात. आपल्याला कल्पना आहे आमचा गोषवारा आला नाही म्हणजे मा. महापौरांनी विषय घेतलेला आहे. त्यात त्यांना काय ठराव घ्यायचा सभागृहाला काय ठरवायचं तो आपला अधिकार आहे. म्हणजे आम्ही गोषवाराच दिला नाही तर त्याच्यावर काय बोलणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब १०० टक्के तुम्ही जे बोलता त्यावर दुमत नाही. त्यासाठी सहमत आहे. परंतु सर पुर्नविनियोजन करणे किती अमाऊंट टाकणे, किती अमाऊंट पाहिजे. कुठल्या खात्याला किती पैसे भरायचे टेक्नीकल तुम्ही क्वालिफाईड आहेत आम्ही नाही ना. आम्हाला मानधन मिळते तुम्हाला पगार मिळतोय हे पुर्नविनियोजन करणे आमचा अधिकार आहे. महापौरांनी विषय घेतला बरोबर आहे. पण तुम्ही लगेच गोषवारा दिला पाहिजे तो तुम्ही का दिला नाही.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदयांनी याच अशा सभागृहामध्ये महासभा चालु असताना मंचावरुन मर्दासारखे बोलले होते, गोषवारा नसला विषय माझा नसला तो तुम्ही कितीही ठराव केला मान्य करायच नाही. करायच तो माझा अधिकार आहे आणि आयुक्त तसं करणारचं पुर्नविनियोजन हा १०० टक्के प्रशासकीय विषय आहे. तो खाजगी प्रायव्हेट लि. होऊच शकत नाही. म्हणून आयुक्त महोदय असं नियमबाह्य कृतींना प्रशासनाने बळी पडू नये. तुम्ही तुमच्या अधिकारात किती आणि काय याचा ठराव करणार नाही पण हे मुर्खपणा याच्यावर ठराव करणे प्रशासनाचा गोषवारा नाही आणि ठराव करणार सुध्दा नाही. अधिकार महापौरांचा असेल विषय घ्यायचा, धोरणात्मक विषय पुर्नविनियोजनाच्या आर्थिक बाबी ज्या आहेत त्याचा अधिकार फक्त प्रशासनाचा आहे. प्रशासनाने अशा ठरावांना विखंडीत ताबडतोब करावे साहेब.

**भगवती शर्मा :-**

साहेब तुम्ही घोषणा करा व्यासपीठावरुन की मी विखंडीतला पाठविणार.

**मा. आयुक्त :-**

सांगितले ना. तो कायदेशीर आहे का बेकायदेशीर आहे तपासून त्याला विखंडीतला पाठवायचे का नाही ते आम्ही ठरवू तुम्ही तुमचा ठराव पास करायचा का नापास हा तुमचा विषय आहे आणि तो ठराव पारित व्हायच्या अगोदरच विखंडनला पाठवायचं असं कस काय जाहिर करणार? बेकायदेशीर असेल तर पाठवणार हे अनेकवेळा सांगितले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे तुम्ही बोललात ते. पण साहेब महापौरांनी विषय घेतला ही पत्रिका तुम्हाला भेटली तर तुमच का होत तुम्ही संबंधित अधिका-यांना बोलवायला पाहिजे होते. संबंधित विभागाच्या विभागप्रमुखांना बोलवुन घ्यायला पाहिजे. कुठे-कुठे तुम्हाला फंड कमी आहे तुम्ही ताबडतोब द्या. याप्रमाणे महापौरांनी इमिजिएटली कारवाई केली पाहिजे होती ना. तुम्ही का नाही कारवाई केली, नियोजन करणे हे सर्व आपलं काम आहे ना.

**मा. आयुक्त :-**

साहेब कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की आयुक्तांनी पाठविलेल्या गोषवा-यावरच अजेंडा लागला पाहिजे परंतु महापौरांना जर वाटल की हा विषय तातडीचा वाटतो त्यामुळे त्यांनी लावला विषय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही अभ्यास कसा करणार.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी विषय लावला. माझा गोषवारा नाही म्हणजे मी गप्प का बसत आहे हे तुम्ही ओळखून घेतलं पाहिजे. ठराव पास करायचा की नापास हा तुमचा विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही या शहराचे कमिशनर आहेत, आयुक्त आहात.

**मा. आयुक्त :-**

पसंत असेल तर पास करावा नसेल तर नापास करावा. अंमलबजावणी करायची की नाही ते वि विल डिसाईड.

**मा. महापौर :-**

ध्रुवकिशोरजी आपको यह ठराव मंजुर नही करना है तो आप ठराव मांडिए. आयुक्तने आपको जवाब दे दिया है। बार-बार वही बात मत दोहराए। दुसरे बोलायचे नाही फक्त ठराव विषयी बोला तुमची चर्चा झालेली आहे.

**भगवती शर्मा :-**

चर्चा झाल्यानंतर ठराव होऊ शकतात मॅडम.

**मा. महापौर :-**

तुमची चर्चा झाली आहे. जवाब भेटलेला आहे. आता तुम्हाला ठराव मंजुर करायचा नसेल.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय स्थायी समिती, वैधानिक समिती अजुन जमा खर्च जो असतो त्रैमासिक जमाखर्च एप्रिलच्या नंतर दिलेला नाही. मार्चपर्यंत दिला आहे या चालु वर्षाचा त्रैमासिक जमाखर्च अजुन स्थायी समितीला सादर झाले नाही. अशा परिस्थितीमध्ये पुर्नविनियोजनचे विषय येऊ कस शकतात.

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते, मी एकच शब्द सांगते समझ जाओ म्हणजे शासनाला म्हणजे आयुक्तांना विचारात घेत नाही का? आयुक्त साहेबांना माहित नाही का? महापौर मॅडम याच्यापेक्षा मोठ काय पाहिजे? हे कशाला अस, का असं, का दिशाभुल करता? आणि आयुक्त महोदय आपण कमिशनर म्हणून इथे आहात हे असे विषय येतात ना त्यावेळी तुम्ही म्हणता समजून जा काय समजायला पाहिजे आम्ही. त्याच खुला खुला स्पष्टीकरण करावे.

**मा. महापौर :-**

आयुक्तांनी स्पष्टीकरण दिले आहे आपण बसुन जा.

**वंदना चक्रे :-**

आयुक्त महोदय, आपली याच्यात चुक नाही. आम्ही मान्य करतो पण महापौर मॅडम अशी दिशाभूल करु नका अशी सभागृहाच्या वतीने आपणांस विनंती करते. तुम्ही गोषवारा कायदेशीररित्या विषय आणा.

**मा. महापौर :-**

विषय काय आणायचे ते महापौरांचे अधिकार आहे आपल्याला जवाब भेटले आहे बसुन जा.

**प्रमोद सामंत :-**

संबंधित विषयास अनुसरुन प्रशासनाचा गोषवारा नाही. संबंधित विषय आर्थिक बाबीशी संबंधित असल्याने प्रशासनाची भुमिका स्पष्ट होणे आवश्यक होती. ह्या विषयात प्रशासनाची भुमिका संदिग्ध वाटते आहे. तरी सदरचा विषय गोषवाऱ्यासह पुन्हा नव्याने पटलावर आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्र.क्र. ९६ करिता दोन ठराव आलेले आहे. पहिला ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. राकेश शहा आणि दुसरा ठराव सुचक श्री. प्रमोद सामंत, अनुमोदन श्री. ध्रुवकिशोर पाटील दुसरा ठराव मतदानासाठी पुकारत आहे. सुचक श्री. प्रमोद सामंत यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने ३८, विरोधात ३३ इतकी मते पडली आहेत. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९६ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाखाली तरतूद करण्यात आलेली आहे. सदर अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार आवश्यक लेखाशिर्षात तरतूद करण्यासाठी खालील प्रमाणे पुर्नविनियोजन पत्रक सादर करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र लेखा सहीता १९७१ नमूना क्र. १० नियम ३०(३)**

| या शिर्षातून | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मूळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मूळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | सार्व. सुरक्षितता अग्निशमन विभाग (पृ.क्र. ६३) | अग्निशमन इमारत बांधकाम/ फर्निचर (पृ.क्र.६३) | १२५०.०० लक्ष | १५७.०० लक्ष | १०९३ लक्ष | सार्वजनिक बांधकामे (पृष्ठ क्र.४८) | नविन गटारे/ नाले बांधकाम | १४१५.०० लक्ष | ९३५.५४ लक्ष | १५५०.०० लक्ष | "अग्निशमन इमारत बांधकाम/ फर्निचर" या लेखाशिर्षातुन ३१ मार्च २०१६ पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन रु.१०००.०० लक्ष व "मालमत्ता कर पुर्न |
| २ | कर विभाग (पृ.क्र. ३५) | मालमत्ता कर पुर्न | ६००.०० लक्ष | - | ६००.०० लक्ष | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुल्यांकन करणे | | | | | | | | | मुल्यांकन करणे" या लेखाशिर्षातुन ३१ मार्च २०१६ पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन रु.५५०.०० लक्ष असे मिळून एकूण १५५०.०० लक्ष रक्कम "नविन गटारे/ नाले बांधकाम" या लेखाशिर्षात वर्ग करण्यात मान्यता देण्यात येत आहे. |

वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | अरोरा दिपिका पंकज | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | पाटील सुनिता कैलास | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | पुजारी कांचना शेखर | |
| १६ | सुजाता रविकांत शिंदे | १६ | पिसाळ मनिषा नामदेव | **निरंक** |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | इनामदार जुबेर | |
| २४ | जयमाला किशोर पाटील | २४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २५ | संध्या प्रफुल्ल पाटील | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | म्हात्रे प्रभाकर प्रद्‌माकर | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| २८ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २९ | प्रविण मोरेश्वर पाटील | २९ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३० | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | ३१ | नरेश तुकाराम पाटील | |
| ३२ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३२ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३३ | केळुसकर प्रशांत नारायण | ३३ | रविंद्र भिमदेव माळी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | भोईर भावना राजू | | | |
| ३५ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३६ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | | |
| ३८ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९७, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्व धर्मिय उत्सवाअंतर्गत सणांसाठी विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रशांत केळूसकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे १० लक्ष एवढी असून शहरात सर्व धर्मिय नागरीक एकत्रितपणे राहतात. सदर विविध धर्मिय नागरीकांमार्फत विविध सण एकत्रितपणे मोठ्या उत्सवाने साजरे केले जातात. सदर सणांमध्ये प्रामुख्याने श्री गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, रमझान ईद, बकरी ईद, गणगौर, कार्तिक पौर्णिमा, गुरुनानक जयंती, महाविर जयंती, वेलंकनी उत्सव, माघी गणेशोत्सव, साखर चौथ गणेशोत्सव, छट पुजा, दशमादेवी उत्सव इत्यादींचा समावेश आहे. त्याबरोबर १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे, जनता दरबार, शासकीय कार्यक्रम (पल्स पोलिओ) व इतर करीता विविध व्यवस्था करण्यात येते. सदर सण व उत्सवासाठी दरवर्षी विविध व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येते, त्याकरीता वार्षिक दराच्या निविदा मागवून दर निश्चित करण्यात येतात व मंजुर दराने कंत्राटदारामार्फत कामे करण्यात येतात. सदर सण /उत्सवासाठी कंत्राटदारामार्फत कामे करण्यात येतात. सदर सण /उत्सवासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | सणाचे /उत्सवाचे नाव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | श्री गणेशोत्सव/ माघी, साखर चौथ गणेश उत्सव इत्यादी कामी विसर्जन ठिकाणी विविध व्यवस्था करणे | रु. १२३.९५ लक्ष |
| २ | रमजान ईद/ बकरी ईद | रु. ३.०० लक्ष |
| ३ | कार्तिक पौर्णिमा | रु. ४.०० लक्ष |
| ४ | छटपुजा/ दशमादेवी उत्सव | रु. ६.०० लक्ष |
| ५ | गणगौर उत्सव | रु. ५.०० लक्ष |
| ६ | वेलंकनी उत्सव | रु. ४२.५० लक्ष |
| ७ | नवरात्र उत्सव | रु. १०.०० लक्ष |
| ८ | गुरुनानक जयंती | रु. ५.०० लक्ष |
| ९ | महाविर जयंती | रु. ३०.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे (ध्वजवंदन निमित्त) | रु. ३.०० लक्ष |
| ११ | आर्थिक गणना/ पल्स पोलिओ/ जनता दरबार व्यवस्था | रु. ७.०० लक्ष |
| १२ | श्री गणेशोत्सव विसर्जन कामी निर्माल्य कलश व्यवस्था | रु. १३.०० लक्ष |
| १३ | धारावी देवी मंदिर जत्रा / महाशिवरात्र | रु. ५.०० लक्ष |
| १४ | गुढीपाडवा दिंडी | रु. ५.०० लक्ष |
| १५ | फातीमा माता उत्सव | रु. ३.०० लक्ष |
| १६ | शिवजयंती | रु. ५.०० लक्ष |
| १७ | महाराणाप्रताप जयंती | रु. ५.०० लक्ष |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | रु. ५.०० लक्ष |

वरीलप्रमाणे व्यवस्था करणे कामी रु. २६३.२० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामी सन २०१४-१५ या वर्षात मा. महासभा दि. २६/६/२०१४, ठराव क्र. ०६ अन्वये निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतू दोन वेळा निविदा प्रसिध्द करून व निविदांना वेळोवेळी मुदतवाढ देऊन देखील सदर कामासाठी पुरेशा निविदा प्राप्त होऊ शकल्या नाहीत. दरम्यानच्या काळात सदर कामाची निकड लक्षता घेता सदर कामी सन २०१३-१४ या वर्षातील मंजुर ठेकेदारास सन २०१५-१६ या वर्षात येणाया सणांची विविध व्यवस्था करणे कामी दि. ३१/१०/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी सदर कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास व पाच वर्ष मुदतीसाठी निविदा मागविणेस मान्यता देण्यात येत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

महापौर मॅडम, छटपुजा के लिए खाली पावणे चार लाख रु. लगाया है उसका तरतुद थोडा बढाइए। उत्तर भारतीय भी किसी संख्या बहुत है। खर्चा पावणे चार लाख रु. दिया है, ६ लाख करो।

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने गेल्या वर्षी मी मिरा भाईंदर ख्रिसमस कार्निवलसाठी पण काही रक्कम सजेस्ट केली होती पण ते प्रशासनाने कॅन्सल केली. मला कारण वेगळच सांगितल की तरतुद नाही हे नाही वॉटएवर रिजन पण या वर्षी मी परत रिक्वेस्ट करत आहे. मिरा भाईंदर कार्निवलमध्ये पूर्ण मिरा भाईंदरच्या मुलांना ॲडल्टस् युथ सगळ्यांना आम्ही कॉम्पीटेशन ठेवतो. वेगवेगळे कार्यक्रम ठेवतो. ख्रिसमसचे मॅसेज देतो तर म्हणून रिक्वेस्ट आहे की, मिरा भाईंदर ख्रिसमस कार्निवलसाठी तरतूद करावी कमीत कमी ॲट लिस्ट गेल्या वेळी मी ४० लाख सजेस्ट केले होते पण ॲटलिस्ट २५ लाख तरी तरतूद द्यावी.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम पिछली बार २०१४ में जो ठराव किया गया था जैसे इन मॅडमने भी सूचना की थी उस विषय में जो पूरा विषय दिया गया था ठराव मंजूर हुआ था उसके अंदर छत्रपती शिवाजी जयंती का भी उल्लेख था, बाबासाहेब आंबेडकर जयंती का भी उल्लेख था, महाराणा प्रताप जयंती का भी उल्लेख था। लेकिन इसबार जो विषयपत्रिका के अंदर में गोषवारा आया है उसमे कही भी इनका उल्लेख नही किया गया है। तो इनको अलग से क्यों लिया। दुसरी बात उसी ठराव के अंदर सूचना जो हुई थी उसमें मॅडम ने भी सूचना की थी दुसरी और एक सूचना की असेन्ला मेंडोसा ने उसमें हनुमान जयंती का भी उल्लेख किया है। यह ४-५ जयंतीयो का इसके अंदर में नाम कट करने का तात्पर्य क्या है। और अभी जो ठराव बनाया उसके अंदर भी उनको महाराणा प्रताप जयंती, आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी जयंती, हनुमान जयंती सबाको अलग किया गया है। यह शहर सर्वधर्म समभाव का है। यहाँ पे सभी जात पंथ के लोग रहते है। हमको सभी का आदर करके जिस तरह से सार्वजनिक उत्सव होते है, जो परंपरा से चले आ रहे है और कुछ सुचना करके किए गए है आपसे रिक्वेस्ट है की, इन सभी को उसमें संमेलित करके जो भी उनपे उपर सादर किया जाता है वो करना चाहिए।

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम या देशाचे भारताचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची घटना लिहिली आणि सर्वांना एकसमान अधिकार हक्क दिला अमिर-गरिब, करोडपती, रोडपती यांना एक मतदानाचा अधिकार दिला या बाबासाहेब आंबेडकरांचे नाव पहिले यादीत होत आता नाही. जस महावीर भगवानजींच आहे तस भगवान गौतम बुध्दाच नाव त्यामध्ये समाविष्ट करुन घ्याव आणि त्यामध्ये त्या खर्चाची तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

**शिल्पा भावसार :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलु इच्छिते, जलाराम जयंती पण मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येत आहे. म्हणून त्याची पण नोंद घ्यावी आणि जन्माष्टमी उत्सवाची पण नोंद घेण्यात यावी.

**जयंतीलाल पाटील :-**

महापौर मॅडम, पल्स पोलिओ हा धार्मिक सण आहे का? पल्स पोलिओसाठी ७ लाख रु. तरतुद आहे हा काय धार्मिक सण आहे का?

**मा. महापौर :-**

पल्स पोलिओसाठी जे मंडप लागतात किंवा जनता जनार्दनासाठी जे मंडप लागते त्या मंडपाच्या व्यवस्थेसाठी ते केले आहे.

**प्रमोद सामंत :-**

महापौर मॅडम, जवळ जवळ गेल्या ४ वर्षात सर्वधर्म उत्सवासाठी जो आपण खर्च करतो तो ८० लाखावरुन अडीज करोड पर्यंत आलेला आहे म्हणजे संपूर्ण शहराचा आणि सगळ्या रहिवाश्यांच्या आपल्या सभागृहाच्या भावना सर्व लोकांपर्यंत नक्कीच पोहोचतील. कारण सर्वधर्म आपण शहरामध्ये चांगल्या पध्दतीने साजरे केले पाहिजे अशी आपली आमची आमदारांची इतर दोन आमदारांची इच्छा आहे असे मला वाटते. काही-काही गोष्टी या गोषवाऱ्यात राहिलेल्या आहेत रमजान ईद दरम्यान आपले मुस्लिम बांधव ईदीची कुर्बानी देतात बऱ्याच ठिकाणी तक्रारी होतात. आमच्या बाजुलाच इथे कल्पतरु म्हणून सोसायटी झाली आहे. तिथे पण तक्रारी आहेत तर त्यामध्ये रमजान आणि बकरी ईदच्या साठी कुर्बानीच्या दिवशी वेगवेगळ्या व्यवस्था पूर्ण शहरामध्ये मग ते उत्तन असो भाईंदर ईस्ट असो वेस्ट असो, काशी असो, मिरारोड असो सगळ्या ठिकाणी करण्यात यावी. त्यासाठी जी व्यवस्था लागणार आहे ती करावी. गोषवाऱ्यामध्ये शिवजयंतीसाठी कुठला उल्लेख केला नव्हता. शिवजयंतीसाठी सुध्दा १० लाखाची व्यवस्था करावी. गुढीपाडवा जवळजवळ ५ लाखाची व्यवस्था झाली पाहिजे. महाराणा प्रताप जयंती, हनुमान जयंती आणि आमच्या मर्लिन मॅडम सांगतात २-३ वर्ष झाले आम्ही ठराव केला होता पण गेल्या वर्षी ती व्यवस्था आपल्याला करता आली नाही. त्यांच्यासाठी पण

कार्निवलची व्यवस्था झाली पाहिजे आणि जो काय खर्च होईल तो या पूर्ण बजेट मध्येच राहिल असं बघावे रमजान ईद, बकरी ईदची व्यवस्था करण्या इतकी पूर्ण शहरामध्ये कुर्बानीसाठी व्यवस्था करण्यासाठी जवळ-जवळ २५ लाख, ३० लाखाची तरतूद करणे गरजेचे आहे. शिवजयंती साजरी करण्यासाठी १० लाखाची गरज आहे. गुडी पाडवासाठी ५ लाख आणि उर्वरित जी शिल्लक राहील त्यामध्ये आपण जवळ-जवळ सगळे सण साजरे करु असं बघा. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे १० लक्ष एवढी असून शहरात सर्व धर्मिय नागरीक एकत्रितपणे राहतात. सदर विविध धर्मिय नागरीकांमार्फत विविध सण एकत्रितपणे मोठ्या उत्सवाने साजरे केले जातात. सदर सणांमध्ये प्रामुख्याने श्री गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, रमझान ईद, बकरी ईद, गणगौर, कार्तिक पौर्णिमा, गुरुनानक जयंती, महाविर जयंती, वेलंकनी उत्सव, माघी गणेशोत्सव, साखर चौथ गणेशोत्सव, छट पुजा, दशमादेवी उत्सव इत्यादींचा समावेश आहे. त्याबरोबर १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे, जनता दरबार, शासकीय कार्यक्रम (पल्स पोलिओ) व इतर करीता विविध व्यवस्था करण्यात येते. सदर सण व उत्सवासाठी दरवर्षी विविध व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येते, त्याकरीता वार्षिक दराच्या निविदा मागवून दर निश्चित करण्यात येतात व मंजुर दराने कंत्राटदारामार्फत कामे करण्यात येतात. सदर सण /उत्सवासाठी कंत्राटदारामार्फत कामे करण्यात येतात. सदर सण /उत्सवासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | सणाचे /उत्सवाचे नाव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | श्री गणेशोत्सव/ माघी, साखर चौथ गणेश उत्सव इत्यादी कामी विसर्जन ठिकाणी विविध व्यवस्था करणे | रु. ७०.०० लक्ष |
| २ | रमजान ईद/ बकरी ईद | रु. २५.०० लक्ष |
| ३ | कार्तिक पौर्णिमा | रु. ४.०० लक्ष |
| ४ | छटपुजा/ दशमादेवी उत्सव | रु. ३.७५ लक्ष |
| ५ | गणगौर उत्सव | रु. ५.०० लक्ष |
| ६ | वेलंकनी उत्सव | रु. ४२.५० लक्ष |
| ७ | नवरात्र उत्सव | रु. १०.०० लक्ष |
| ८ | गुरुनानक जयंती | रु. ५.०० लक्ष |
| ९ | महाविर जयंती | रु. ३०.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे (ध्वजवंदन निमित्त) | रु. ३.०० लक्ष |
| ११ | आर्थिक गणना/ पल्स पोलिओ/ जनता दरबार व्यवस्था | रु. ७.०० लक्ष |
| १२ | श्री गणेशोत्सव विसर्जन कामी निर्माल्य कलश व्यवस्था | रु. १३.०० लक्ष |
| १३ | बौध्द जयंती | रु. ५.०० लक्ष |
| १४ | दुर्गा पुजा | रु. ५.०० लक्ष |
| १५ | शिवजयंती | रु. १०.०० लक्ष |

मिरा भाईंदर परिक्षेत्रात शाकाहार व मांसाहार करणारी लोक गाडीगुलाबीने रहात असून हे शहर वेगाने वाढत चाललेले आहे. तसेच उत्तन ते चेणा पर्यंत मुस्लीम धर्मियांचे मोठ्या संख्येत या शहरात ऐतहासिक वास्तव्यही आहे. मुस्लीम बांधवांच्या रमजान ईदला कुठलीही मोठी व्यवस्था पालिकेला करावी लागत नाही. मात्र बकरी ईद या सणात कुर्बानी करणेसाठी व्यवस्थाकरणे गरजेचे आहे. तरी सदरकामी महापालिकेने आरक्षीत मैदानात व उघड्या भुखंडामध्ये शहराच्या विविध भागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात दरवर्षी कुर्बानी करण्यासाठी व्यवस्था करावी व या कामासाठी उपरोक्त तरतुद करण्यात आलेली आहे. वरीलप्रमाणे व्यवस्था करणे कामी रु. २६३.२० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामी सन २०१४-१५ या वर्षात मा. महासभा दि. २६/६/२०१४, ठराव क्र. ०६ अन्वये निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतू दोन वेळा निविदा प्रसिध्द करून व निविदांना वेळोवेळी मुदतवाढ देऊन देखील सदर कामासाठी पुरेशा निविदा प्राप्त होऊ शकल्या नाहीत. दरम्यानच्या काळात सदर कामाची निकड लक्षता घेता सदर कामी सन २०१३-१४ या वर्षातील मंजुर ठेकेदारास सन २०१५-१६ या वर्षात येणाया सणांची विविध व्यवस्था करणे कामी दि. ३१/१०/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरकामी २०१५-१६ या आर्थिक वर्षात सर्वधर्मिय उत्सव, मंडप, लाईट व इतर व्यवस्था या लेखाशिर्षाखाली रु. २५० लक्ष तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तरी सदर कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास व पाच वर्ष मुदतीसाठी निविदा मागविणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच खर्च मनपा निधीतुन होत असल्यामुळे कार्यक्रमाचे माहिती फलक फक्त मनपाचे लावण्यात येतील. अन्य कोणत्याही सामाजिक, धार्मिक संस्था, राजकीय पक्ष किंवा पदाधिका-यांचे फलक महानगरपालिकेच्या माध्यमातून लावण्यात येणार नाही असा मी ठराव मांडत आहे. तसेच तरतुद कमी पडल्यास पुर्नविनियोजन करुन व्यवस्था करण्यात यावी.

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**शिल्पा भावसार :-**

महापौर मॅडम, सूचनेसहित घेण्यात यावे जलाराम जयंती आणि कृष्ण जन्माष्टमीची पण नोंदणी करण्यात यावी.

**भगवती शर्मा :-**

पल्स पोलिओ और आर्थिक गणना के लिए प्रशासन को राज्यसरकार या केंद्र सरकार की और से फंड नही मिलता है क्या? क्योंकी आर्थिक गणना और पल्स पोलिओ के लिए सरकार से अनुदान मिलता है तो उसको इसमें संमिलीत क्यों किया गया?

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, त्यांच्याकडून काही प्रमाणामध्ये अनुदान येतो पण व्यवस्था सगळी आपण करतो आपल्या टेंडरमधुन.

**भगवती शर्मा :-**

आपल्याला फंड मिळतो ना त्यांच्याकडून.

**दिपक खांबित :-**

काही प्रमाणात अनुदान मिळते त्यांच्याकडून त्यातून होत नाही सगळ.

**भगवती शर्मा :-**

मग आपल्याला फंड कमी मिळतात का?

**दिपक खांबित :-**

हो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९७ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक श्री. प्रशांत केळुसकर, अनुमोदन श्री. प्रेमनाथ पाटील आणि दुसरा ठराव सूचक श्री. प्रमोद सामंत, अनुमोदन श्रीम. वंदना चक्रे. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकत आहे. सूचक श्री. प्रमोद सामंत यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी. सूचक श्री. प्रशांत केळूसकर यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. प्रशांत केळूसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८, विरोधात ३२ इतकी मते पडली आहेत. सूचक श्री. प्रशांत केळूसकर यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

महापौर मॅडम, सत्ताधाऱ्यांनी विरोध केलेलाच आहे. शहर वेगाने वाढते साहेब. नविन लोक येथे राहायला येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

२ कोटी ६५ लाख रु. बजेटमध्ये तरतूद आहे. त्यानुसार तुम्ही ठराव केलेला आहे. आपल्याला काय वाढवायचे असेल तर रि-अप्रोप्रिएशन करावे लागेल. रितसर प्रशासन मार्फत तो विषय यावा लागेल. फंड डायव्हर्ट करावा लागेल नंतर तो विषय करता येईल.

(सभागृहात गोंधळ)

**मर्लिन डिसा :-**

मॅडम गेल्यावर्षी पण ठराव अप्रूव्ह करुन सुध्दा ते झालं नाही. पण आता तुम्हाला रिक्वेस्ट केली होती तुम्ही तरी घ्यायला पाहिजे होत ना हा पूर्ण शहर सर्व धर्म आहे. सर्व धर्माची लोक आहे.

**मा. महापौर :-**

मला काही प्रॉब्लेम नाही.

**मर्लिन डिसा :-**

मोठं मन ठेवून सर्वांनी तुम्ही सर तुम्ही पण करा ना.

**नरेंद्र मेहता :-**

आय ॲग्री ना. सभागृहाची भावना काय ते आम्ही लक्षात घेतलेली आहे आणि ते करायला पाहिजे आमची काही हरकत नाही. पुढच्या वेळी आयुक्त साहेबांनी बजेटचे रि-अप्रोप्रिएशन आणावा आणि हा नविन विषय घ्यावा ना. आता करणार कसं बजेटची तरतूद नसताना.

**मर्लिन डिसा :-**

बजेटमध्ये तरतूद नसताना अस कितीतरी ॲड केले ना तुम्ही सर.

**नरेंद्र मेहता :-**

पुढच्यावेळी रितसर आयुक्त साहेबांनी रि-अप्रोप्रिएशन देवून बाकीचे धर्मोत्सव जे राहिले जे सन्मा. सदस्यांनी ठराव मांडला आहे ते सादर करावे आमची काही हरकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम सगळ्या सभागृहाची विनंती आहे चहाची व्यवस्था करण्यात यावी.

**प्रकरण क्र. ९७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्व धर्मिय उत्सवाअंतर्गत सणांसाठी विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या सुमारे १० लक्ष एवढी असून शहरात सर्व धर्मिय नागरीक एकत्रितपणे राहतात. सदर विविध धर्मिय नागरीकांमार्फत विविध सण एकत्रितपणे मोठ्या उत्सवाने साजरे केले जातात. सदर सणांमध्ये प्रामुख्याने श्री गणेशोत्सव, नवरात्र उत्सव, रमझान ईद, बकरी ईद, गणगौर, कार्तिक पौर्णिमा, गुरुनानक जयंती, महाविर जयंती, वेलंकनी उत्सव, माघी गणेशोत्सव, साखर चौथ गणेशोत्सव, छट पुजा, दशमादेवी उत्सव इत्यादींचा समावेश आहे. त्याबरोबर १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे, जनता दरबार, शासकीय कार्यक्रम (पल्स पोलिओ) व इतर करीता विविध व्यवस्था करण्यात येते. सदर सण व उत्सवासाठी दरवर्षी विविध व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येते, त्याकरीता वार्षिक दराच्या निविदा मागवून दर निश्चित करण्यात येतात व मंजुर दराने कंत्राटदारामार्फत कामे करण्यात येतात. सदर सण /उत्सवासाठी कंत्राटदारामार्फत कामे करण्यात येतात. सदर सण /उत्सवासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | सणाचे /उत्सवाचे नाव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | श्री गणेशोत्सव/ माघी, साखर चौथ गणेश उत्सव इत्यादी कामी विसर्जन ठिकाणी विविध व्यवस्था करणे | रु. १२३.९५ लक्ष |
| २ | रमजान ईद/ बकरी ईद | रु. ३.०० लक्ष |
| ३ | कार्तिक पौर्णिमा | रु. ४.०० लक्ष |
| ४ | छटपुजा/ दशमादेवी उत्सव | रु. ६.०० लक्ष |
| ५ | गणगौर उत्सव | रु. ५.०० लक्ष |
| ६ | वेलंकनी उत्सव | रु. ४२.५० लक्ष |
| ७ | नवरात्र उत्सव | रु. १०.०० लक्ष |
| ८ | गुरुनानक जयंती | रु. ५.०० लक्ष |
| ९ | महाविर जयंती | रु. ३०.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे (ध्वजवंदन निमित्त) | रु. ३.०० लक्ष |
| ११ | आर्थिक गणना/ पल्स पोलिओ/ जनता दरबार व्यवस्था | रु. ७.०० लक्ष |
| १२ | श्री गणेशोत्सव विसर्जन कामी निर्माल्य कलश व्यवस्था | रु. १३.०० लक्ष |
| १३ | धारावी देवी मंदिर जत्रा / महाशिवरात्र | रु. ५.०० लक्ष |
| १४ | गुढीपाडवा दिंडी | रु. ५.०० लक्ष |
| १५ | फातीमा माता उत्सव | रु. ३.०० लक्ष |
| १६ | शिवजयंती | रु. ५.०० लक्ष |
| १७ | महाराणाप्रताप जयंती | रु. ५.०० लक्ष |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | रु. ५.०० लक्ष |

वरीलप्रमाणे व्यवस्था करणे कामी रु. २६३.२० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामी सन २०१४-१५ या वर्षात मा. महासभा दि. २६/६/२०१४, ठराव क्र. ०६ अन्वये निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतू दोन वेळा निविदा प्रसिध्द करून व निविदांना वेळोवेळी मुदतवाढ देऊन देखील सदर कामासाठी पुरेशा निविदा प्राप्त होऊ शकल्या नाहीत. दरम्यानच्या काळात सदर कामाची निकड लक्षता घेता सदर कामी सन २०१३-१४ या वर्षातील मंजुर ठेकेदारास सन २०१५-१६ या वर्षात येणाया सणांची विविध व्यवस्था करणे कामी दि. ३१/१०/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी सदर कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास व पाच वर्ष मुदतीसाठी निविदा मागविणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर      अनुमोदक :- श्री. प्रेमनाथ पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | निरंक |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| १० | अरोरा दिपिका पंकज | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | पाटील सुनिता कैलास | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | पुजारी कांचना शेखर | |
| १६ | सुजाता रविकांत शिंदे | १६ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १७ | पाटील प्रेमनाथ गजानन | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | सिंग मदन उदितनारायण | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | कांगणे यशवंत ठकाजी | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | जैन दिनेश तेजराज | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | जैन रमेश धरमचंद | २२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २३ | डॉ. राजेंद्र जैन | २३ | इनामदार जुबेर | |
| २४ | जयमाला किशोर पाटील | २४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २५ | संध्या प्रफुल्ल पाटील | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| २८ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २९ | प्रविण मोरेश्वर पाटील | २९ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३० | ठाकुर अरविंद दत्ताराम | ३० | नरेश तुकाराम पाटील | |
| ३१ | शाह राकेश रतिशचंद्र | ३१ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३२ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३२ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३३ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३४ | भोईर भावना राजू | | | |
| ३५ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३६ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३७ | मुन्ना सिंग | | | |
| ३८ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९८, फेरीवाल्यांकरीता गठित केलेल्या समितीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. महापौर मॅडम आपण हा विषय घेतला फेरिवाला समितीबाबत विचार विनिमय करण्याबाबत खरोखर मी तुमच अभिनंदन करतो. आयुक्त महोदयाचे पण अभिनंदन करतो. प्रत्येक वेळी हा विषय येत असतो. आम्ही त्या प्रशासनाच्या विरोधात वाभोडे काढले पण जराही प्रशासन निर्लज्ज प्रशासन आहे. महापौर मॅडम बऱ्याच वेळा .......................

**मा. आयुक्त :-**

सभागृहामध्ये सभागृहाचा अपमान होईल अशी वाक्य वापरू नये.

**प्रशांत दळवी :-**

मी सभागृहाचा अपमान केलेला नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

आपल्या आदेशाप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे. आणि हा विषय बेकायदेशीर आपण पटलावर घेतलेला आहे.

**प्रमोद सामंत :-**

महापौर मॅडम, १५ मिनिट निवेदन केल्यानंतर आपण कुठलेही आदेश दिले नाही. मी उभं राहून तुम्हाला सांगितलय कुठलंही रुलिंग द्या, ताकीद द्या. प्रशासन चुकीच असेल तर प्रशासनावर कारवाई करा. जर नगरसेवक चुकीचे असतील तर त्यांच्यावर कारवाई करा. जर आपले पोलिस प्रशासन लक्ष देत नसेल तर त्यांच्यावर कारवाई करा. जर सभागृहाच्या माध्यमातून काही करायचे असेल, नो हॉकर्स झोन करायचे असेल किंवा दुसऱ्या ठिकाणी मार्केट हलवायचे असेल तर ती कारवाई करा. पण गेल्या वेळी १५ मिनिट आमचे सदस्यांनी बोलल्यानंतर महापौर म्हणून तुम्ही कुठलेही आदेश दिले नाही. म्हणून हे जे एवढे हा जो आता प्रशासनाने तगादा दाखवला आहे की एवढ्या सभागृहासमोर ही एक विसंगती म्हणजे काय, करा कारवाई त्यांच्यावर.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, जर या माझ्या काही विधानाने जर सभागृहाचे त्यात काही हे होणार असेल तर मी स्वतः दिलगिरी व्यक्त करतो मी असं काही शब्द बोललो नाही पण जर कुणाला काही त्रास झाला असेल तर तो शब्द मी मागे घेतो.

**मा. आयुक्त :-**

सभागृह आणि सगळे पत्रकार साक्षीदार आहेत. प्रशासनाला इतके कमजोर समजायचे नाही.

**प्रशांत दळवी :-**

आयुक्त साहेब तुम्ही आम्हाला धमकी देवू नका. असं असेल तर हा आमचा राजीनामा पण स्वीकारा.

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त महोदय एखाद्या सन्मा. सदस्यांनी चुकीचं वक्तव्य केल असेल अनशोभनीय शब्द वापरला असेल त्यासाठी त्यांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे यात आम्ही काय त्यांना पाठिशी घालत नाही. परंतु आपण याप्रकारे आज संपूर्ण सभागृहाचा अवमान करुन बाहेर जाणे निषेध करणे हे कितपत योग्य आहे. त्या व्यक्तीने आपल्याबद्दल किंवा प्रशासनाबद्दल काही भूमिका घेतली कोणी त्यांना पाठिशी घातलं नाही.

**मा. आयुक्त :-**

भुमिका घेऊ द्या आम्ही १०० ऐकतो भाषणे तुमचे आम्ही पण कधी निर्लज्ज आहे, हे शब्द काय बोलायचे.

**नरेंद्र मेहता :-**

कुठले १०० भाषणे ऐकले आमचे. आम्ही भाषण करायला येत नाही. आयुक्त साहेब आपल्यालाही माहित आहे की त्या ना फेरिवाला क्षेत्रामध्ये पंचवीसदा तुम्ही गेले एकदाही कारवाई झाली. आजही आपण १० मिनिट तहकूब करु या आपण आणि महापौर विजिट करा. आजही ते तुमच्या नाकाखाली बसले आहेत हे शेवटी सन्मा. सदस्य भरुन बोलत असतो त्याला हौस नसते याप्रकारे बोलायची आणि एखादा सदस्य कितींदा तुम्ही मला पण विचारा माझी पण व्यथा तीच असणार. कदाचित महापौरांची पण. त्या पर्टिक्युलर गल्लीत त्या पर्टिक्युलर एका अधिकाऱ्यासाठी त्या स्वप्नील सावंत नावाचे आपले प्रभाग अधिकारी ते पाठिशी घालतात. कितीवेळा आपली चर्चा झाली, दोनदा, तिनदा आपण स्वतः दोनदा तिथे जाऊन आले काही निष्पन्न झाले का?

**मा. आयुक्त :-**

कधीच कारवाई करत नाही या मताशी मी अजिबात सहमत नाही. मी सपोर्ट करत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आत्ताही बसलेत. आपल्याला परत एकदा विनंती आहे महापौर मॅडम अशाप्रकारचे हे घडलेले आहे. आणि सन्मा. सदस्यांनी त्यांची दिलगिरी व्यक्त केली आहे. असं काही बोलले असतील तर शब्द ही मागे घेतलेले आहेत. आणि ते शब्दही काढावे. परंतु ही परिस्थिती तेवढीच सत्य आहे की प्रशासनाने जे निषेध व्यक्त केले आहे त्यांनी ही दिलगीरी व्यक्त करावी आणि आपले मनोगत करावे.

**मा. आयुक्त :-**

साहेब आमच्याकडून कधी अशा प्रकारचे वक्तव्य होणार नाही. या सभागृहाचा मानपान आम्ही १०० टक्के राखू. पण सन्मा. सदस्यांनी आपण सभागृहात बोलत आहोत या जनतेने आपल्याला निवडून दिले आहे आणि या सभागृहामध्ये सभागृहाचा अपमान होईल हे अनपार्लिमेंटरी लॅग्वेज सभागृहात नको सर. आपण मा. आमदार आहात आपल्याला सगळ्या गोष्टीची कल्पना आहे. आपण त्यांना समज द्यावी माझ्याकडून चूक झाली असे वाटत असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो.

**नरेंद्र मेहता :-**

मी चुक नाही म्हणत आपल्याला असे वाटत असेल की सभा आयुक्त महोदय महानगरपालिका मी तर १२-१५ वर्षापासुन आहे प्रभातताई आहे आजपर्यंत असं कधी झाल नाही की सभा चालु असताना त्यानंतर तुम्हालाही योग्य वाटल असत. महापौरांना सांगितल असतं सभागृहाला सांगितल असत तुम्हाला योग्य वाटेल ती कारवाई केली असती. तक्रार केली असती पण सभागृह त्यागनं प्रशासनाने आणि महापौर तिकडे बसले

असताना आपण उठून जाणे हे साहेब आपल्याला विदाऊट परवानगी उठूनही जाता येत नाही. आपण तर त्यागुनच गेले.

**मा. आयुक्त :-**

मी पानपट्टे साहेबांना इथे बसवून नंतर बाहेर गेलो.

**नरेंद्र मेहता :-**

मग पानपट्टे साहेब कसे गेले?

**मा. आयुक्त :-**

सभागृहात जर हे अशा प्रकारे होणार असेल तर मी बाहेर या म्हणून सांगितले त्यांना आणि परत मला ते घेऊन आले. मी काय आपल्या विरोधात निघून गेलो पण मला पण काही तरी स्वाभिमान आहे ना, प्रशासनाला काही स्वाभिमान आहे की नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही आमच्या भाष्यात पहिलेच सांगितले एका व्यक्तीची गलती सगळ्या सभागृहाला नको.

**मा. आयुक्त :-**

सर प्रशासन आणि शासन ही एका गाडीची दोन चाके आहेत. तुम्ही एकीकडे ओढायचे आम्ही एकीकडे ओढायचे. एक दिवस सुध्दा काम इथे होऊ शकत नाही. तरी पण आम्ही सगळ्यांना सोबत घेऊन चालतो या ठिकाणी काम करतो आणि त्याच्यानंतर जर तुम्ही अशाप्रकारे दादागिरीची भाषा करुन जर बोलत असाल पत्रकार आहेत अशा प्रकारची अनपार्लमेंटरी लँग्वेज आम्ही अजिबात खपवून घेणार नाही सर. आमच्याकडून काही चूक झाली तर एकदा सोडून १० वेळेस माफी मागू आपली.

**नरेंद्र मेहता :-**

त्याच दोष आपण सभागृहाला देऊ शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाला देतच नाही मी दोष.

**नरेंद्र मेहता :-**

एखाद्या सदस्याने केल्यावर तुम्ही संपूर्ण सभागृहाला दोषी ठरवू शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाला मी दोषी म्हणत नाही पण तुमच्या सभागृहात अशी लँग्वेज होऊ नये सर. ५० टक्के लेडीज आहेत इथे. उद्या कोणी शिवीगाळ केले तर चालेल का?

**मा. महापौर :-**

आपण सगळ्यांनी बसून घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांचे संरक्षण तसेच त्याबाबत कृती आराखडा तयार करणेकामी मा. सर्वोच्च न्यायालयाने फेरीवाला समिती स्थापन करणे, फेरीवाल नियमावली तयार करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांबाबत नियमावली तयार करणे, फेरीवाला समिती तयार करण्याची कार्यवाही करुन सदर समिती करीता उमेदवारांची नियुक्ती केली असल्याचे समजते.

परंतु सदर केलेल्या कार्यवाही बाबत सर्व पदाधिकारी व लोकप्रतिनिधी हया बाबत प्रशासनाकडुन माहिती देण्यांत आलेली नाही, तसेच याची प्रसिद्धी सुद्धा मोठया प्रमाणात झालेली नाही. समिती निवडीबाबत तक्रारीसुद्धा झालेल्या आहेत. तेव्हा उपरोक्त कारणास्तव प्रशासनाने गठीत केलेली समिती त्वरीत रद्द करुन सदर बाबत नव्याने प्रक्रीया करण्यांत यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ९८ :-**

फेरीवाल्यांकरीता गठित केलेल्या समितीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ६९ :-**

महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांचे संरक्षण तसेच त्याबाबत कृती आराखडा तयार करणेकामी मा. सर्वोच्च न्यायालयाने फेरीवाला समिती स्थापन करणे, फेरीवाल नियमावली तयार करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांबाबत नियमावली तयार करणे, फेरीवाला समिती तयार करण्याची कार्यवाही करुन सदर समिती करीता उमेदवारांची नियुक्ती केली असल्याचे समजते.

परंतु सदर केलेल्या कार्यवाही बाबत सर्व पदाधिकारी व लोकप्रतिनिधी हया बाबत प्रशासनाकडुन माहिती देण्यांत आलेली नाही, तसेच याची प्रसिद्धी सुद्धा मोठया प्रमाणात झालेली नाही. समिती निवडीबाबत तक्रारीसुद्धा झालेल्या आहेत. तेव्हा उपरोक्त कारणास्तव प्रशासनाने गठीत केलेली समिती त्वरीत रद्द करुन सदर बाबत नव्याने प्रक्रीया करण्यांत यावी. असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९९, भाईंदर (प.) व (पूर्व) रेल्वे ब्रिजजवळ नवीन जेटीची मजबुतीकरण व रुंदीकरण करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

**नरेंद्र मेहता :-**

प्रकरण क्र. ९९ च्या ठरावाचे वाचन केले.

**प्रशांत केळूसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुमची काहीही तक्रार असेल तुम्ही आयुक्तांना जाऊन भेटा.

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम, ९८ फेरिवाला गठित करण्याबाबतचा विषय आला. बेकायदेशीर आहे सभागृहाला मी विनंती करते तुम्ही मला हसता मी एवढे ओरडून बोलते.

**मा. महापौर :-**

फक्त विषयावर बोला.

**वंदना चक्रे :-**

मॅडम त्याच विषयावर बोलते मी सगळ्यात प्रथम तर अभिनंदन आयुक्त महोदयाचे करते की, ही तीव्र प्रकारची योजना आहे. हे आपल्या जाहिरात दिल्या आहे. कितीवेळा जाहिरात दिल्यानंतर हा विषय महासभेत आलेला आहे. हा बेकायदेशीर विषय आहे. जाहिरात आल्याच्यानंतर ज्या संस्थांनी ज्या युनियननी जे त्यांच्यावरचे ऑडिट होते त्या लोकांची इथे नेमणूक झाली आहे. मी आयुक्त महोदयांनी, महापौर मॅडमला विनंती करते ज्या-ज्या सदस्यांची निवड झाली त्या सदस्यांच्या मानधनाबद्दल त्यांच्या लेटरपॅड बद्दल, त्यांच्या व्हिजीटींग कार्ड बद्दल मला या ठिकाणी बोलायचं होतं. त्याचे कारण आपण हा विषय इथे आणायला नाही पाहिजे. आपण तज्ञ आहात, शिकलेले आहात, आपले सरकार आहे हे असताना सभागृहाची दिशाभूल का करता हे विचारण्यासाठी मी तळमळीने म्हणते की पहिले बोलायला द्या कारण याच्यातील कायदेशीर निघालेली आहे. जाहिरात कायदेशीर याचे आम्ही फॉर्म भरले आहेत जे कोणी असेल ते त्याच्यातील तीस जण आहेत. त्या तीस जणांचे नाव मी तुम्हाला वाचुन दाखविते.

**मा. महापौर :-**

मॅडम नाव वाचायची गरज नाही आपली तक्रार काय ते बोला फक्त.

**वंदना चक्रे :-**

माझी तक्रार हीच आहे तुम्ही हा विषय बेकायदेशीर कसा आणला. इतके वर्ष झाले महासभेत कॅटलीन परेरा महापौर होत्या.

**मा. महापौर :-**

तुम्हाला या बद्दल काही ठराव मांडायचा आहे का?

**वंदना चक्रे :-**

ठरावाचा महानगरपालिकेचा काही संबंध नाही मॅडम. महानगरपालिका यात कुठल्याच कायद्यात बसत नाही तुम्ही जी.आर शासनाचा वाचा. आदरणीय आयुक्त महोदय बाजुला आहेत त्यांना विचारुन घ्या. कायदा काय आहे तुम्ही विषय आणला कसा आम्हाला या विषयावर बोलायचं आहे तुम्ही हा विषय घेऊ शकत नाही. साहेब मी तुमच अभिनंदन करते आणि जे सदस्य निवडून आले आहेत त्या सदस्यांचा सत्कार विधी आदरणीय या ठिकाणचे नगरसेवक आणि आमदार नरेंद्र मेहता त्यांनी या आपल्या पत्रकार कक्षामध्ये पत्रकार सदस्यांचे त्यांनी सन्मान, सत्कार केले आहे मग हा विषय आणायची गरज काय? हा विषय कशाला आणता पटलावर नसताना आणायची गरज काय? म्हणजे तुम्ही सभागृहाची दिशाभूल का करता? आयुक्त महोदय महापौर मॅडम तुम्हाला विनंती करते याचं उत्तर मला द्यावे तुम्ही उत्तर दिले नाही तर मी सभागृह चालु देणार नाही.

**मा. आयुक्त :-**

मॅडम सभागृहामध्ये विषय आला आहे चर्चा झाली ठराव मांडला बेकायदेशीर ठराव असेल तर त्याच्यावर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल. तुमची नेमणूक केल्याचे पत्र मिळाले ना तुम्हाला.

**वंदना चक्रे :-**

हो साहेब मिळाले. कायद्याने होतच नाही तर कसा काय ठराव आला. ठराव घेण्याचे अधिकार नाही. महापौरांचे सन्मान करतो पण ठराव घेण्याचे अधिकार नाही.

**मा. आयुक्त :-**

लिहिले आहे डिपार्टमेंट मधुन तपासून काही बेकायदेशीर असेल तर रद्द करण्यात येईल.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम, भाईंदर पूर्व व पश्चिम का जेटी का विषय आया है इसके अंदर में भाईंदर (पूर्व) में जेटि के लिए ९ करोड ५७ लाख का खर्चा दिखाया गया है। भाईंदर (प.) में. ७२ लाख का खर्चा दिखाया गया है। मेरा यह कहना है की यह पैसा मनपा का खर्चा हो रहा है। मैं आपको ध्यान दिलाना चाहता हूँ की अगस्त २०१४ में महाराष्ट्र शासन ने आमदारों को एक विशेष निधी दि थी उसके अंदर में तत्कालिन आमदार श्री. गिल्बर्ट मेंडोन्सा को १० करोड की निधी मिली थी उसके अंदर में उन्होने देड करोड का निधी भाईदर (प) में विसर्जन घाट बांधने के लिए दि थी और उसका निधी की प्रक्रिया भी पूर्ण हुआ था स्थायी समिती के अंदर में २८/८/२०१४ को वो विषय आया था उसमे सदरची जागा सी.आर. झेड मध्ये येत आहे व सी.आर.झेड ची मान्यता घेणे आवश्यक आहे ऐसे करके उस विषय को वापिस कर दिया था प्रशासन ने उसके बाद १९/०३/२०१५ को जिल्हाधिकारी को एक पत्र लिखा था। जिसमे लिखा था भाईदर (प) येथे नविन विसर्जन घाट बांधणे भाईदर (प) येथे रेल्वे जागेत जुने विर्सजन घाट असुन सदर विसर्जन घाटाकडे जाणारा रस्ता रेल्वेच्या मार्फत बंद करण्यात येणार आहे. भाईदर (प) भागातील श्री. गणेश विसर्जन व इतर सण याकरिता लागणा-या विसर्जन घाटाची आवश्यकता लक्षात घेता नविन ठिकाणी विसर्जन घाट बांधण्याचे काम प्रस्थपित करण्यात आले होते. सदर जागा ही सी.आर.झेड ची बाधित होत असल्याने सक्षम प्राकिरणाकडे सी.आर.झेडच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता दरम्यानच्या काळात शासनाने प्राथमिक सोयी सुविधंच्या विकास कामासाठी मंजुर केलेल्या यादीत सदर कामाचा समावेश असल्या कारणाने जिल्हा समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता तथापि सी.आर.झेड प्राधिकरणाने महानगरपालिकेच्या प्रस्तावित जागेत घाट बांधण्यासाठी परवानगी न देता नविन जागा सुचविण्यात सांगितले होते. मेरा यह प्रशासनसे कहना है जो फंड उस समय के अंदर में महाराष्ट्र शासन के द्वारा मिल रहा था और उसके अंदर में कमिशनर साहब देड करोड रू. जो हमारा महानगरपालिका नही जा रहा था वो हमको आ रहा था आज वही घाट के अंदर में वही जेटी बांधणे के लिए ७४ लाख महानगरपालिका का खर्चा हो रहा है। क्या इसमे सी.आर.झेड बाधित नही हो रहा है क्यो? प्रशासन की दोहरी भुमिका क्या? जो फंड हमको मिल रहा था राज्य सरकार से आज महानगरपालिका का पैसा खर्च हो रहे है।

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो मेरीटाईम बोर्ड जे आहे ना मेरीटाईम हे समुद्र किना-याचीच कामे करत असते आणि त्यांना सी.आर.झेड मध्ये काही रिलॅक्ससेशन आहे त्यांना परवानगीची गरज भासत नाही.

**भगवती शर्मा :-**

साहब जब देड करोड हमको मिल रहा था जो भाषा आज आप बोल रहे हो की उनको वही चीज दी तो वोही पैसा आपने उस समय मेरीटाईम के माध्यम से क्यो नही खर्चा किया।

**दिपक खांबित :-**

हमें यह मालूम नही था उन्होने सामनेसे प्रस्ताव दिया की हम करने को रेडी है करके...........

**भगवती शर्मा :-**

सर यह बोलकर क्या होगा आज महानगरपालिका का पैसा खर्चा हो रहा है ना वो देड करोड भी आपका लेप्ट हो गया मतलब कितना नुकसान हो रहा है। एक प्रशासन के चुक से................

**दिपक खांबित :-**

गव्हरमेन्टसे जो १० करोड रु. आनेवाला था उससे दुसरे काम प्रस्थापित हो गये ना।

**भगवती शर्मा :-**

दुसरे काम आपने कितने भी प्रस्थापित किये हो आजतक उनको वो मंजुरी मिली नही है। ना मिलनी वाली है। लेकिन यह देड करोड तो अपना गया ना। उस समय आपको थोडीसी जानकारी होती की हम यह पैसा मेरीटाईम बोर्ड को अगर डायर्वट कर देंगे वो पैसे के अंदर में सी.आर.झेड नही लगेगा तो हमारा एक जेटी का भी वहापें निर्माण हो जाता। आज सब लोगो को उसका पैसा भी खर्च नही करना पडता। तो प्रशासन से कही ना कही चुक हुई है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम विषय अतिशय गंभीर आहे. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाला महानगरपालिकेने पत्र दिले आहे का?

**दिपक खांबित :-**

नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नाही ना, साहेब बघा की महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने मिरा भाईदर महानगरपालिकेला पत्र दिले नाही. की, तुम्ही ही जेटी बांधण्याकरिता आमच्याकडे फंड द्या. अस कळवल नाही परंतु गोषवा-यामध्ये तुम्ही अस म्हणतात की सदर मागणीच्या अनुषंगाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या मार्फत खालील अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे म्हणजे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने आपल्याकडे कळवत नाही आणि तुम्ही अंदाजपत्रक तयार केले आहे आणि ते पण अंदाजपत्रक चुकीचे तयार केले आहे. इथे एक करोड सत्तावन्न लाख रू. आहेत

आणि भाईदर पश्चिमेला बहात्तर लाख रू. आहे आणि मेरीटाईम बोर्डाचे जे अंदाजपत्रक आहेत त्याच्यामध्ये भाईदर इस्टला एक करोड त्रेचाळीस लाखाचे अंदाजपत्रक आहेत आणि भाईदर पश्चिमेला ६६ लाख २९ हजार इस्टीमेंट आहे. मग २० लाख रू. चे आपल्या मिरा भाईदर महानगरपालिका अंदाजपत्रक जास्त बनवते मग हे वीस लाख रु. चा घोटाळा नाही का ?

**दिपक खांबित :-**

अंदाजपत्रेची जी किंमत दिलेली आहे ती मेरीटाईम बोर्डाने आपल्याला जे कळवले आहे तेच आम्ही गोषवा-यामध्ये म्हटलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही पहिले काय बोलले की महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने आपल्याला कळविलेले नाही आहे.

**दिपक खांबित :-**

नाही, आपण त्यांना कळविले नाही की हे काम आम्हाला करून द्या म्हणून कारण सांगतो याचे की, मा. आमदार प्रताप सरनाईक साहेबाबरोबर आमची त्याबाबत नवघर आणि कनकिया जेटी बांधणेबाबत दोनदा बैठक झाली व्हिजीट झाली त्यावेळी सरनाईक साहेबांनी त्यांना सजेस्ट केले की इकडे २-३ जेटी बांधायला पाहिजे. त्यावेळी त्यांनी आमच्या समोर पाहणी केली आणि त्यांनी समोरून इस्टीमेट आम्हाला दिले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच्याकडे पत्र आहे का ?

**दिपक खांबित :-**

पत्र नाही. ह्या बाबतीत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग तुम्ही इस्टीमेट कस केले एक करोड सत्तावन्न लाखाच

**दिपक खांबित :-**

इस्टीमेट आम्ही केलेलेच नाही इस्टीमेट मेरीटाईम बोर्डाने करून आपल्याला कळवल आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग पत्राने कळविले का फोनने.

**दिपक खांबित :-**

पत्राने

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग तेच तुम्हाला विचारतोय तुम्हाला पत्र दिले का मेरीटाईम बोर्डाने...............

**दिपक खांबित :-**

दिले आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब दाखवा कॉपी तोपर्यत मॅडम मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने जिल्हाधिका-याला पत्र दिले आहे की आपली जी जिल्हा नियोजन समिती आहे जिल्हा नियोजनचा जो फंड आहे त्या फंडातून तुम्ही आम्हाला रक्कम द्या आणि जिल्हाधिकारी नियोजन कमिटी मार्फत तो फंड मंजूर केलेला आहे त्याचे पत्र मी तुम्हाला वाचून दाखवतो. साहेब, माझ्याकडे वॉटसअप वर पत्र आहे आणि जर कलेक्टर त्यांना फंड देत आहेत मग आपल्या महानगरपालिकेला डबल फंड द्यायची गरज काय? आणि २० लाख रू. कमी जास्त काय गरज आहे. मग हा २० लाख रू. कोणाच्या खिशामध्ये आहे.

**दिपक खांबित :-**

सर ३० जुलै २०१५ ला त्यांनी पत्र दिले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सर हे २४ सप्टेबर २०१५ चे पत्र आहे. की जिल्हाधिका-याला दिले आहे. मेरीटाईम बोर्डाने की सदरहू अंदाजपत्रक भाईदर पूर्व येथील रेल्वे ब्रीज जवळील जेटीची मजबूतीकरण व रूंदीकरण करणे तालुका जिल्हा-ठाणे एक करोड त्रेचाळीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे अठ्ठावन्न. भाईदर पश्चिम येथील रेल्वे ब्रीज जवळील जेटी बांधणे त्याठिकाणी या लोकांनी सहासष्ठ लाख एकोनतीस हजार आणि आपण इस्टीमेट करतोय बहात्तर लाख एकोनपन्नास हजार आणि एक करोड सत्तावन्न लाख.

**दिपक खांबित :-**

आपण इस्टीमेट केलेलेच नाही हे ते १४ आणि १५ चे आहे त्यामूळे त्यांच्याकडून फरक झाला असणार आणि हे जे पत्र आहे ते ३० जुलै २०१५ चे आहे. भाईदर पश्चिमचे आहे आणि दुसरे पत्र.............

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब हे सप्टेबर २०१५ चे आहे. साहेब ऑलरेडी जिल्हानियोजन समितीने हे काम मंजूर केलेले आहे. आणि फंड सुध्दा सॅक्शंन केले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम तो विषय आपण पेन्डीग ठेवावा.

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे काही पत्रव्यव्हारच नाही. जिल्हा नियोजन समितीमध्ये असे कुठलेही काम पास झाले तर आपल्याकडे कुठल्याही प्रकारचे पत्रव्यव्हार महानगरपालिकेकडे नाही.

**मा. महापौर :-**

हा विषय परत सादर करणार त्याची चौकशी करून आणि त्यानंतर ते परत सादर करण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुमच्याकडे नक्की ते पत्र आहे का? एक करोड सत्तावन्न लाखचे इस्टीमेट आहे का?

**दिपक खांबित :-**

साहेब आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ताबडतोब त्या मेरीटाईम बोर्डाला पत्र लिहा की तुम्ही २४ सप्टेबर २०१५ ला जे इस्टीमेट केले अंदाजपत्रक सादर केले जिल्हाधिकारीला ते कमी केलेले आहे आणि आम्हाला जास्त का दिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

नाही नाही आपण फक्त महासभेत धोरणात्मक निर्णय घेतो याबाबत आम्ही त्यांच्याकडून जे डिटेल इस्टीमेंट आहे त्याची तपासणी करणार आहोत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब आपण पूर्ण माहिती घ्या. नंतर फेर प्रस्ताव परत सादर करा. मा. महापौर मॅडम सभागृहास आमची विनंती आहे की, विषय क्र. १०० ते १०५ हे प्रलंबित ठेवण्यात यावे. सभागृहात विषय पूर्ण होणार नाही. २-३ महत्वाचे विषय आहेत म्हणून १०६ पासून सुरू करण्यात यावे.

**भगवती शर्मा :-**

कारण काय आहे. होऊ द्या अजून वेळ आहे.

(सदरचा विषय मा. महापौरांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. १००, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते क्रॉंक्रीटीकरण करणे कामांच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे व आर्थिक तरतुदीनुसार निविदा मागविणेस मान्यता देणे.

**नरेंद्र मेहताः-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यावर पाणीपुरवठा विभागाच्या जलवाहिनी, रिलायन्स इन्फ्रा, टाटा पॉवर ह्या कंपनीच्या विद्युत पुरवठा करणा-या केबल्स, एम.टी.एन.एल. व विविध भ्रमणध्वनी कंपनीच्या केबल्स तसेच महानगर गॅस लि. यांची गॅस पुरवठा करण्यासाठी अंथरण्यात आलेल्या आहेत. तसेच पाणी पुरवठा विभागामार्फत मलवाहिनी अंथरण्याचे काम मुख्य रस्त्यावर पुर्ण झाले असून मालमत्ता मलवाहिनी जोडण्याचे काम देखील पूर्ण झालेले आहे.

त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्याचे क्रॉक्रिटीकरणाचे काम करणे आवश्यक आहे. जेणेकरुन टिकाऊ रस्ते तयार घेऊन देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी होऊ शकते. मिरा-भाईंदर शहरातील रस्ते बांधणेसााठी ९९.८६ कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदर प्रस्तावास नमुद केलेले रस्ते कॉक्रीटचे तयार करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेअंतर्गत काम घेण्यासाठी मा. महासभा दि.३०/०३/२०१५ ठराव क्र.९२ (दि.२३/०३/२०१५ रोजीची तहकूब सभा) मान्यता दिलेली आहे. मिरा-भाईंदर शहरातील खालील रस्त्यांची कॉक्रीटीकरण करण्याची आवश्यकता आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) येथील एस.के. स्टोन ते मिरारोड स्टेशन पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१८,४१,२४,२००/- |
| २ | मिरा-भाईंदर क्षेत्रातील काशिमीरा हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ आणि सनराईज ते नाईट मिटींग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,३९,६२,७५०/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) येथील गोल्डन नेस्ट रोडवरील गोल्डन नेस्ट पोलिस चौकी ते हनुमान मंदिरा पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,४५,२२,८५०/- |
| ४ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथील ओस्तवाल ऑरनेट ते ओस्तवाल ऑनेक्स पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९८,६५,४००/- |
| ५ | भाईंदर (प) येथील वालचंद्र प्लाझा ते अरिहंत दर्शन (९० फुटी रोड) पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,७८,२०,०५०/- |
| ६ | भाईंदर (प) येथील बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.७,८७,२४,६००/- |
| ७ | भाईंदर (प.) जर्नादन रकवी मार्ग कॉक्रीटी करण करणे | रु.५,१४,५१,८००/- |
| ८ | भाईंदर (प.) उड्डाणपुल समांतर रस्ता आय.डी.बी.आय बँक ते मॅक्सेस पोलीस चौकी व पुढे टेंबा हॉस्पीटल पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.५,७९,४९,१५०/- |

| | | |
|---|---|---|
| ९ | मिरारोड (पूर्व) सिल्व्हरपार्क रस्ता सृष्टी पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.१८,४१,२४,२००/- |
| १० | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सर्कल ते कुणाल शॉपिंग सेंटर (नयानगर पोलिस चौकी) व पुढे नरेंद्र पार्क ते हैदरीचौक पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.८,५२,३८,६००/- |
| ११ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते उड्डाणपुला पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.८,७५,३९,४५०/- |
| १२ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल ते सेव्हन ईलेव्हन हॉस्पीटल रस्ता पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९६,५५,५००/- |
| १३ | घोडबंदर रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.४२,९२,०९,४००/- |
| १४ | मिरारोड (पूर्व) उमाकांत मिश्रा चौक ते सृष्टी जुना ब्रिज पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,५२,९२,३००/- |
| १५ | मिरारोड (पूर्व) साईबाबा नगर ते शितल नगर पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१४,८२,५९,५००/- |
| १६ | मिरारोड स्टेशन शांतीशॉपिंग सेंटर ते भक्ती वेंन्दांत पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.२६,३२,८२,१००/- |
| १७ | हटकेश उदयोग नगर मधील सालासर इमारत ते शांती विद्यानगरी पर्यता रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,१८,८९,३५०/- |
| १८ | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१९,८३,१६,०००/- |
| | **एकूण** | **रु.२१६,१२,२७,२००/-** |

वरील कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील प्रमाणे प्रस्ताव पहाता सदर प्रकल्पासाठी ३३% शासन अनुदान ३४% शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून कर्ज व ३४% महानगरपालिका निधीतून खर्च केल्यास प्रकल्प पूर्ण होऊ शकेल. शासन अनुदान (३३%) रु.७१,३२,०४,९७६/- शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून कर्ज (३४%) रु.७३,४८,१७,२४८/- महानगरपालिका निधी (३३%) रु.७१,३२,०४,९७६/-

प्रथम टप्प्या अंतर्गत रु.९८,०६,१५,३५०/- रक्कमेचा प्रस्ताव शासनाचे अनुदान व कर्ज मिळण्यासाठी शासनाकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावाबाबत शासनाकडे चर्चा केली असता प्रस्ताव मान्य होण्यास वेळ लागू शकेल. सद्यस्थितीत महानगरपालिकेने सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात कॉंक्रीट रस्त्यांसाठी रु.३३.०० कोटी एवढी तरतुद केली आहे. सदर तरतुदीतून खालील कामे हाती घेता येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर क्षेत्रातील काशिमीरा हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ आणि सनराईज ते नाईट मिटींग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,३९,६२,७५०/- |
| २ | भाईंदर (पूर्व) येथील गोल्डन नेस्ट रोडवरील गोल्डन नेस्ट पोलिस चौकी ते हनुमान मंदिरा पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,४५,२२,८५०/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथील ओस्तवाल ऑरनेट ते ओस्तवाल ऑनेक्स पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९८,६५,४००/- |
| ४ | भाईंदर (प) येथील वालचंद्र प्लाझा ते अरिहंत दर्शन (९० फुटी रोड) पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,७८,२०,०५०/- |
| ५ | भाईंदर (प) येथील बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.७,८७,२४,६००/- |
| ६ | मिरारोड (पूर्व) उमाकांत मिश्रा चौक ते सृष्टी जुना ब्रिज पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,५२,९२,३००/- |
| | **एकूण** | **रु.३३,०१,८७,९५०/-** |

तरी प्रथम टप्प्यात रु.३३,०१,८७,९५०/- रक्कमेच्या कामांच्या निविदा मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम इन्होंने सिमेंट के रस्ते के लिए मंजुरी दी है। ऐसा प्रस्ताव पहले भी आया था। भाईदर पुलीस चौकी से लेकर मॅक्सेस मॉल तक वो भी विशेष निधी थी। चार करोड की बजेट का काम था उस काम के अंदर भी सन्मा. सदस्य को याद दिलाता हूँ। की उन्होने उसके अंदर में जो किया था उसमे यह लिखा था की सदरच्या ठिकाणी रस्त्यावरील भुयारी गटार योजना अंतर्गत भाईदर पोलिस स्टेशन नगरपर्यत

पाईपलाईनचे काम बाकी आहे प्रथम त्वरीत सुरू करणे. सदर काम यह अच्छे विषय है। की वहाँपे सिमेंट का रस्ता लिया जा रहा है। लेकीन वो ही चिज में आपको याद दिलाना चाहता हूँ की आप उसको करिए की निविदा निकालने के पेहले जैसे अभी आपणे ६० फुट रोड का बोला, मुझे इस्ट का तो मालुम नही है ६० फूट के अंदर कमलापार्क के रूची टॉवर तक पाईपलाईन का काम भुयारी गटर का काम पुरा हुआ है। लेकीन कनेक्टिव्हिटी अभी उनका भी नही हुआ है ६० फुट वहॉसे लेकर शांती नगर तक जाता है आगे का काम मेन रोड का कही भी पुरा ना तो भुयारी गटार का हुआ है। न गॅस पाईपलाईन का हुआ है मेरा यह कहना है की पेहले वो काम करने के बाद उसके बाद निविदा प्रक्रिया नही तो क्या होगा निविदा प्रक्रिया आप अभी शुरू कर देंगे उसके बाद में वो काम होगा लेट होगा फिर कॉन्ट्रयाक्टर रेट जादा मांगेंगे इसलिए वो प्रक्रिया जल्द से जल्द और ऐसा ही ९० फुट के अंदर में वहॉ पे सब काम हो गया है लेकीन अभी वहॉपे कनेक्टिव्हिटी भुयारी गटर की बाकी है। टेस्टींग बाकी है क्योंकी कनेक्टिव्हिटी होने के बाद उसकह टेस्टींग भी होनी जरूरी है यह सब काम पूर्ण करने के बाद में ही निविदा प्रक्रिया सुरू की जाए।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम जे काम सुचविलेले आहे ते सगळयाचे करुनच रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम माझी सुचना अशी आहें प्रशासनाने गोषवा-यात नमूद केलेले काही रस्त्याना महानगर गॅस लिमिटेडचे पाईपलाईन टाकायचे काम अजुनही पूर्ण झाले नसल्याने तसेच भुयारी गटार योजनेचे ही काम अर्धवट आहे व काही ठिकाणी सदरचे काम अजुन सुरुच झाले नाही त्यामुळे रस्त्याचे कॉक्रीटीकरण सध्यातरी शक्य होणार नाही असे वाटते त्याकरिता प्रशासनाने सर्व रस्त्याची पाहणी करून व महानगर गॅस तसेच भुयारी गटार योजना कार्यवाही करणारी कंपनी तसेच पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून काम कधी पूर्ण होईल याचा अहवाल मागवावा व त्यानंतर निविदा प्रक्रिया करावी अशी मी सुचना मांडत आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

निविदा मागवून घ्यावी आणि जे काम सांगितले होते ते रस्त्याचे होण्यापूर्वी आपण करावी अशी आमची सुचना आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मला एक सांगा आता जर निविदा मागविली आणि जर ते काम एक वर्ष दोन वर्षे पूर्ण झालच नाही मग साहेब परत ते एक्स्टेन्शंन क्लॉज लागणार.

**नरेंद्र मेहता :-**

नाही लागणार एम.जी.पी. गॅस संदर्भात त्यांच्याबरोबर मिटींग झाली एस.पी एम.एल.ची मिटींग झाली एस.पी.एम.एल. लाही सगळ काम वेळेत पूर्ण करून म्हणजू या शहरातली सर्व काम १०० टक्के कम्पलीट नाही मार्च ते मॅक्झीमम एप्रिल पर्यत करून घ्यायचीय आपल्याला १०० टक्के काम प्लाट पासून सगळ चालु करायचे आहे खाली भाईदर पूर्व आणि पश्चिम बाकी राहणार आहे. ज्यामध्ये प्रक्रिया आपल्याला घ्यावी लागेल तो विषय सर्वासमोर येणार आहे या संदर्भात बैठक झाली आहे तरी आपल्याला शब्द दिला आहे की पूर्ण भाईदर पश्चिम मध्ये डिसेंबरच्या अगोदर सगळीकडे.....................

**भगवती शर्मा :-**

लेखी द्या ना तुम्ही.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी आपल्यालाच परवानगी मागितली आपण त्यांना परवानगी दिली नव्हती पावसात आम्ही तुम्हाला खोदू देणार नाही अणि आत्ता आपण परवानगी सुरू केलेली आहे निविदेला साधारणतः एक दिड महिना लागेल तिथपर्यत ही कामे होऊन जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मेहता साहेब खंडेलवालजीच्या वॉर्डमध्ये स्वताः आम्ही गॅस पुरवठ्याची लाईन आम्ही सहा महिने हो गये देढ सो फुट रोड पे छ महिने हो गये गॅस सुरू हो गया लेंकीन वा लाईन अभी ९० फिट रोड पे पोहची नही है। ९० फिट रोड तक पोहची नही है तो ६० फिट रोड तक कब पोहचेगी

**नरेंद्र मेहता :-**

शेवटी आम्ही हे सांगितले आहे की आम्ही काय पाच वर्ष पंचवीस वर्ष तुम्ही या आणि रस्ता खोदा अस आता चालणार नाही काहीतरी डेडलाईन द्या आणि भाईदर वेस्टची ज्या ठिकाणी शक्य आहे ज्या ठिकाणी १०० टक्के काम डिसेंबरपर्यत करणार आहे आणि आपण जे बोलतात ते ९० फिट ६०फिट ते फक्त मात्र यासाठी राहिलेले होते की त्यांना आपल्याकडे वारंवार आम्हाला लोकांनी विनंती केली पण प्रशासन आपल्यामार्फत पावसाच्या काळात आपण परवानगी देत नाही म्हणून थांबलो पण आता परवानगी दिली की ते काम.................

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते क्रॉंक्रीटीकरण करणे कामांच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे व आर्थिक तरतुदीनुसार निविदा मागविणेस मान्यता देणे.

**ठराव क्र ७० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यावर पाणीपुरवठा विभागाच्या जलवाहिनी, रिलायन्स इन्फ्रा, टाटा पॉवर ह्या कंपनीच्या विद्युत पुरवठा करणाऱ्या केबल्स, एम.टी.एन.एल. व विविध भ्रमणध्वनी कंपनीच्या केबल्स तसेच महानगर गॅस लि. यांची गॅस पुरवठा करण्यासाठी अंथरण्यात आलेल्या आहेत. तसेच पाणी पुरवठा विभागामार्फत मलवाहिनी अंथरण्याचे काम मुख्य रस्त्यावर पुर्ण झाले असून मालमत्ता मलवाहिनी जोडण्याचे काम देखील पूर्ण झालेले आहे.

त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्याचे क्रॉंक्रिटीकरणाचे काम करणे आवश्यक आहे. जेणेकरुन टिकाऊ रस्ते तयार घेऊन देखभाल दुरुस्तीचा खर्च कमी होऊ शकते. मिरा-भाईंदर शहरातील रस्ते बांधणेसााठी ९९.८६ कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून सदर प्रस्तावास नमुद केलेले रस्ते कॉक्रीटचे तयार करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेअंतर्गत काम घेण्यासाठी मा. महासभा दि.३०/०३/२०१५ ठराव क्र.९२ (दि.२३/०३/२०१५ रोजीची तहकूब सभा) मान्यता दिलेली आहे. मिरा-भाईंदर शहरातील खालील रस्त्यांची कॉक्रीटीकरण करण्याची आवश्यकता आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) येथील एस.के. स्टोन ते मिरारोड स्टेशन पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१८,४१,२४,२००/- |
| २ | मिरा-भाईंदर क्षेत्रातील काशिमीरा हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ आणि सनराईज ते नाईट मिटींग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,३९,६२,७५०/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) येथील गोल्डन नेस्ट रोडवरील गोल्डन नेस्ट पोलिस चौकी ते हनुमान मंदिरा पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,४५,२२,८५०/- |
| ४ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथील ओस्तवाल ऑरनेट ते ओस्तवाल ऑनेक्स पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९८,६५,४००/- |
| ५ | भाईंदर (प) येथील वालचंद्र प्लाझा ते अरिहंत दर्शन (९० फुटी रोड) पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,७८,२०,०५०/- |
| ६ | भाईंदर (प) येथील बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.७,८७,२४,६००/- |
| ७ | भाईंदर (प.) जर्नादन रकवी मार्ग कॉक्रीटी करण करणे | रु.५,१४,५१,८००/- |
| ८ | भाईंदर (प.) उड्डाणपुल समांतर रस्ता आय.डी.बी.आय बँक ते मॅक्सेस पोलीस चौकी व पुढे टेंबा हॉस्पीटल पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.५,७९,४९,१५०/- |
| ९ | मिरारोड (पूर्व) सिल्व्हरपार्क रस्ता सृष्टी पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.१८,४१,२४,२००/- |
| १० | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सर्कल ते कुणाल शॉपिंग सेंटर (नयानगर पोलिस चौकी) व पुढे नरेंद्र पार्क ते हैदरीचौक पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.८,५२,३८,६००/- |
| ११ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते उड्डाणपुला पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.८,७५,३९,४५०/- |
| १२ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल ते सेव्हन ईलेव्हन हॉस्पीटल रस्ता पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९६,५५,५००/- |
| १३ | घोडबंदर रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.४२,९२,०९,४००/- |
| १४ | मिरारोड (पूर्व) उमाकांत मिश्रा चौक ते सृष्टी जुना ब्रिज पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,५२,९२,३००/- |
| १५ | मिरारोड (पूर्व) साईबाबा नगर ते शितल नगर पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१४,८२,५९,५००/- |
| १६ | मिरारोड स्टेशन शांतीशॉपिंग सेंटर ते भक्ती वेंन्दांत पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.२६,३२,८२,१००/- |
| १७ | हटकेश उदयोग नगर मधील सालासर इमारत ते शांती विद्यानगरी पर्यता रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,१८,८९,३५०/- |
| १८ | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१९,८३,१६,०००/- |
| | **एकूण** | **रु.२१६,१२,२७,२००/-** |

वरील कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील प्रमाणे प्रस्ताव पहाता सदर प्रकल्पासाठी ३३% शासन अनुदान ३४% शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून कर्ज व ३४% महानगरपालिका निधीतून खर्च केल्यास प्रकल्प पूर्ण होऊ शकेल. शासन अनुदान (३३%) रु.७१,३२,०४,९७६/- शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून कर्ज (३४%) रु.७३,४८,१७,२४८/- महानगरपालिका निधी (३३%) रु.७१,३२,०४,९७६/-

प्रथम टप्प्या अंतर्गत रु.९८,०६,१५,३५०/- रक्कमेचा प्रस्ताव शासनाचे अनुदान व कर्ज मिळण्यासाठी शासनाकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावाबाबत शासनाकडे चर्चा केली असता प्रस्ताव मान्य होण्यास वेळ लागू शकेल. सद्यस्थितीत महानगरपालिकेने सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात कॉंक्रीट रस्त्यांसाठी रु.३३.०० कोटी एवढी तरतुद केली आहे. सदर तरतुदीतून खालील कामे हाती घेता येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर क्षेत्रातील काशिमीरा हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ आणि सनराईज ते नाईट मिटींग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,३९,६२,७५०/- |
| २ | भाईंदर (पूर्व) येथील गोल्डन नेस्ट रोडवरील गोल्डन नेस्ट पोलिस चौकी ते हनुमान मंदिरा पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,४५,२२,८५०/- |
| ३ | भाईदर (पूर्व) जैसल पार्क येथील ओस्तवाल ऑरनेट ते ओस्तवाल ऑनेक्स पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९८,६५,४००/- |
| ४ | भाईदर (प) येथील वालचंद्र प्लाझा ते अरिहंत दर्शन (९० फुटी रोड) पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,७८,२०,०५०/- |
| ५ | भाईदर (प) येथील बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.७,८७,२४,६००/- |
| ६ | मिरारोड (पूर्व) उमाकांत मिश्रा चौक ते सृष्टी जुना ब्रिज पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,५२,९२,३००/- |
| | **एकूण** | **रु.३३,०१,८७,९५०/-** |

तरी प्रथम टप्प्यात रु.३३,०१,८७,९५०/- रक्कमेच्या कामांच्या निविदा मागविणेस ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक डॉ. आसिफ शेख ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

प्रशासनाने गोषवाऱ्यात नमुद केलेले काही रस्त्यांवर महानगर गॅस लि. चे पाईप लाईन टाकायचे काम अजून पूर्ण झाले नसल्याने तसेच भुयारी गटार योजनेचे कामही अर्धवट आहे व काही ठिकाणी सदरचे काम अजूनही सुरुच झाले नसल्यामुळे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण सध्यातरी शक्य होणार नाही असे वाटते त्याकरीता प्रशासनाने सर्व रस्त्यांची पाहणी करुन व महानगर गॅस तसेच भुयारी गटार योजना कार्यन्वयीत करणारी कंपनी तसेच पाणीपुरवठा विभागाकडून काम कधी पूर्ण होईल याचा अहवाल मागवावा व त्यानंतरच निविदा प्रक्रिया करावी अशी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०१, विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**नरेंद्र मेहताः-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत विविध परिसरात तसेच झोपडपट्टी विभागात शौचालये बांधण्यात आलेली आहेत. सदर शौचालयाचा उपयोग परिसरातील रहिवासी करत असून त्याची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिका मार्फत करण्यात येते. सदर कामी ठेकेदार नियुक्त केलेला आहे. त्यांच्याकडून सदर शौचालयाची नियमीत देखभाल करणेची कामे केली जातात. सदर कामे करणेसाठी संबंधित ठेकेदारांनी त्यांचे कर्मचारी देखील नियुक्त केलेले आहेत. त्यांच्याकडून सदर शौचालयातील मैला व इतर साफसफाईचा पाण्याचा वापर करून साफ करण्यात येतात. तथापी, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार सदरचा मैल हाताने पाणी टाकून साफ न करता प्रेशर पंप लावून साफ करण्यात यावा. जेणेकरून सदर ठिकाणी साफसफाई करण्याचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मनावर विपरीत परिणाम न होता रोगराई देखील पसरणार नाही याची देखील खबरदारी घेण्यात यावी.तसेच शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या ''स्वच्छ भारत अभियान'' अंतर्गत देखील सदर कामी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास कळविणे बंधनकारक आहे.

तरी, वरील सर्व बाबींचा विचार करता सदर कामी प्रत्यक्ष जागेवर पहाणी करून खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे त्यानूसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात निर्मल एम.एम.आर. अंतर्गत विविध ठिकाणच्या वस्ती स्वच्छतागृहांमध्ये प्रेशर पंप बसविणे व इतर आवश्यक कामे करणे कामी रु.८६,३६,८८६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी "शौचालय / मुताऱ्या / मोबाईल टॉयलेट" या लेखाशिर्षाखाली रु.८९,२०,२९१/- एवढी तरतूद उपलब्ध आहे.

वरील कामाच्या अंदाजपत्रकाला प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र १०१ :-**

विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ७१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत विविध परिसरात तसेच झोपडपट्टी विभागात शौचालये बांधण्यात आलेली आहेत. सदर शौचालयाचा उपयोग परिसरातील रहिवासी करत असून त्याची देखभाल व दुरुस्ती महानगरपालिका मार्फत करण्यात येते. सदर कामी ठेकेदार नियुक्त केलेला आहे. त्यांच्याकडून सदर शौचालयाची नियमीत देखभाल करणेची कामे केली जातात. सदर कामे करणेसाठी संबंधित ठेकेदारांनी त्यांचे कर्मचारी देखील नियुक्त केलेले आहेत. त्यांच्याकडून सदर शौचालयातील मैला व इतर साफसफाईचा पाण्याचा वापर करून साफ करण्यात येतात. तथापी, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार सदरचा मैल हाताने पाणी टाकून साफ न करता प्रेशर पंप लावून साफ करण्यात यावा. जेणेकरून सदर ठिकाणी साफसफाई करण्याचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मनावर विपरीत परिणाम न होता रोगराई देखील पसरणार नाही याची देखील खबरदारी घेण्यात यावी.तसेच शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत देखील सदर कामी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास कळविणे बंधनकारक आहे.

तरी, वरील सर्व बाबींचा विचार करता सदर कामी प्रत्यक्ष जागेवर पहाणी करून खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे त्यानूसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात निर्मल एम.एम.आर. अंतर्गत विविध ठिकाणच्या वस्ती स्वच्छतागृहांमध्ये प्रेशर पंप बसविणे व इतर आवश्यक कामे करणे कामी रु.८६,३६,८८६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी "शौचालय / मुताऱ्या / मोबाईल टॉयलेट" या लेखाशिर्षाखाली रु.८९,२०,२९१/- एवढी तरतूद उपलब्ध आहे.

वरील कामाच्या अंदाजपत्रकाला प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०२, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहरातील उघड्यावर शौच करण्याची प्रथा बंद करण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रात योजना राबविणेबाबत.

**सॅन्ड्रा रॉड्रीक्स :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो भाईदर महानगरपालिका प्रभाग क्र. १ येथील गणेश देवल नगर, बजरंग नगर, जय अंबे झोपडपट्टी या ठिकाणी लोकवस्ती मोठया प्रमाणामध्ये असून नागरिक उघडयावर शौचास बसत असल्याने सदर ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधावयाची गरज आहे वाढती लोकसंख्या लक्षात घेता सार्वजनिक बांधकाम विभागाने पुन्हा तपासून घ्यावी, मी गणेश देवलनगर झोपडपट्टीमध्ये तीन बजरंगनगर येथे दोन जय अंबे नगर येथे एक शौचालय बांधण्यात यावी अशी मी सुचनाकरत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) डिसेंबर २०१४ च्या धर्तीवर महाराष्ट्र शासन निर्णय नगर विकास क्रमांक स्वभअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि.३४ दिनांक १५ मे २०१५ व २८ जुलै २०१५ अन्वये शहरामध्ये नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासन निर्णय पारित करणेत आला आहे. ०२ ऑक्टोंबर २०१९ पर्यत शहरे १००% हागणदारी मुक्त करावयाची आहे. त्या अनुषंगाने शासनाने कालबध्द कार्यक्रम राबविणे बाबत उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. कृपया सदर शासन निर्णयाचे अवलोकन करणेस विनंती आहे.

खालील प्रमाणे योजनेचे स्वरूप आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैयक्तीक | केंद्र शासन अनुदान रु.४०००/- प्रती | राज्य | १४ वा वित्त | उर्वरित निधी अंदाजित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | शौचालय | लाभार्थी | शासन अनुदान रु.८०००/- प्रती लाभार्थी | आयोग अनुदान रु.५०००/- प्रती सिट्स | आर.सी.सी.स्लॅबसाठी रु.४६,४००/- व ए.सी. शिट्सचे छप्परसाठी रु.४१,६५०/- सदर निधी मा. खासदार निधी, मनपा कडील अनुदान तसेच खाजगी स्वच्छ भारत कोष, सामाजिक जबाबदारी (CSR) या माध्यमातूनही सदर निधी उपलब्ध करता येईल असे वरील शासन निर्णयामध्ये नमुद केले आहे. |
| २ | गट शौचालय ज्या लाभार्थ्यांना वैयक्तीक घरगुती शौचालयासाठी जागा उपलब्ध नसेल तर, निवड लक्षात घेता अशा अर्जदारा करीता "गट शौचालय" उपलब्ध करून देऊन त्यामध्ये सेप्टीक टॅकचा खर्च सर्व लाभार्थी कुटुंबियानी करावा. | | गट शौचालयातील लाभार्थ्यांना अनुज्ञेय असलेले अनुदान वैयक्तीक शौचालयाप्रमाणे वितरीत करावयाचे आहे. | | |
| ३ | सामुदायीक शौचालय | | | | |
| | वैयक्तीक गट शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटुंबाकरीता सामुदायीक शौचालय उपलब्ध करून देणेत येईल. | | | | |
| | यामध्ये केंद्र शासन ४०% राज्य शासन १०% उपलब्ध करेल | | | | |
| | उर्वरीत निधी मनपाने स्वतःच्या फंडातून / संस्थाकडून / सामाजिक जबाबदारीच्या (CSR) माध्यमातून उभा करावयाचा आहे. | | | | |
| ४ | सार्वजनिक शौचालय | | | | |
| | शहरामधील रेल्वे स्थानक, बस स्थानक, बाजार, इ. ठिकाणी उपलब्ध जागेनूसार सार्वजनिक शौचालय मनपाने उभारावयाचे आहे. | | | सार्वजनिक -खाजगी भागीदारीतून 'ppp' बांधावयाचे आहे. | |

परिपत्रकामध्ये नमुद लाभार्थी जणगणना २०११ नूसार घ्यावयाचे सुचित केले आहे. त्याचप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे. त्यानूसार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत केलेल्या सर्वेक्षणानूसार वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्यांची कुटुंब संख्या अंदाजे ९५० इतकी आढळली आहेत. या योजनेद्वारे अ) वैयक्तीक शौचालय ब) सामुदायीक शौचालय व क) सार्वजनिक शौचालये बांधावयाची आहेत. वैयक्तिक शौचालयासाठी केंद्र शासन रु.४,०००/-, राज्य शासन रु.८,०००/- व १४ व्या वित्त आयोग मधून रु.५०००/- असे एकुण रु.१७,०००/- इतके प्रती वैयक्तीक शौचालयास अनुदान उपलब्ध करून देणार आहेत. सदर कामासाठी रु.६३,४००/- प्रती वैयक्तिक शौचालयाचा खर्च अपेक्षित आहे. मात्र, आर.सी.सी. स्लॅब ऐवजी एसी. शीटचे छप्पर अंदाजपत्रकात समाविष्ठ केल्यास सदर वैयक्तिक शौचालयास खर्च रु.५८,६५०/- इतका अपेक्षित आहे.

मनपा हद्दीतील ज्या नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय नाही त्या नागरिकांचा आर्थिक स्तर पाहता उर्वरित निधी अंदाजित आर.सी.सी. स्लॅबसाठी रु.४६,४००/- व ए.सी. शिट्सचे छप्परसाठी रु.४१,६५०/- असा लागणारा निधी त्यांचेकडून उपलब्ध होऊ शकेल असे वाटत नाही. तरी याबाबत शासन निर्णय नगर विकास क्रमांक स्वभअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि.३४ दिनांक १५ मे २०१५ अन्वये कमी पडणारा निधी स्थानिक नागरी संस्थेने मा. खासदार, मा. आमदार निधी खाजगी क्षेत्राचा सहभाग स्वच्छ भारत कोष सामाजिक जबाबदारी (CSR) या माध्यामातून उपलब्ध करून द्यावा असे आहे.

उपरोक्त शौचालयाचा प्रकल्प उभारणेसाठी डाटा बेस तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी मनपाचे स्वच्छता निरिक्षक सर्वेक्षण करीत असून बांधकाम खात्याकडून जागेची उपलब्धतेबाबत खातरजमा करणेत येत आहे. आपले शहर १००% हागणदारी मुक्त करावयाचे असल्याने उद्दीष्टपुर्तीसाठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यापैकी उत्कृष्ठ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड करावी. त्यास रोख पारोतोषिक सन्मानचिन्ह देऊन गौरव करावा असे मत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता निरिक्षक, अभियंते या कर्मचाऱ्यांचा समावेश असावा.

शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे वैयक्तिक शौचालयाचे अनुदान लाभार्थीच्या बॅक खात्यामध्ये आर.टी.जी.एस.द्वारे प्रदान करणेचे धोरण आहे. मात्र, १००% उद्दीष्टपुर्तीसाठी लाभार्थी शौचालय बांधतीलच याची १००% खात्री देता येणार नाही. मात्र सदर शौचालय बांधकाम करणेसाठी निविदा प्रक्रिया करून ठेकेदाराचे इम्पॅनल करणे सुलभ होईल. याबाबत स्थानिक परिस्थितीनूसार आवश्यक बदल करण्याची मुभा असेल असे नमुद केले आहे. तसेच केंद्र व राज्या शासन मार्फत मिळणाऱ्या निधी व्यतिरीक्त लागणारा निधी मनपा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधून करावा लागणार आहे. याबाबत सर्वेक्षणाचे काम सुरु असल्याने नेमका निधी कीती लागेल याबाबत सद्यस्थितीस निश्चित करता येत नाही. तरी सुध्दा सद्यस्थितीस ९५० लाभार्थ्यांसाठी प्रती लाभार्थी रु.१२,०००/- तसेच १४ वे वित्त आयोग अनुदान रु.५०००/- असे एकुण

रु.१७,०००/- व महानगरपालिकातील अनुदान म्हणून रु.५,०००/- प्रती युनिट (प्रती कुटुंब) दिल्यास उर्वरित रक्कम लाभार्थी यांनी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महानगरपालिकेत खालील ठिकाणी उघड्यावर शौचास बसत असल्याने सदर ठिकाणी शौचालये बांधावयाची आहेत.

| अ.क्र | ठिकाणाचे नाव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) मोर्वा बामणदेव नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २ | भाईंदर (प.) मोर्वा येथे शागीर्द डेकोरेटर्स यांच्या जून्या ऑफीस समोर शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ३ | भाईंदर (प.) मुर्धाखाडी येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ४ | भाईंदर (प.) मुर्धा येथे बस स्टॉपच्या मागे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ५ | भाईंदर (प.) मोतीनगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ६ | भाईंदर (प.) गणेश देवल नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.५०,००,०००/- |
| ७ | भाईंदर (प.) शिवनेरी नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ८ | भाईंदर (प.) जय अंबे नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.२५,००,०००/- |
| ९ | रा.म.क्र. ०८ जवळील डाचकुलपाडा आश्रम जवळ येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| १० | रा.म.क्र. ०८ जवळील डाचकुलपाडा तय्यब्बानगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ११ | रा.म.क्र. ०८ जवळील मिनाक्षी नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| १२ | रा.म.क्र. ०८ जवळील माशाचापाडा येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| १३ | रा.म.क्र. ०८ जवळील गगनगीरी नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| १४ | भाईंदर (प.) भोलानगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| १५ | भाईंदर (प.) भोलानगर “बी” येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| १६ | भाईंदर (प.) आंबेडकर नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.५०,००,०००/- |
| १७ | भाईंदर (प.) लालबहादूर शास्त्रीनगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.५०,००,०००/- |
| १८ | भाईंदर (प.) नेहरूनगर “अे” येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| १९ | भाईंदर (प.) नेहरूनगर “बी” येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| २० | भाईंदर (प.) उत्तन लालबहादूर नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २१ | भाईंदर (पुर्व) एस.एन. कॉलेजच्या समोरील नाल्याच्या शेवटी इंदिरा नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.२५,००,०००/- |
| २२ | भाईंदर (पुर्व) शिवशक्ती नगर संत निरकारी आश्रमाच्या डी.पी. रस्त्यालगत येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २३ | भाईंदर (पुर्व) शिवशक्ती नगर येथील जय अंबे चाळ येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.२५,००,०००/- |
| २४ | भाईंदर (पुर्व) आर.एन.पी. पार्क येथील बंगा संगा (नारायण नगर झोपडपट्टी) येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २५ | भाईंदर (पुर्व) पानटेकडी स्मशानभूमी येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २६ | रा.म.क्र. ०८ जवळील घोडबंदर मॉडर्न कंपनी झोपडपट्टी जवळ शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २७ | प्रभाग क्र.३१ बाळासाहेब ठाकरे मैदानाजवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| २८ | हटकेश १५ नं. बस स्टॉप जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| २९ | जी.सी.सी. क्लब नवीन बिल्डींग समोर हटकेश येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३० | एस.के. स्टोन समोरील पेट्रोल पंपच्या बाजूला सुंदर दर्शन जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३१ | हटकेश झंकार फॅक्ट्री च्या बाजूला शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३२ | सिल्वर पार्क सिग्नल जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३३ | सृष्टी पोलिस चौकीच्या बाजूला शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३४ | एम.आय.डी.सी. हायवे येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३५ | फाऊंटन हॉटेल समोर शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३६ | भाईंदर (पुर्व) नवघर स्मशानभूमी मागे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३७ | भाईंदर (पुर्व) इंदिरानगर येथे महिलासाठी शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३८ | भाईंदर (प.) जय बजरंग नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ३९ | भाईंदर (प.) आनंद नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ४० | भाईंदर (प.) क्रांती नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ४१ | मुर्धा ब्रम्हदेव नगरच्या शेवटी शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४२ | मुर्धा खाडी धनराज माच्छी यांच्या घराजवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४३ | मुर्धा बस स्टॉप मागे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४४ | मुर्धा शिवप्रसाद आगर येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४५ | भाईंदर (प.) नाझरेथ आागर झोपडपट्टी येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| | **एकुण** | **रु.११,६५,००,०००/-** |

वरील सर्व शौचालयाचा एकुण खर्च रु.११,६५,००,०००/- इतका खर्च येणार आहे.

सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासन खालील प्रमाणे अनुदान देणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| **केंद्र शासन अनुदान -** | **४०% -** | **रु.४,६६,००,०००/-** |
| **राज्य शासन अनुदान -** | **१०% -** | **रु.१,१६,५०,०००/-** |
| **१४ वा वित्त आयोग प्राप्त निधी मधून** | **प्रती सिट्स रु.२५,०००/- X ९३२ सिट्स** | **रु.२,३३,००,०००/-** |
| | **एकुण** | **रु.८,१५,५०,०००/-** |

उर्वरित रु.१,८४,५०,०००/- इतकी रक्कम आवश्यक असून "शहर स्वच्छता आराखडा" या लेखाशिर्षकामधून रक्कम रु.९०,००,०००/- व अन्य अखर्चित लेखाशिर्षामधून वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने शौचालये, दैनंदिन साफसफाई, निगा व देखभालीसाठी रु. २०,०००/- प्रति शौचालय प्रति महिना दराने खाजगी संस्थांना कामे दिली आहेत. सदर संस्था समाधानकारक काम करीत नसल्यास अशा संस्थांकडून कामे रद्द करुन इतर संस्थांना मंजूर दराने कामे देण्यात यावीत. सर्व शौचालयाचे विजबील, पाणीबील व दुरुस्ती महानगरपालिका निधीतून करावी यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद करावी.

तरी, वरील प्रमाणे येणाऱ्या खर्चास व अनुषंगीक सर्व कार्यवाही करणेस मा. महासभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच आवश्यक कार्यवाही व अंमलबजावणी करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत. वरील कामांच्या निविदा तातडीने मागविण्यात याव्यात. सदरकामी अनुदान व्यतिरिक्त खर्च महानगरपालिका निधीतून करावा.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जयमाला पाटील:-**

मॅडम मला याच्याविषयी बोलायचे आहे. जे आपण घरगूती शौचालय योजना सुरू केली आहे त्याबद्दल अभिनंदन करते पण राई,मुर्धा,मोरवा या भागामध्ये सेप्टी टॅन्क आहेत ते साफ करण्यासाठी काय व्यवस्था तुम्ही करणार आहात कारण सिव्हरेज लाईन आमच्या इथपर्यंत पोहोचली नाही. त्याची व्यवस्था करून नंतरच ती योजना राबवा.

**प्रभाकर म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो सेप्टी टॅन्क साफ करतो. आपण सेप्टी टॅन्कचे मशिन आहे आपल्याकडे अजुन एक नविन मशिन घ्यायचा प्रस्ताव केलेला आहे आपण.

**जयमाला पाटील :-**

कारण घरगुती शौचालय ऑलरेडी आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

आहेत ना अजुन एक मशिन घेतोय आपण सध्या एक आहे अजुन एक घेणार आहोत.

**जयमाला पाटील :-**

पण ती गल्लोगल्ली जाईल याची व्यवस्था करा.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम माझा एक विषय सामावेश करून घ्यायचा आहे. स्वच्छता अभियानाचे आणि शौचालयाचे मा. मोदी साहेबांचे अभिनंदन करते. परंतू माझी एक सुचना आहे. मा. आयुक्त महोदय, मिरा भाईदर शहरामध्ये ब-याच ठिकाणी शौचालय बांधण्यासाठी परमिशन दिली आहे. माझी आपणास एक विनंती आहे ज्या ठिकाणी गरज असेल तिथेच द्या. ज्याठिकाणी गरज नाही जिथे हायफाय एरिया आहे जिथे सोसायटया समोर आहे त्याठिकाणी देऊ नका ही माझी सुचना त्यात समावेश करून घ्यावी कारण माझ्या वॉर्डची तक्रार आहे ही तक्रार सोसायटीने दिली आहे. त्याठिकाणी होऊ नये अशी मी आपणास विनंती करते.

**प्रकरण क्र. १०२ :-**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहरातील उघड्यावर शौच करण्याची प्रथा बंद करण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रात योजना राबविणेबाबत.

**ठराव क्र. ७२ :-**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) डिसेंबर २०१४ च्या धर्तीवर महाराष्ट्र शासन निर्णय नगर विकास क्रमांक स्वभअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि.३४ दिनांक १५ मे २०१५ व २८ जुलै २०१५ अन्वये शहरामध्ये नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासन निर्णय पारित करणेत आला आहे. ०२ ऑक्टोंबर २०१९ पर्यत शहरे १००% हागणदारी मुक्त करावयाची आहे. त्या अनुषंगाने शासनाने कालबध्द कार्यक्रम राबविणे बाबत उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. कृपया सदर शासन निर्णयाचे अवलोकन करणेस विनंती आहे.

खालील प्रमाणे योजनेचे स्वरूप आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैयक्तीक शौचालय | केंद्र शासन अनुदान रु.४०००/- प्रती लाभार्थी | राज्य शासन अनुदान रु.८०००/- प्रती लाभार्थी | १४ वा वित्त आयोग अनुदान रु.५०००/- प्रती सिट्स | उर्वरित निधी अंदाजित आर.सी.सी.स्लॅबसाठी रु.४६,४००/- व ए.सी. शिट्सचे छप्परसाठी रु.४१,६५०/- सदर निधी मा. खासदार निधी, मनपा कडील अनुदान तसेच खाजगी स्वच्छ भारत कोष, सामाजिक जबाबदारी (CSR) या माध्यमातूनही सदर निधी उपलब्ध करता येईल असे वरील शासन निर्णयामध्ये नमुद केले आहे. |
| २ | गट शौचालय ज्या लाभार्थ्याना वैयक्तीक घरगूती शौचालयासाठी जागा उपलब्ध नसेल तर, निवड लक्षात घेता अशा अर्जदारा करीता ''गट शौचालय'' उपलब्ध करून देऊन त्यामध्ये सेप्टीक टॅकचा खर्च सर्व लाभार्थी कुटुंबियानी करावा. | | गट शौचालयातील लाभार्थ्याना अनुज्ञेय असलेले अनुदान वैयक्तीक शौचालयाप्रमाणे वितरीत करावयाचे आहे. | | |
| ३ | सामुदायीक शौचालय | | | | |
| | वैयक्तीक गट शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटुंबाकरीता सामुदायीक शौचालय उपलब्ध करून देणेत येईल. | | | | |
| | यामध्ये केंद्र शासन ४०% राज्य शासन १०% उपलब्ध करेल | | | | |
| | उर्वरीत निधी मनपाने स्वतःच्या फंडातून / संस्थाकडून / सामाजिक जबाबदारीच्या (CSR) माध्यमातून उभा करावयाचा आहे. | | | | |
| ४ | सार्वजनिक शौचालय | | | | |
| | शहरामधील रेल्वे स्थानक, बस स्थानक, बाजार, इ. | | सार्वजनिक -खाजगी भागीदारीतून 'ppp' बांधावयाचे | | |

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी उपलब्ध जागेनूसार सार्वजनिक शौचालय मनपाने उभारावयाचे आहे. | आहे. |

परिपत्रकामध्ये नमुद लाभार्थी जणगणना २०११ नूसार घ्यावयाचे सुचित केले आहे. त्याचप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे. त्यानूसार महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत केलेल्या सर्वेक्षणानूसार वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्यांची कुटुंब संख्या अंदाजे ९५० इतकी आढळली आहेत. या योजनेद्वारे अ) वैयक्तीक शौचालय ब) सामुदायीक शौचालय व क) सार्वजनिक शौचालये बांधावयाची आहेत. वैयक्तिक शौचालयासाठी केंद्र शासन रु.४,०००/-, राज्य शासन रु.८,०००/- व १४ व्या वित्त आयोग मधून रु.५०००/- असे एकुण रु.१७,०००/- इतके प्रती वैयक्तीक शौचालयास अनुदान उपलब्ध करून देणार आहेत. सदर कामासाठी रु.६३,४००/- प्रती वैयक्तिक शौचालयाचा खर्च अपेक्षित आहे. मात्र, आर.सी.सी. स्लॅब ऐवजी एसी. शीटचे छप्पर अंदाजपत्रकात समाविष्ठ केल्यास सदर वैयक्तिक शौचालयास खर्च रु.५८,६५०/- इतका अपेक्षित आहे.

मनपा हद्दीतील ज्या नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय नाही त्या नागरिकांचा आर्थिक स्तर पाहता उर्वरित निधी अंदाजित आर.सी.सी. स्लॅबसाठी रु.४६,४००/- व ए.सी. शिट्सचे छप्परसाठी रु.४१,६५०/- असा लागणारा निधी त्यांचेकडून उपलब्ध होऊ शकेल असे वाटत नाही. तरी याबाबत शासन निर्णय नगर विकास क्रमांक स्वभअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि.३४ दिनांक १५ मे २०१५ अन्वये कमी पडणारा निधी स्थानिक नागरी संस्थेने मा. खासदार, मा. आमदार निधी खाजगी क्षेत्राचा सहभाग स्वच्छ भारत कोष सामाजिक जबाबदारी (CSR) या माध्यामातून उपलब्ध करून द्यावा असे आहे.

उपरोक्त शौचालयाचा प्रकल्प उभारणेसाठी डाटा बेस तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी मनपाचे स्वच्छता निरिक्षक सर्वेक्षण करीत असून बांधकाम खात्याकडून जागेची उपलब्धतेबाबत खातरजमा करणेत येत आहे. आपले शहर १००% हागणदारी मुक्त करावयाचे असल्याने उद्दीष्टपुर्तीसाठी नियुक्त सर्व कर्मचाऱ्यापैकी उत्कृष्ठ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड करावी. त्यास रोख पारोतोषिक सन्मानचिन्ह देऊन गौरव करावा असे मत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता निरिक्षक, अभियंते या कर्मचाऱ्यांचा समावेश असावा.

शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे वैयक्तिक शौचालयाचे अनुदान लाभार्थींच्या बॅक खात्यामध्ये आर.टी.जी.एस.द्वारे प्रदान करणेचे धोरण आहे. मात्र, १००% उद्दीष्टपुर्तीसाठी लाभार्थी शौचालय बांधतीलच याची १००% खात्री देता येणार नाही. मात्र सदर शौचालय बांधकाम करणेसाठी निविदा प्रक्रिया करून ठेकेदाराचे इम्पॅनल करणे सुलभ होईल. याबाबत स्थानिक परिस्थितीनूसार आवश्यक बदल करण्याची मुभा असेल असे नमुद केले आहे. तसेच केंद्र व राज्या शासन मार्फत मिळणाऱ्या निधी व्यतिरीक्त लागणारा निधी मनपा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधून करावा लागणार आहे. याबाबत सर्वेक्षणाचे काम सुरु असल्याने नेमका निधी कीती लागेल याबाबत सद्यस्थितीस निश्चित करता येत नाही. तरी सुध्दा सद्यस्थितीस ९५० लाभार्थ्यासाठी प्रती लाभार्थी रु.१२,०००/- तसेच १४ वे वित्त आयोग अनुदान रु.५०००/- असे एकुण रु.१७,०००/- व महानगरपालिकातील अनुदान म्हणून रु.५,०००/- प्रती युनिट (प्रती कुटुंब) दिल्यास उर्वरित रक्कम लाभार्थी यांनी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महानगरपालिकेत खालील ठिकाणी उघड्यावर शौचास बसत असल्याने सदर ठिकाणी शौचालये बांधावयाची आहेत.

| अ.क्र | ठिकाणाचे नाव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) मोर्वा बामणदेव नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २ | भाईंदर (प.) मोर्वा येथे शागीर्द डेकोरेटर्स यांच्या जून्या ऑफीस समोर शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ३ | भाईंदर (प.) मुर्धाखाडी येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ४ | भाईंदर (प.) मुर्धा येथे बस स्टॉपच्या मागे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ५ | भाईंदर (प.) मोतीनगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ६ | भाईंदर (प.) गणेश देवल नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.५०,००,०००/- |
| ७ | भाईंदर (प.) शिवनेरी नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ८ | भाईंदर (प.) जय अंबे नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.२५,००,०००/- |
| ९ | रा.म.क्र. ०८ जवळील डाचकुलपाडा आश्रम जवळ येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| १० | रा.म.क्र. ०८ जवळील डाचकुलपाडा तय्यब्बानगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| ११ | रा.म.क्र. ०८ जवळील मिनाक्षी नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १२ | रा.म.क्र. ०८ जवळील माशाचापाडा येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| १३ | रा.म.क्र. ०८ जवळील गगनगीरी नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| १४ | भाईंदर (प.) भोलानगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| १५ | भाईंदर (प.) भोलानगर "बी" येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| १६ | भाईंदर (प.) आंबेडकर नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.५०,००,०००/- |
| १७ | भाईंदर (प.) लालबहादूर शास्त्रीनगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.५०,००,०००/- |
| १८ | भाईंदर (प.) नेहरूनगर "अे" येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| १९ | भाईंदर (प.) नेहरूनगर "बी" येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.३७,५०,०००/- |
| २० | भाईंदर (प.) उत्तन लालबहादूर नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २१ | भाईंदर (पुर्व) एस.एन. कॉलेजच्या समोरील नाल्याच्या शेवटी इंदिरा नगर येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.२५,००,०००/- |
| २२ | भाईंदर (पुर्व) शिवशक्ती नगर संत निरकारी आश्रमाच्या डी.पी. रस्त्यालगत येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २३ | भाईंदर (पुर्व) शिवशक्ती नगर येथील जय अंबे चाळ येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.२५,००,०००/- |
| २४ | भाईंदर (पुर्व) आर.एन.पी. पार्क येथील बंगा संगा (नारायण नगर झोपडपट्टी) येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २५ | भाईंदर (पुर्व) पानटेकडी स्मशानभूमी येथे शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २६ | रा.म.क्र. ०८ जवळील घोडबंदर मॉडर्न कंपनी झोपडपट्टी जवळ शौचालयाचे बांधकाम करणे. | रु.१५,००,०००/- |
| २७ | प्रभाग क्र.३१ बाळासाहेब ठाकरे मैदानाजवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| २८ | हटकेश १५ नं. बस स्टॉप जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| २९ | जी.सी.सी. क्लब नवीन बिल्डींग समोर हटकेश येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३० | एस.के. स्टोन समोरील पेट्रोल पंपच्या बाजूला सुंदर दर्शन जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३१ | हटकेश झंकार फॅक्ट्री च्या बाजूला शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३२ | सिल्वर पार्क सिग्नल जवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३३ | सृष्टी पोलिस चौकीच्या बाजूला शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३४ | एम.आय.डी.सी. हायवे येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३५ | फाऊंटन हॉटेल समोर शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३६ | भाईंदर (पुर्व) नवघर स्मशानभूमी मागे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३७ | भाईंदर (पुर्व) इंदिरानगर येथे महिलासाठी शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ३८ | भाईंदर (प.) जय बजरंग नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ३९ | भाईंदर (प.) आनंद नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ४० | भाईंदर (प.) क्रांती नगर येथे शौचालय बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| ४१ | मुर्धा ब्रम्हदेव नगरच्या शेवटी शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४२ | मुर्धा खाडी धनराज माच्छी यांच्या घराजवळ शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४३ | मुर्धा बस स्टॉप मागे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४४ | मुर्धा शिवप्रसाद आगर येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |
| ४५ | भाईंदर (प.) नाझरेथ आागर झोपडपट्टी येथे शौचालय बांधणे. | रु.२५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | **एकुण** | **रु.११,६५,००,०००/-** |

वरील सर्व शौचालयाचा एकुण खर्च रु.११,६५,००,०००/- इतका खर्च येणार आहे.

सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासन खालील प्रमाणे अनुदान देणार आहेत.

| | | |
|---|---|---|
| **केंद्र शासन अनुदान -** | **४०% -** | **रु.४,६६,००,०००/-** |
| **राज्य शासन अनुदान -** | **१०% -** | **रु.१,१६,५०,०००/-** |
| **१४ वा वित्त आयोग प्राप्त निधी मधून** | **प्रती सिट्स रु.२५,०००/- X ९३२ सिट्स** | **रु.२,३३,००,०००/-** |
| | **एकुण** | **रु.८,१५,५०,०००/-** |

उर्वरित रु.१,८४,५०,०००/- इतकी रक्कम आवश्यक असून ''शहर स्वच्छता आराखडा'' या लेखाशिर्षकामधून रक्कम रु.९०,००,०००/- व अन्य अखर्चित लेखाशिर्षामधून वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने शौचालये, दैनंदिन साफसफाई, निगा व देखभालीसाठी रु. २०,०००/- प्रति शौचालय प्रति महिना दराने खाजगी संस्थांना कामे दिली आहेत. सदर संस्था समाधानकारक काम करीत नसल्यास अशा संस्थांकडून कामे रद्द करुन इतर संस्थांना मंजूर दराने कामे देण्यात यावीत. सर्व शौचालयाचे विजबील, पाणीबील व दुरुस्ती महानगरपालिका निधीतून करावी यासाठी अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद करावी.

तरी, वरील प्रमाणे येणाऱ्या खर्चास व अनुषंगीक सर्व कार्यवाही करणेस मा. महासभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच आवश्यक कार्यवाही व अंमलबजावणी करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत. वरील कामांच्या निविदा तातडीने मागविण्यात याव्यात. सदरकामी अनुदान व्यतिरिक्त खर्च महानगरपालिका निधीतून करावा.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०३, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रुंदीकरण, सुशोभिकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम मला एक मिनिट या विषयावर बोलायचे आहे. माझी अशी सुचना याच्यात की, मिरा भाईदर रोड हायवे वर एक पण सुलभ शौचालय नाही. तर रोडवर आपण कूठेही एक जागा बघून मिरा भाईदर काशीमिरा पर्यत...........

**मा. महापौर :-**

आपण कदाचित ऐकले नाही मॅडम त्यांनी आत्ताच सांगितल ज्यांना ज्यांना जिथे जिथे पाहिजे ते पत्र द्या आम्ही तिथे करू.

**शिल्पा भावसार :-**

ओके थँक्यू.

**मा. आयुक्त :-**

नाही आवश्यकता तपासून करण्यात येईल स्वच्छ महाराष्ट अभियान आणि स्वच्छ भारत अभियान आमचा कार्यक्रम चालू होऊन जवळपास एक वर्ष झाले २/१०/२०१४ रोजी डिक्लेर झाले आहे. आणि केंद्र शासनाकडून याच्यामध्ये भरपूर फंड अव्हेलेबल आहे. परंतु वैयक्तीक टॉयलेटचा आम्ही आता सर्व्हे केलेला आहे की वैयक्तिक ज्या माणसाला आता जो ठराव आपण पारित केला त्याच्यामध्ये केंद्र शासन ८००० रु. देणार ४००० रु. महाराष्ट्र शासन आणि ४००० रु. वित्त आयोगातून खर्च करण्याची मूभा आपल्याला शासनाने दिली आहे आणि ५००० रु. आपण देतोय हे २२००० रु. आपण लाभार्थीला देणार आहोत आणि डायरेक्ट त्याच्या अकाऊंटला हे पैसे वर्ग होणार आहे. महानगरपालिका इन्डीव्हूज्वल टॉयलेट बांधणार नाही संबंधित माणसाच्या घरी जाऊन त्याची आवश्यकता तपासून सगळ आपण सर्व्हे केलेला आहे आणि टोटल ९९० ची फिगर आपल्याकडे अर्ज प्राप्त झाले आहे. त्याच्यामधील ३५० अर्ज अपलोड झाले आहे आणि ते सर्व तपासणी करण्याचे इंजिनिअरींग डिपार्टमेंटमार्फत काम चालु आहे जे अर्ज योग्य असतील ते त्याच्यावर केंद्र शासनाचे पैसे आमच्याकडे १ कोटी १९ लाख रु. येऊन पडलेले आहेत. तर ते आम्ही इन्डीव्हूज्वल त्यांच्या अकाऊंटला वर्ग करणार आहोत आणि आपल्या शहरामध्ये यापूर्वीच सगळ झालेले आहे. ३० ठिकाणी जवळपास सार्वजनिक शौचालय ज्या ठिकाणी उघड्यावर लोक टॉयलेटला बसतात त्या ठिकाणी आपण सर्व्हे केलेला आहे. एकुण ३० ठिकाणे अशी आहेत मिरा भाईंदर शहरामध्ये टोटल की त्या ठिकाणी जर आपण कम्युनिटी टॉयलेट बांधले

तर त्या ठिकाणचा सगळा प्रश्न भविष्यात मिटणार आहे आणि २/१०/२०१७ पर्यंत आपल्याला आपलं शहर हागणदारी मुक्त करायचं आहे. म्हणजे डेफिगेशन फ्री करायचं आहे. सर्व सन्मा. नगरसेवकांनी याच्यामध्ये हिरहीरीने भाग घ्यायची अत्यंत आवश्यकता आहे आणि आपल्या वॉर्डामध्ये जर असा काही प्रॉब्लेम असेल तर आपण पर्सनली पानपट्टे साहेबांकडे तसं एखाद निवेदन द्यावे की, आमच्याकडे कॉमन टॉयलेट ज्यांना पाहिजे असेल किंवा त्यांच सर्वेक्षणाचे काम चालुच आहे. हे ३० टॉयलेट सगळेच जर कम्युनिटी पूर्ण झाले तर हे पण डेफिगेशन फ्री शहर होणार आहे हे ३७ स्थळांचे आपण त्याला मंजुरी दिली आहे आणि त्याच्यामध्ये आम्ही शासनाकडेही प्रस्ताव पाठवत आहोत की, आपल्याकडे इन्डीव्ह्युज्वल टॉयलेटसाठी जागा कमी आहे. जागा नाही असाच जास्त प्रॉब्लेम आहे. कम्युनिटी टॉयलेट जर केले तर आपल्या येथील प्रॉब्लेम सॉर्ट आऊट होणार आहे. शासनाकडून आम्ही त्याच्यामध्ये पैसे मिळवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करत आहोत. आणि ग्रुप टॉयलेटसाठी आणि इन्डीव्ह्युज्वल टॉयलेटसाठी १ कोटि १९ लाख रु. पहिल्या हफ्त्यामध्ये आम्हाला प्राप्त झालेले आहे.

**शिल्पा भावसार :-**

साहेब तुम्ही जे सांगितले त्याबद्दल तुमचे अभिनंदन आहे. कारण तुम्हाला पण माहिती आहे की गोल्डन नेस्टपासून काशिमिरापर्यंतचा जो रोड आहे त्या रोडवर एकही आपल्याकडे सुलभ शौचालय नाही.

**मा. महापौर :-**

मॅडम आताच सांगितले तुम्ही पत्राद्वारे कळवा जागा निवडा आणि पत्र द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आयुक्त साहेब आपण सुभाषचंद्र मैदान इकडे ऑलरेडी सुलभ शौचालय बांधलेले आहे. तरी पण ते लोक तेथे उघड्यावर बसतात.

**मा. आयुक्त :-**

त्याच प्रबोधन करण्याची गरज आहे. सन्मा. नगरसेवकांनी आपल्या वॉर्डातल्या आपल्या मतदारांना सांगितले पाहिजे की ही शासनाची योजना आहे. याच्यामध्ये ओपन डेफीगेशन फ्री शहर झालं तर स्मार्ट सिटीमध्ये समावेश होण्याची शक्यता आहे. त्याच प्रबोधन आपण जेवढ्या चांगल्या पध्दतीने करु शकता तेवढं आम्ही करु शकत नाही. दररोजचे तुमचे ओळखीचे संबंधातले लोक आहेत त्यांना तुम्ही सांगितले पाहिजे त्यांची कार्यशाळा घेतली पाहिजे त्यांना बोलवून सांगितले पाहिजे की त्याचे फायदे काय तोटे काय वैगेरे.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम, मिरा भाईंदर या शहरामध्ये हागणदारी मुक्त गाव किंवा शहर करण्याचे योजना आपण राबवतो. पण मला वाटते इथल्या सगळ्याच नगरसेवकांना भेडसवणारा हा प्रश्न आहे की या भागात सोसायट्या आहेत भरपूर आणि प्रत्येक सोसायटीला एक सेफ्टी टँक आहे. साहेब म्हणाले आता की आम्ही आणखी एक मशिन मागवतो आहे परंतु साहेब तुमची एकही मशिन मैला उचलत नाही फक्त पाणी साफ करुन जाते. आणि मैला तसाच राहतो माणस हागणदारी मुक्त होत नाही घाण तशीच राहते. यासाठी तुम्हाला सांगते की प्रत्येक सोसायटीचा माणुस, चेअरमन, सेक्रेटरी कर्मचाऱ्यांना तुमच्या बोलावून ७-७, ८-८ हजार रु. देतात मोजतात बरोबर आहे. एक टाकी साफ करायला ७-७, ८-८ हजार रु. मोजतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

भाईदर पूर्व झालेले नाही. ते अंडरग्राऊन्ड ड्रेनेज कधी होणार ते आम्हाला सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**मर्लिन डिसा :-**

एस.टी.पी.चे काम अजून संपलेले नाही.मिरारोडला एकच एस.टी.पी. रेडी आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम आताचा विषय मा. आयुक्तांनी क्लियर केलेला आहे. त्यामध्ये मला एक सुचना मांडायची आहे की, आमच्या प्रभागामध्ये म्हणजे लाल बहादूर शास्त्री ते नेहरूनगर ह्या परिसरात तीन प्रस्तावित केलेले आहे.सुलभ शौचालय बांधण्याबाबत आपण निविदा पण काढल्या आहेत की, सुलभ शौचालय मिरा भाईदर साफसफाई करण्यासाठी पूर्वी शौचालयाची साफसफाई करताना लोकांकडून पैसे घेत होतो. आता वर्षभरापासून पैसे घेत नाही. आता निविदा काढल्या आणि ठेकेदाराला सांगितले की तुम्ही साफसफाई करायची आणि लोकांकडून पैसे घ्यायचे ही पध्दत योग्य आहे का? लोक तुम्हाला पैसे कोठून देतील. ही प्रथा बंद करून टाका. ज्या ठिकाणी सॉल्टचे प्रॉब्लेम आहेत ज्याठिकाणी फॉरेस्टच्या जागा आहेत, ज्याठिकाणी रेल्वेच्या जागा आहेत त्याठिकाणी शौचालय बांधण्यासाठी अडचणी येतात. त्याठिकाणी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याठिकाणी आपण शौचालय बांधतो तो ही विषय क्लियर झाला पाहिजे. आपण विषय आणलेला आहे. आम्ही आपल्याला धन्यवाद देतो. परंतू हे सगळे विषय क्लियर करा कारण लोक तुम्हाला पैसे कोठून देणार...............

**मा. आयुक्त :-**

इन्डीव्ह्यूजवल टॉयलेटसाठी केंद्र शासनाने त्याला एन.ओ.सी. दिलेली आहे. परंतू कम्यूनिटी टॉयलेटसाठी रेफरन्स कालच परत केलेला आहे. त्याच्यामुळे कम्यूनिटी टॉयलेटचे काम थांबणार नाही कारण टॉयलेटच्या बांधकामासाठी हा भारत राज्यांनी घेतलेला निर्णय असल्यामूळे केंद्राचा निर्णय असल्यामुळे त्याच्यामध्ये तुमचे हे ओपन डेफिग्रेशन फ्री करायचे. आपल्याकडे केंद्र शासनाचे २-४ डिपार्टमेन्ट आहेत.

त्यामूळे ह्याच्यामध्ये त्यांनी इन्डीव्ह्यूजवल टॉयलेटसाठी मुभा दिली आहे. परंतू कम्यूनिटी टॉयलेटसाठी थोडयाच दिवसामध्ये आपल्याला एन.ओ.सी. भेटेल.

आसिफ शेख :-

लोकाकडून पैसे घ्यायची प्रथा बंद होणार की नाही होणार? ठेकेदार साफसफाई करतात ठेकेदार लोकांकडून पैसे गोळा करणार आहेत. लोक तुम्हाला पैसे देणार नाहीत.

**दिपक खांबित :-**

आपल्या मिरा भाईदरमध्ये विविध ठिकाणी १८० टॉयलेट आहेत. त्याच्यामध्ये आधी आपण टेंडर दिले होते की संस्थेने चालवायचे आणि प्रति कूटूंब पैसे वसूल करायचे असे होते. परंतू त्याच्यानंतर ते बंद झाले कारण लोक पैसे द्यायचे नाहीत. टॉयलेट तसेच पडून राहायचे. कंत्राटदार सोडून जायचे. त्यानंतर एका वर्षापूर्वी महानगरपालिकेनी टेंडर काढले आणि तिथे माणस नेमली. आपण त्या संस्थेला टॉयलेटचे २०,००० रू. देतो. ते तीन शिफ्टमध्ये तिकडे माणसे ठेवतात. त्यामुळे वर्षाला टोटल साडेतीन करोड खर्च येतो. त्यावर ऑडिट ऑब्जेक्शन आलेले आहे. त्यामूळे आपण ते टेंडर काढले आहे की, संस्थेनेच साफसफाई करायची आणि रिपेयरिंग करायचे आणि तिकडे वापरणा-याकडून पैसे घ्यायचे.

**भगवती शर्मा :-**

कोण घेणार नाही.

**आसिफ शेख :-**

कोण पैसे देणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम मुंबई महानगरपालिकेकडे १० वर्षाचे ॲग्रीमेन्ट होते आपण दोन वर्षाचे, तीन वर्षाचे ॲग्रीमेन्ट करतो. काही तरी आधार घेऊन केले पाहिजे ना.

**दिपक खांबित :-**

आपल्याला तरतूद करावी लागेल.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम संडासचा विषय महत्वाचा आहे. गेल्या पाच वर्षापूर्वी आपल्या मिरा भाईदरमध्ये मिरारोड स्टेशन परिसरात सुलभ शौचालय बांधा वापरा आणि हस्तांतरण करा. पालिकेने कोणाच्या सांगण्यावरुन ते डिमोलेशन केले. मला माहित नाही. मी गेली तीन वर्ष सतत पाठपूरावा करतो. आज मिरारोड स्टेशनची लोकसंख्या फार वाढली . येणारे जाणारे हजारो प्रवासी हजारो रिक्षाचालक आणि तेथील फेरीवाले ह्याच्यासाठी मा. महापौर मॅडम बांधा वापरा आणि हस्तांतर करा अशा प्रकारचे शौचालय होते आज तिथे शौचालय नाही. उघडयावर जातात त्याठिकाणी महिला प्रवाशांना जास्त त्रास सहन करायला लागतो. फेरीवाले उघडयावर रस्त्यावर लघूशंका करतात. मा. आयुक्तसाहेब तुमच्य निर्दशनास आणू इच्छितो टी.एम.टी. बस स्टॉपसमोर आपण दोन छोटी बाकडी ठेवली आहेत. जेणेकरून तिकडे प्रवासी टॉयलेटला जातील परंतू त्याच आऊटलेने कूठे टाकले नाही. दोनवेळा सचिन पाटीलला सांगून तिकडे एवढी दुर्गंधी पसरते की दोन वेळा त्या साईट इजिनियरला सांगून ते काढायला लागले. गणपतीच्या वेळेला त्या लोकांना त्रास झाला होता. आम्ही त्याचा २-३ वेळा पाठपूरावा केला. सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यव्हार केला. की लोकांना त्याचा त्रास होतो. मा आयुक्त महोदय माझी आपल्याला विनंती आहे की आपण ह्यामध्ये लक्ष घालावे.

**मा. आयुक्त :-**

मा. दळवीसाहेब आपले जे सुलभ शौचालय तोडले होते ते रस्त्यात येत होते म्हणून तोडले. त्याच्यासाठी आपण मिरारोड स्टेशन आणि भाईदर स्टेशन ह्या दोन्ही स्टेशनला आणि नॅशनल हायवेच्या बाजूला फाइव्ह स्टार टॉयलेट थोडयाच दिवसामध्ये सुरू होऊन जाईल आपण ते बांधतो.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

१०० टक्के हागनदारी मुक्त करण्याकरिता प्रशासन ने पूढाकार घ्यायला पाहिजे बुलढाण नगरपरिषदेच्या कार्यकारी मुख्याधीका-यांनी स्वतः पूढाकार घेतला.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त महोदय, मा. महापौर मॅडम आमची सुचना नमूद करून घ्या. मिरा भाईदर महानगरपालिकेने जेवढे शौचालय आहेत त्या शौचालयाची साफसफाई नियमितपणे करण्यात यावी. ठेकेदार नेमावे परंतू नागरिकाकडून कोणत्याही प्रकारचे पैसे घेण्यात येऊ नये. अशी आमची सुचना आहे ती नमूद करून घ्या.

**प्रमोद सामंत :-**

स्वच्छ महाराष्ट्र अभियानातर्गत हा विषय मा. महापौरानी घेतला बर झाले.प्रशासनानी गोषवारा दिला. मा. आयुक्तानी सांगितले प्रॉपर्टी कनेक्शन करून घ्या. मिरा भाईदर मध्ये जे.एन.एन.य.आर.एम अंतर्गत भुयारी गटर योजना सूरू झाली.त्यामधला सर्वात पहिला एस.टी.पी. प्लान पूनम सागरमध्ये सुरू झाला. प्रॉपर्टी कनेक्शनच्या वर्षभरांनी नोटिसा आल्या. लोकांना नोटिसा दिल्यानंतर लोकांनी पैसे भरून प्रॉपर्टी कनेक्शन चालू

केले. आता परिस्थिती अशी आहे की लोकांनी प्रॉपर्टी कनेक्श्न केल्यानंतर ठिकठिकाणी चेम्बर बांधले आहेत ती भरून वाहतात. आणि आपल्या एस.टी.पी. प्लान मधून १००% पाणी प्रक्रिया न करता गेली पाच वर्षापासून नाल्यात सोडले जाते. विभागाच्या साहेबांना बोलवा आणि त्यांना विचारा काय परिस्थिती आहे. किती लोकांनी नाक धरून तिथे राहावे लागणार ते विचारा . आपण त्यांना ९५% पेमेन्ट केले आहे. त्या एस.टी.पी. प्लान्टची परिस्थिती एवढी बिकट आहे त्या एस.टी.पी. प्लान्ट ची आणि आजूबाजूच्या रहिवाश्यांची तिकडे राहणे कठीण झाले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ छत्रपती शिवाजी महाराज पूतळा ते स्वातंत्रवीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट जंक्शन) पर्यतचा छत्रपती शिवाजी महाराज पथ ४५.०० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरणे, दोन्ही बाजूस नाले व दुभाजक बांधण्याचे काम २००५ मध्ये पूर्ण झालेले असून सदर रस्त्याचा तीन वर्षाचा सुरक्षा कालावधी संपलेला आहे. सदर रस्ता हा नाल्यासहीत ३९.०० मीटर रुंदीचा तयार केलेला असून नाल्यालगत दोन्ही बाजूस विविध यंत्रणेच्या केबल्स, जलवाहिनी टाकण्यासाठी ३.०० मीटर रुंदीचा सर्व्हीस रस्ता ठेवलेला आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाहतूकीचा ताण पडत असून रस्त्याची रुंदी कमी पडत आहे. नाल्याच्या स्लॅब ची लेव्हल खाली घेऊन व उर्वरीत ३.०० मीटर जागेसह रुंदीकरण करणे तसेच संपूर्ण रस्त्याचे सुशोभिकरण करणे इ. कामे करणे आवश्यक असल्याने मा. महासभा दि.११/१२/२०१३ ठराव क्र. ७२ अन्वये सदरील रस्ता सुशोभिकरण करण्यासाठी आराखडा व सविस्तर प्रकल्प तयार करणेकरीता अनुभवी सल्लागार नेमण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानूसार मे. के.के. टेक्नो ट्रेड या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली. मे. के.के. टेक्नो ट्रेड या सल्लागाराने सदरील कामाचे सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन खालीलप्रमाणे सादर केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | | कामाची लांबी | कामाचा अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | Option-1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे. | ३७४०.०० मी. | रु.१४,९७,७२,०६०/- |
| २ | Option-2 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे. | ७८५.०० मी. | रु.३,५६,५५,३७५/- |

सदरील सर्व्हीस रस्त्याची रुंदी ३.०० मी. एवढी आहे. सदरील सर्व्हीस रस्त्यामध्ये यापूर्वी माती भरावाचेच काम करण्यात आले होते. प्रस्तावित कामामध्ये सर्व्हीस रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण करून बांधकाम करणे तसेच सर्व्हीस रस्त्यालगत फुटपाथच्या स्लॅबची लेव्हल खाली घेऊन रस्त्याचे रुंदीकरण करणे इ. कामाचा समावेश आहे.

मा. महासभा दि.२३/०३/२०१५ ठराव क्र. ८१ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग व अंडरपास बांधणे कामासाठी रु.३८०.९१ कोटी रक्कमेचा सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे. सदरील कामामध्ये १) भाईंदर (पूर्व) भागातील वाहनांना जाण्यासाठी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) व दिपक हॉस्पीटल जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे २) सिल्वहर पार्क जंक्शन, हटकेश जंक्शन व प्लेझंट पार्क जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे ३) एस.के. स्टोन जंक्शन, कनकिया जंक्शन व शिवार उद्यान जंक्शन (एन.एच. हायस्कूल रस्ता व सरदार पटेल रस्ता) या ठिकाणी एक उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे. ४) काशिमिरा नाका येथे पादचारी पुल बांधणे कामांचा समावेश आहे. सदरील उन्नत मार्गांच्या दोन्ही बाजूस असलेल्या फुटपाथवरील स्लॅबची लेव्हल खाली घेऊन सर्व्हीस रस्त्याचे रुंदीकरण करणे कामाचा अंर्तभाव केलेला आहे.

वरील प्रमाणे मे. के.के. टेक्नो ट्रेड यांनी तयार करण्यात आलेल्या Option-1 मधील अंदाजपत्रकात ३७४०.०० मी. लांबी घेऊन **रु. १४,९७,७२,०६०/-** रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले असून Option-2 नूसार सर्व्हीस रस्त्याची लांबी ७८५.०० मी. घेऊन (उन्नत मार्गांमधील दोन्ही बाजूच्या सर्व्हीस रस्त्यांची लांबी वगळून) **रु.३,५६,५५,३७५/-** रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

सदरील नियोजित उन्नत मार्ग बांधण्याच्या कामास एकूण रु.३८०.९१ कोटी खर्च येणार असून सदरील काम खर्च उभारणी करून टप्प्या टप्प्याने पूर्ण करावयाचे आहे. प्रस्तावित काम सद्यस्थितीत प्रलंबित असून सदरील काम पूर्ण होण्यास बराच अवधी लागणार आहे व सदरील उन्नत मार्गाचे काम पूर्ण होण्याचा कालावधी अद्याप निश्चित नाही. तथापी उन्नत मार्ग बांधताना त्याच्या शेजारील सर्व्हीस रस्ते व नाला खाली करून रस्ता रुंदीकरण करता येईल. प्रथम टप्प्यात Option-2 नूसार काम केल्यास रस्ता रुंद होऊन वाहतूक सुरळीत होऊ शकेल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे कामी सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात “श्री. छत्रपती शिवाजी महाराज रोड रुंदीकरण/ सुशोभिकरण” या

लेखाशिर्षकात रु. ७०० लक्ष एवढी तरतूद केलेली असून रु. ७०० लक्ष एवढी तरतूद शिल्लक आहे. तरी वरील प्रमाणे प्रस्तावित रु.३,५६,५५,३७५/- रक्कमेच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, मा. महासभा दि. ११/१२/२०१३,ठराव क्र. रस्ता सुशोभिकरण करण्यासाठी आराखडा व सविस्तर प्रकल्प तयार करण्याकरिता अनुभवी सल्लागार नेमण्याच्या प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार मेसर्स. के.के. टेक्नो ह्या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली होती. मेसर्स. के.के. टेक्नो ह्या सल्लागारांनी सदरील कामाचे सविस्तर आराखडे अंदाजपत्रक तयार करून सादर केले. मा. महापौर मॅडम, मेरा यह कहना है उसपे क्या आराखडा तयार किया उस रस्ते के काम के अंदर मे उसने जो भी प्लान्ट बनाया होगा काशीमिरा रोड काम के अंदर में बी.पी.रस्ते के अलावा गटर है। गटर के बाजू में सर्व्हिस रोड है। उसके उपर सर्व्हिस रोड का कूछ यूज नही हो रहा है। नाममात्र सर्व्हिस रोड है। जिसके उपर अतिक्रमण किए गए है। आज तक उसको हटाया नही गया इसके अलावा आगे जाऐंगे तो सिल्वर पार्क के पहले लोढा कॉम्पलेक्स आता है जिसको महानगरपालिका के तरफसे ओ.सी. दि गई है। वहॉ पे देखा जाए वो ओ.सी. की बिल्डींग है. गटर को लगकर के है वहा सर्व्हिस रोड जाकर एन्ड हो जाता है। उसी तरह लेप्ट साईडमें रिलायन्स का टॉवर खडा है वहॅा पे भी सर्व्हिस रोड जाकर एन्ड हो जाता है इस सब चिजों को देखकर कई बार इसके पहले के आयुक्तने भी कोशिश की थी और यह केस मा. येवले साहेब जो भा.ज.पा. के पदाधिकारी है उन्होने हायकोर्ट में केस भी दाखील किया था कि सर्व्हिस रोड को क्लियर करके लोगो को उपलब्ध कराने के लिए उसके उपर भी मनपा द्वारा ॲफेडेव्हिट किया गया था। लेकीन आज तक वो मुक्त नही किया। आज इसके अंदर में रूंदीकरण करने के लिए कहाँ जा रहा है कि गटर को तोड कर सर्व्हिस रोड को सर्व्हिस रोड वहॉ पे वस्तूस्थिती है नही इसके बाद के अंदर में गटर को तोडकर निचे लेवल किया तो जो फूटपाथ आप यूज कर रहे है। उस गटर पे चढने के लिए वो फूटपाथ भी लोगो को चलने के लिए बंद हो जायेगा। जो लोग पैदल चल रहे है उनकी सुरक्षा के लिए खतरा हो जायेगा वा उधर नही चल पायेंगे आप वो रस्ते का रूंदीकरण कर रहे है वो फ्लॉप शाबित होगा क्योकी आगे तरह तरह की अडचण है उन अडचणो को दूर किए बगैर के अंदर खाली फोकट पैसे की बरबादी की जा रही है। इसके जो रिपोर्ट है उस रिपोर्ट को सभी सदस्य को बताना चाहिए। की वहा क्या क्या आयटम थी उन अडचणे को कैसे निराकरण किया जायेगा उसके बाद मे यह विषय लेना चाहिए।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सर्व्हिस रोड हा डी.पी प्लान मध्ये कूठे शब्दच नाही. तो रस्ता ४५ मी. रस्ता आहे. त्यावेळी आपल्याला ज्या ज्या जागा उपलब्ध झाल्या त्या त्या काळी तो रस्ता केला २००३ साली तो रस्ता केला. काही ठिकाणी ४० मी. आहे काही ठिकाणी ४२ मी. आहे. काही ठिकाणी ४१ मी. आहे.काही ठिकाणी ४५ मी. आहे काही ठिकाणी झिरो मार्किगवर बिल्डीग आहे. अशा काही इमारती आहेत. आता गटराची लेवल खाली करुन काही ठिकाणी ३-३ मी. जागा शिल्लक राहीली आहे त्याला समावेश करणे गरजेचे आहे भविष्यात ते ही अतिक्रमण होतील पण ज्या ठिकाणी मेजर पार्टमध्ये एक सिल्वर पार्कचे सोडले बाकी ठिकाणी फ्लाय ओव्हर बांधणार आहोत. त्याला ३-३ मीटरचा रस्ता रूदीकरण झाले तर आपल्याला मोठया प्रमाणे फायदा होणार आहे. सिल्वर पार्कचे सिग्नल आहे त्याचे काही नाही पण ज्याठिकाणी उपलब्ध आहे कदाचीत तीन कोटी खर्च होतो त्याचा अडीज कोटी होईल पण ७३५ मी. लाईन मिळणार नाही.४०० मी. मिळतील तेवढे तरी करणे गरजेचे आहे. दुकान पूढे येत चालले आहेत फेरीवाले बसत चालले आहेत. आजच्या तारखेला अशी परिस्थिती आहे की, रविवारचा सुट्टीचा दिवस ते एस्सेल वर्ल्डचे ट्राफीक आणि इतर ट्राफीक असेल आपल्याला मिरा भाईदरवर गोल्डन नेस्ट ते काशी मिराला जायला जवळ जवळ अर्धा तास लागतो कमीत कमी हा रस्ता झाला तर २० मिनिट तरी होईल और भगवती शर्मा रस्ता जितना उपलब्ध है वा करनेका हमारा अधिकार है। वो तो हम करेंगे ही वो भी छोड देंगे तो वो भी रह जायेगा।

**भगवती शर्मा :-**

मेरा यह कहना है आज वहॉ पे बूढे, बच्चे, औरत चल रहे है वा फूटपाथ को बंद करके रूंदीकरण कर रहे है। पैदल चलने वाले कहॅासे चलेगे।

**नरेंद्र मेंहता :-**

तीन मीटरमध्ये आपली कोणतीही गाडी जाऊ शकत नाही. तीन मीटर वेगळे घेतले तर त्या साईडला जायला रस्ता नाही ह्या साईडला यायला रस्ता नाही. म्हणून त्या गटराचा स्लॅब खाली घ्यायचा आहे. तीन मीटर हे दोन मीटर हे पाच मीटर होईल आणि फूटपाथ त्या साईडला घ्या.

**भगवती शर्मा :-**

फूटपाथ की व्यवस्था करो ना।

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये फूटपाथची व्यवस्था करण्यात यावी ही सुचना आहे.

**भगवती शर्मा :-**

प्रशासन को बोलने दिजीए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जी पी.एल. दाखल केलेली आहे त्या पी.एल.चे झाले का आणि जे एफिडेव्हीट उच्च न्यायालयात महानगरपालिकेने सादर केलेले आहे त्याचे काय? आणि त्या एफिडेव्हीटमध्ये काय म्हटलेले आहे. त्याचा प्रशासनाने खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

माझ्या माहितीप्रमाणे तेव्हा आपण एफिडेव्हीट दिले होत त्याची काय अनधिकृत बांधकाम जी ४५ मीटरमध्ये त्या रस्त्यावर आहेत. त्याची ऑलरेडी प्रोसेस सूरू आहे. काही दावे खालच्या कोर्टामध्ये एफिडेव्हिट करायला कोर्टाने सांगितले होते आणि आपण म्हटल होत की ते करून आपण रस्ता करणार.

**मा. आयुक्त :-**

तुमचे डी.पी. प्लानमध्ये जेवढी विडथ आहे तेवढा रस्ता घ्यायला पाहिजे होता. माझ्या माहितीप्रमाणे शिवमूर्ती नाईक साहेब असताना ह्या रस्त्याचे काम झालेले आहे. त्यांनी पलिकडून सर्व्हिस लाईन टाकण्यासाठी जागा सोडली होती मग सर्व्हिस लाईन तिकडून टाकली गेली नाही. ती फूटपाथच्या अलीकडून टाकली. आता आपले असे प्रस्तावित आहे की मा. आमदार साहेबांनी असे सांगितले की, जवळपास ५-६ सिग्नल आहेत. ते सिग्नल काढायचे २५६ कोटीला शासनाने मंजुरी दिली आहे. म्हणजे शासनाने आपल्याला कर्ज घेण्यासाठी मंजूरी प्राप्त झालेली आहे. आणि ते सिग्नल सगळे निघाले आणि तिकडे ओव्हर ब्रिज बांधला तर ते ओव्हरब्रिज बांधताना हा रस्ता पुरणार नाही गावात ट्राफीक जाम होणार आहे. हे काम युध्द पातळीवर करणे गरजेचे आहे. आपण रस्ता रूद करतो ना फूटपाथवर किती लोक चालतात. भगवतीजीनी ह्या शहरात मला वाटते पूणा आणि मुंबई सोडून फूटपाथवरती कोणी चालत नाही. फूटपाथ केले की तिथे अतिक्रमणाचे घर झाले. त्यामूळे फूटपाथवर चालायची इथल्या नागरिकांना आपण अगोदर सवय लावू नंतर तिथे फूटपाथ करू. परंतू जास्तीत जास्त मोठा रोड झाला तर आपल्या गावाची शान वाढेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, रस्ता रूंदीकरण केले पाहिजे याबाबत दूमत नाही. रस्ता रूंदीकरण करताना तुम्ही जे सागर हॉटेलच्या आतमध्ये तोडलेले आहे. तिथे अजून झालेले नाही. त्यांनी तोडलेले आहे. तुम्ही रस्ता रूंदीकरण केलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

साहेब त्याचे टेंडर झाले ते काम प्रोसेसमध्ये आहे. तुम्ही जाऊन बघा. मला असे वाटते काम भरपूर झालेले आहे. मी सांगू शकत नाही की ५०% झाले की ७५% झाले पण ते तोडल्याबरोबर तुम्ही तिकडे गेला नाहीत तुम्ही माझ्याबरोबर चला काम किती झाले ते मी आपल्याला दाखवतो.

**भगवती शर्मा :-**

काही लोकांनी स्टे पण घेतलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

साहेब, त्या इंदूजा प्रॉपर्टीध्ये ज्यांनी स्टे घेतला असेल तो व्हेकेट करण्याची कारवाई करू. ज्याचा स्टे नसेल ते तोडायला आम्हाला कोणाच्या परवानगीची आवश्यकता नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमचे असे म्हणणे आहे तुम्ही सर्व गोष्टीचा आढावा घ्या. सत्ताधा-यांनी जो आराखडा दिला आहे तो आम्हाला दाखवा. ज्यावेळी फ्लाय ओव्हर मंजूर केला तेव्हा सर्व सदस्यांनी बूकलेट दिली कूठे प्लान होणार आहे. किती विड्थचा होणार आहे? कूठे उतरणार आहे त्याची इत्यंभूत माहिती दिली. मग ही माहिती तुम्ही का लपवली.

**मा. आयुक्त :-**

अजून फ्लायओव्हर मंजूर करून घेतला नाही ते शासनाकडून कर्ज मंजूरीसाठी घेतले तो ठराव मागेच झाला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब,त्याची तुम्ही आम्हाला इत्यंभूत माहिती दिली. तुम्ही त्या रस्त्याची इत्यंभूत माहिती का देत नाही. तुम्ही हा आराखडा सादर करा. प्रत्येक नगरसेवक त्या रस्त्याने जातात आणि प्रत्येकांना त्याची जाण आहे. कूठे अडथळा आहे. तो टेक्नोवाला आला सर्व्हे करून गेला.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम वाकोडेसाहेब आले आहेत.

**मा.महापौर :-**

सचिव साहेब पूढचा विषय घ्या.

**प्रभात पाटील :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर आपण महापौर असल्यापासून मी ५० वेळा बोलले असेन तिथली अनधिकृत गॅरेजेस आणि कारचे स्टेरिंग आणि शेड ते कधी निघणार आहे. निदान हा रस्ता रूंद करा त्या निमित्ताने ते निघेल तरी.

**नरेंद्र मेहता :-**

आता तेच केले.

**प्रभात पाटील :-**

ते तुमच्याने अतिक्रमण हटणार नाही. ह्या मार्गाने हटले तरी.............

**प्रकरण क्र. १०३ :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग रुंदीकरण, सुशोभिकरण करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ छत्रपती शिवाजी महाराज पूतळा ते स्वातंत्रवीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट जंक्शन) पर्यतचा छत्रपती शिवाजी महाराज पथ ४५.०० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरणे, दोन्ही बाजूस नाले व दुभाजक बांधण्याचे काम २००५ मध्ये पूर्ण झालेले असून सदर रस्त्याचा तीन वर्षाचा सुरक्षा कालावधी संपलेला आहे. सदर रस्ता हा नाल्यासहीत ३९.०० मीटर रुंदीचा तयार केलेला असून नाल्यालगत दोन्ही बाजूस विविध यंत्रणेच्या केबल्स, जलवाहिनी टाकण्यासाठी ३.०० मीटर रुंदीचा सर्व्हीस रस्ता ठेवलेला आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाहतूकीचा ताण पडत असून रस्त्याची रुंदी कमी पडत आहे. नाल्याच्या स्लॅब ची लेव्हल खाली घेऊन व उर्वरीत ३.०० मीटर जागेसह रुंदीकरण करणे तसेच संपूर्ण रस्त्याचे सुशोभिकरण करणे इ. कामे करणे आवश्यक असल्याने मा. महासभा दि.११/१२/२०१३ ठराव क्र. ७२ अन्वये सदरील रस्ता सुशोभिकरण करण्यासाठी आराखडा व सविस्तर प्रकल्प तयार करणेकरीता अनुभवी सल्लागार नेमण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानूसार मे. के.के. टेक्नो ट्रेड या सल्लागाराची नेमणूक करण्यात आली. मे. के.के. टेक्नो ट्रेड या सल्लागाराने सदरील कामाचे सविस्तर आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन खालीलप्रमाणे सादर केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | | कामाची लांबी | कामाचा अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | Option-1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे. | ३७४०.०० मी. | रु.१४,९७,७२,०६०/- |
| २ | Option-2 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे. | ७८५.०० मी. | रु.३,५६,५५,३७५/- |

सदरील सर्व्हीस रस्त्याची रुंदी ३.०० मी. एवढी आहे. सदरील सर्व्हीस रस्त्यामध्ये यापूर्वी माती भरावाचेच काम करण्यात आले होते. प्रस्तावित कामामध्ये सर्व्हीस रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण करून बांधकाम करणे तसेच सर्व्हीस रस्त्यालगत फुटपाथच्या स्लॅबची लेव्हल खाली घेऊन रस्त्याचे रुंदीकरण करणे इ. कामाचा समावेश आहे.

मा. महासभा दि.२३/०३/२०१५ ठराव क्र. ८१ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग व अंडरपास बांधणे कामासाठी रु.३८०.९१ कोटी रक्कमेचा सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे. सदरील कामामध्ये १) भाईंदर (पूर्व) भागातील वाहनांना जाण्यासाठी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) व दिपक हॉस्पीटल जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे २) सिल्वहर पार्क जंक्शन, हटकेश जंक्शन व प्लेझंट पार्क जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे ३) एस.के. स्टोन जंक्शन, कनकिया जंक्शन व शिवार उद्यान जंक्शन (एन.एच. हायस्कूल रस्ता व सरदार पटेल रस्ता) या ठिकाणी एक उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे. ४) काशिमिरा नाका येथे पादचारी पुल बांधणे कामांचा समावेश आहे. सदरील उन्नत मार्गांच्या दोन्ही बाजूस असलेल्या फुटपाथवरील स्लॅबची लेव्हल खाली घेऊन सर्व्हीस रस्त्याचे रुंदीकरण करणे कामाचा अंर्तभाव केलेला आहे.

वरील प्रमाणे मे. के.के. टेक्नो ट्रेड यांनी तयार करण्यात आलेल्या Option-1 मधील अंदाजपत्रकात ३७४०.०० मी. लांबी घेऊन **रु. १४,९७,७२,०६०/-** रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले असून Option-2 नूसार सर्व्हीस रस्त्याची लांबी ७८५.०० मी. घेऊन (उन्नत मार्गांमधील दोन्ही बाजूच्या सर्व्हीस रस्त्यांची लांबी वगळून) **रु.३,५६,५५,३७५/-** रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

सदरील नियोजित उन्नत मार्ग बांधण्याच्या कामास एकूण रु.३८०.९१ कोटी खर्च येणार असून सदरील काम खर्च उभारणी करून टप्प्या टप्प्याने पूर्ण करावयाचे आहे. प्रस्तावित काम सद्यस्थितीत प्रलंबित असून सदरील काम पूर्ण होण्यास बराच अवधी लागणार आहे व सदरील उन्नत मार्गाचे काम पूर्ण होण्याचा कालावधी अद्याप निश्चित नाही. तथापी उन्नत मार्ग बांधताना त्याच्या शेजारील सर्व्हीस रस्ते व नाला खाली करून रस्ता रुंदीकरण करता येईल. प्रथम टप्प्यात Option-2 नूसार काम केल्यास रस्ता रुंद होऊन वाहतूक सुरळीत होऊ शकेल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करणे कामी सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात “श्री. छत्रपती शिवाजी महाराज रोड रुंदीकरण/ सुशोभिकरण” या लेखाशिर्षकात रु. ७०० लक्ष एवढी तरतूद केलेली असून रु. ७०० लक्ष एवढी तरतूद शिल्लक आहे. तरी वरील प्रमाणे प्रस्तावित रु.३,५६,५५,३७५/- रक्कमेच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०४, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. २२१, इंद्रलोक प्रभाग क्र. ३१ भाईंदर (पू.) येथे लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी मंजुरी मिळणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण 221, इंद्रलोक प्रभाग क्र. 31 भाईंदर पूर्व येथे असून सदर परिसरामध्ये मोठया प्रमाणात नविन गृहसंकुले तयार झाल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. या परिसरामध्ये एवढया मोठया क्षेत्रफळाचे दुसरे आरक्षण नसल्यामुळे आरक्षण क्र. 221 विकसीत करण्यात यावे. याकरीता, सदर आरक्षणाचे क्षेत्रफळ मिळणेबाबत मा. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांना कळविले असता सार्व. बांधकाम विभाग मा.कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडून सरासरी 141 मीटर लांबी व 138.50 मीटर रुंदी या प्रमाणे एकुण 19528.50 चौ.मी. एवढे क्षेत्रफळ दिलेले आहे.

सदर ठिकाणी खालील तक्त्यात नमुद प्रमाणे लॉन लावल्यास मैदान खेळण्यायोग्य होवून सौंदर्यीकरणात वाढ होण्यास मदत होणार आहे.

| Sr. .No. | Items | Unit | Approval Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Preparing Lawn (30) cm. depth) :- Excavating the ground to a required depth of 30 cms, removing & conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling fresh garden soil/silt & manure in excavated area in 3:1 proportion to a height of 30 cms, Mixing garden soil and manure thoroughly well, leveling watering on previous night. Planting required variety of lawn grass as directed and maintaining till well established by watering weeding, clipping, rolling, etc complete. | **18968.50 sq. mtr** | **Rs. 650/- sq. mtr** | **Rs. 1,23,29,525/-** |
| 2. | Preparing flower Bed :- Excavating the ground to a required depth of 30 cms, removing & conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling fresh garden soil/silt & manure in excavated area in 3:1 proportion to a height of 30 cms, Mixing garden soil and manure thoroughly well, leveling watering on previous night. Planting seedling of required annuals 25 cms. Apart Maintaining till well established by watering weeding, Stirring replacing of casualties etc, complete. | **560 sq. mtr** | **Rs. 638/- sq. mtr** | **Rs. 3,57,280/-** |
| | Total | | | **Rs.1,26,86,805/-** |

ई-टेडरींग On-line प्रणालीद्वारे तसेच जाहिर वृत्तपत्रांत प्रसिध्दी देवुन **वार्षिक निविदा** मागविण्यात आल्या होत्या. सदर वार्षिक निविदा स्विकारण्यास मा.आयुक्त सो., यांनी **दि. ०६/०६/२०१५ रोजी मंजुरी** दिलेली सदर निविदेस **मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.४२ दि.१७/०६/२०१५** अन्वये **मान्यता** दिलेली असुन त्यानुसार **मे. गणेशकृपा ट्रांन्सपोर्ट** यांच्या समवेत करारनामा करून **वार्षिक कार्यादेश** देण्यात आलेला आहे.

सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात "उद्याने /दुभाजक सुशोभिकरण करणे" या शिर्षाखाली रु. ४,५०,००,०००/- (रु. चार कोटी पन्नास लाख मात्र) रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त नमुद ठिकाणी लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी अंदाजीत एकुण रु. १,२६,८६,८०५/-/- (रु. एक कोटी सव्विस लाख श्याऐंशी हजार आठशे पाच फक्त) खर्च अपेक्षित आहे. याकामी मागविण्यात आलेल्या वार्षिक निविदेस मा.स्थायी समितीने मंजुरी दिलेली असून मे. गणेशकृपा ट्रांन्सपोर्ट यांना दरमंजुरी बाबत वार्षीक कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार आरक्षण 221, (आदरणीय बाळासाहेब ठाकरे उद्यान) इंद्रलोक प्रभाग क्र. 31 भाईंदर (पु.) येथे लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी वार्षिक मंजुर दराने कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, ह्या आरक्षणाला हिंदू ह्रदयसम्राट स्वर्गवासी श्री. बाळासाहेब ठाकरे उद्यान असे २०१३ ला नाव दिले आहे. प्रशासन नेहमी का चूक करते २२१ लिहायचं. २०१३ ला नामकरणाचा ठराव झालेला आहे. ६/०७/२०१३ ठराव क्र. २३ नुसार मिरारोड पूर्व आरक्षण क्र. २२१ हिंदू ह्दयसम्राट स्वर्गवासी श्री. बाळासाहेब ठाकरे उद्यान साहेब जिथे २२१ लिहितात तिथे बाळासाहेब ठाकरे करा पूर्ण नाव लिहा.

**दिपक खांबित :-**

सुचनेची दखल घेण्यात आलेली आहे असे होणार नाही.

**वंदना चक्रे :-**

माझी पण सुचना समावेश करून घ्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव समावेश करून घ्या.

**मा. महापौर :-**

पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्रः- १०४**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. २२१, इंद्रलोक प्रभाग क्र. ३१ भाईंदर (पू.) येथे लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण 221, इंद्रलोक प्रभाग क्र. 31 भाईंदर पूर्व येथे असून सदर परिसरामध्ये मोठया प्रमाणात नविन गृहसंकुले तयार झाल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. या परिसरामध्ये एवढया मोठया क्षेत्रफळाचे दुसरे आरक्षण नसल्यामुळे आरक्षण क्र. 221 विकसीत करण्यात यावे. याकरीता, सदर आरक्षणाचे क्षेत्रफळ मिळणेबाबत मा. शहर अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांना कळविले असता सार्व. बांधकाम विभाग मा.कार्यकारी अभियंता, सार्व. बांधकाम विभाग यांचेकडून सरासरी 141 मीटर लांबी व 138.50 मीटर रुंदी या प्रमाणे एकुण 19528.50 चौ.मी. एवढे क्षेत्रफळ दिलेले आहे.

सदर ठिकाणी खालील तक्त्यात नमुद प्रमाणे लॉन लावल्यास मैदान खेळण्यायोग्य होवून सौंदर्यीकरणात वाढ होण्यास मदत होणार आहे.

| Sr. .No. | Items | Unit | Approval Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Preparing Lawn (30) cm. depth) :- Excavating the ground to a required depth of 30 cms, removing & conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling fresh garden soil/silt & manure in excavated area in 3:1 proportion to a height of 30 cms, Mixing garden soil and manure thoroughly well, leveling watering on previous night. Planting required variety of lawn grass as directed and maintaining till well established by watering weeding, clipping, rolling, etc complete. | **18968.50 sq. mtr** | **Rs. 650/- sq. mtr** | **Rs. 1,23,29,525/-** |
| 2. | Preparing flower Bed :- Excavating the ground to a required depth of 30 cms, removing & conveying unwanted stuff to a required distance as directed. Filling fresh garden soil/silt & manure in excavated area in 3:1 proportion to a height of 30 cms, Mixing garden soil and manure thoroughly well, leveling watering on previous night. Planting seedling of required annuals 25 cms. Apart Maintaining till well established by watering weeding, Stirring replacing of casualties etc, complete. | **560 sq. mtr** | **Rs. 638/- sq. mtr** | **Rs. 3,57,280/-** |
| | Total | | | **Rs.1,26,86,805/-** |

ई-टेडरींग On-line प्रणालीद्वारे तसेच जाहिर वृत्तपत्रांत प्रसिध्दी देवुन **वार्षिक निविदा** मागविण्यात आल्या होत्या. सदर वार्षिक निविदा स्विकारण्यास मा.आयुक्त सो., यांनी **दि. ०६/०६/२०१५ रोजी मंजुरी** दिलेली सदर निविदेस **मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.४२ दि.१७/०६/२०१५** अन्वये **मान्यता** दिलेली असुन त्यानुसार **मे. गणेशकृपा ट्रांन्सपोर्ट** यांच्या समवेत करारनामा करून **वार्षिक कार्यादेश** देण्यात आलेला आहे.

सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात "उद्याने /दुभाजक सुशोभिकरण करणे" या शिर्षाखाली रु. ४,५०,००,०००/- (रु. चार कोटी पन्नास लाख मात्र) रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त नमुद ठिकाणी लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी अंदाजीत एकुण रु. १,२६,८६,८०५/-/- (रु. एक कोटी सव्विस लाख श्याऐंशी हजार आठशे पाच फक्त) खर्च अपेक्षित आहे. याकामी मागविण्यात आलेल्या वार्षिक निविदेस मा.स्थायी समितीने मंजुरी दिलेली असून मे. गणेशकृपा ट्रांन्सपोर्ट यांना दरमंजुरी बाबत वार्षीक कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार आरक्षण 221, (आदरणीय

बाळासाहेब ठाकरे उद्यान) इंद्रलोक प्रभाग क्र. 31 भाईंदर (पु.) येथे लॉन लावून सुशोभिकरण (Landscaping) करणेकामी वार्षिक मंजुर दराने कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही महासभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१०५, महानगरपालिकेतील सामान्य प्रशासन, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, रुग्णवाहिका, शववाहिनी व इतर वाहनांवर कंत्राट पध्दतीवरील (ठेक्यावरील) वाहनचालक पुरवठा करणेबाबत निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकीची एकुण ६५ वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा.अग्नीशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना, इ. वाहनांवर स्थायी वाहनचालक याची संख्या अपुरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे आवश्यक आहे. सदर वाहनावर मनपाकडुन आवश्यकतेनुसार वार्षिक ठेका पध्दतीने वाहनचालक /ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन १०१४-१५ या आर्थिक वर्षात सदर कामी निविदा मागविण्यात आल्या असुन सदर ठेक्याची मुदत दि.१५/९/२०१५ रोजी संपत आहे. मुदती पुर्व निविदा प्रक्रिया पुर्ण करुन नविन ठेकेदारास कार्यादेश देणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ या वर्षात अंदाजपत्रकिय तरतुदीत वाहन चालक पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०१५-१६ करीता उपलब्ध तरतुद |
|---|---|---|
| १. | अस्थायी अस्थापना ठेका वाहनचालक (सा.प्र/कर/अग्नीशमन,आरोग्य व इतर) | ७५,००,०००/- |
| २. | अग्नीशमन अस्थायी अस्थापना | ७५,००,०००/- |
| | शिल्लक तरतुद | ८५,००,०००/- |

तरी मनपाच्या वाहनांवर, अत्यावश्यक सेवा व इतर विभागात आवश्यकतेनुसार कंत्राटी (ठेका) पद्धतीवरील वाहनचालक/ऑपरेटर पुरवठा करणे तसेच परिवहन विभागास बसेस चालविण्यासाठी बस चालक (H.P.M.V. लायसन्स सहित, आर.टी.ओ. यांचेकडील बॅच, प्राप्त करुन घेतलेले) बस वाहक, तिकीट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी वर्तमानपत्रात व on-line निविदा सुचना प्रसिद्ध करून संबंधितांकडुन निविदा मागविणेच्या प्रस्तावास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत असुन सदरची नविन निविदा प्रक्रीया त्वरीत पुर्ण करुन संबधितास कार्यादेश देण्यांत यावे सदर कामी होणारा कालावधी लक्षात घेता मागील ठेकेदारास ३० दिवसाकरीता मुदतवाढ देण्यात येत असून मागील ठेकेदारास देय असलेली रक्कम अदा करणेपूर्वी संबधित ठेकेदाराकडुन शासकिय कर / निमशासकिय कर (PF, ESI, PT) व इतर देय रक्कमेचा पूर्ण भरणा करुन घेणेत यावा तद्नंतरच संबधित ठेकेदाराची देय रक्कम अदा करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सिमा शाह :-**

माझे अनूमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**सुरेश वाकोडे :-**

आपण जे सिव्हरेजचे प्रॉब्लेम सांगता तो प्रॉब्लेम जॉइन्टली बघीतले तर आपण जॉइन्टली बघून सोल्यूशन काढू.

**प्रमोद सामंत :-**

साहेब पाच वर्षापासून एस.टी.पी. प्लान बंद आहे. त्याच्यावरती गुन्हा दाखल करा.

**सुरेश वाकोडे :-**

एस.टी.पी.नविन कट केला ना तो. तुमचे प्रॉब्लेम असक सॉल्व्ह होणार नाहीत. तुम्ही स्वतः या.

(सभागृहात गोंधळ )

**प्रमोद सामंत :-**

चूकीची माहिती द्यायची नाही.

**सुरेश वाकोडे :-**

तुम्ही प्रत्यक्ष या.

**प्रमोद सामंत :-**

जॉईन्टली कशाला पाहिजे तुम्ही झोपता.

**सुरेश वाकोडे :-**

तुमचे समाधान होण्यासाठी बोलतो.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही स्पसिफिक उत्तर द्या. तुम्ही प्रक्रिया केल्याशिवाय पाणी ओपन गटरमध्ये सोडता की नाही सोडत.

**सुरेश वाकोडे :-**

त्याठिकाणी ट्रीटमेंट केली जाते.

**प्रमोद सामंत :-**

प्रक्रिया केल्याशिवाय पाणी बाहेर जाते की नाही जात.

**मा. आयुक्त :-**

ट्रीटमेंट म्हणजेच प्रक्रिया. मा. महापौर मी स्वतः संबधीत इंजिनियर आणि आपण चौघे जण मिळून पाहणी करू संबधीत शंका दूर करण्यासाठी............

**प्रमोद सामंत :-**

साहेब, धन्यवाद वाकोडे साहेबांनी पून्हा एकदा दूसऱ्या सभागृहात चूकीची माहिती दिलेली आहे. लाखे साहेब असताना पण तिच माहिती दिलेली.

**प्रकरण क्र. १०५ :-**

महानगरपालिकेतील सामान्य प्रशासन, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, रुग्णवाहिका, शववाहिनी व इतर वाहनांवर कंत्राट पध्दतीवरील (ठेक्यावरील) वाहनचालक पुरवठा करणेबाबत निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ७५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकीची एकुण ६५ वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा.अग्नीशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना, इ. वाहनांवर स्थायी वाहनचालक याची संख्या अपुरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे आवश्यक आहे. सदर वाहनावर मनपाकडुन आवश्यकतेनुसार वार्षिक ठेका पध्दतीने वाहनचालक /ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येतो.

सन १०१४-१५ या आर्थिक वर्षात सदर कामी निविदा मागविण्यात आल्या असुन सदर ठेक्याची मुदत दि.१५/९/२०१५ रोजी संपत आहे. मुदती पुर्व निविदा प्रक्रिया पुर्ण करुन नविन ठेकेदारास कार्यादेश देणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ या वर्षात अंदाजपत्रकिय तरतुदीत वाहन चालक पुरवठा करणे कामी खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०१५-१६ करीता उपलब्ध तरतुद |
|---|---|---|
| १. | अस्थायी अस्थापना ठेका वाहनचालक (सा.प्र/कर/अग्नीशमन,आरोग्य व इतर) | ७५,००,०००/- |
| २. | अग्नीशमन अस्थायी अस्थापना | ७५,००,०००/- |
| | शिल्लक तरतुद | ८५,००,०००/- |

तरी मनपाच्या वाहनांवर, अत्यावश्यक सेवा व इतर विभागात आवश्यकतेनुसार कंत्राटी (ठेका) पद्धतीवरील वाहनचालक/ऑपरेटर पुरवठा करणे तसेच परिवहन विभागास बसेस चालविण्यासाठी बस चालक (H.P.M.V. लायसन्स सहित, आर.टी.ओ. यांचेकडील बॅच, प्राप्त करुन घेतलेले) बस वाहक, तिकीट तपासनीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी वर्तमानपत्रात व on-line निविदा सुचना प्रसिद्ध करून संबंधितांकडुन निविदा मागविणेच्या प्रस्तावास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत असुन सदरची नविन निविदा प्रक्रीया त्वरीत पुर्ण करुन संबधितास कार्यादेश देण्यांत यावे सदर कामी होणारा कालावधी लक्षात घेता मागील ठेकेदारास ३० दिवसाकरीता मुदतवाढ देण्यात येत असून मागील ठेकेदारास देय असलेली रक्कम अदा करणेपूर्वी संबधित ठेकेदाराकडुन शासकिय कर / निमशासकिय कर (PF, ESI, PT) व इतर देय रक्कमेचा पूर्ण भरणा करुन घेणेत यावा तद्नंतरच संबधित ठेकेदाराची देय रक्कम अदा करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०६, मिरा भाईंदर शहराची विकास योजना सुधारीत करणेबाबत इरादा जाहीर करणे.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर, नगरपरिषदेची स्थापना दि.१२ जून, १९८५ रोजी झालेली असून दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये झालेले आहे. शहराचे एकूण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी. आहे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील मोर्वा, डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी दि.०१/१२/२००७ पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने अधिसुचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ नुसार (काही भाग वगळून) दि.१३/०५/२०१३ रोजी मंजुर झालेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार विकास योजना लागु झालेनंतर किमान २० वर्षाहुन एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस नियोजन प्राधिकरणाने विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे.

नियोजन प्राधिकरणाने विकास योजना तयार करणे व त्यासंबंधी कार्यपध्दती याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतुदी विहीत करण्यात आलेल्या आहेत. या वैधानिक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

अधिनियमाचे कलम ३८ नुसार नियोजन प्राधिकरणाने विकास योजना अंमलात आलेनंतर वीस वर्षातुन किमान एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार केली पाहिजे व अधिनियमातील विकास योजना तयार करणेचे कार्यपध्दतीबाबत तरतुद अंतर्भुत असलेले कलम २२ ते ३१ मधील तरतुदी अशी सुधारीत विकास योजना तयार करतांना शक्य तितक्या प्रमाणात लागु राहतील.

कलम २३ नुसार नियोजन प्राधिकरणाने आपल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करुन विद्यमान जमीन बाबत नकाशा तयार करणेपुर्वी आपल्या ठरावाद्वारे विकास योजना तयार करणे संबंधी इरादा जाहीर केला पाहिजे व अशा ठरावासह विकास योजनेत समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचे हद्द दर्शविणारा नकाशा शासनाकडे सादर केला पाहिजे. त्याचप्रमाणे नियोजन प्राधिकरणाने इराद्याबाबत आपली अधिसुचना शासन राजपत्र व एक किंवा अधिक स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याबाबत नागरीकांकडून साठ दिवसांचे आत हरकती सुचना मागविणे आवश्यक आहे.

अधिनियमाच्या वर नमुद तरतुदी विचारात घेवुन महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३(१) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी इरादा जाहीर करणेसाठी महासभेपुढे खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून अधिनियमाचे कलम ३८ व २३(१) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्र वगळून) सुधारीत विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करणेस मान्यता देणे.
२) सुधारीत विकास योजनेत सामाविष्ट करावयाचे क्षेत्राच्या नकाशासह ठराव शासनाकडे सादर करणेस मान्यता देणे.
३) सुधारीत विकास योजना तयार करणेच्या इराद्या संबंधी कलम २३ प्रमाणे शासन राजपत्र व स्थानिक वर्तमानपत्रात सुचना प्रसिध्द करुन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे.

तसेच कलम २४ प्रमाणे उक्त क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणे, विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) तयार करणे व त्या क्षेत्रासाठी विकास योजनेचे प्रस्ताव तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करण्यासाठी नगररचना अधिकारी (TPO) नियुक्त करणे.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३(१) मधील तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी इरादा जाहीर करणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

तसेच विकास योजनेमध्ये सामाविष्ट करावयाच्या आरक्षणाबाबत "ज" च्या प्रस्तावानुसारचा दि.१५/०१/२०१५ रोजीच्या महासभेने पारित केलेला ठराव क्र. ६४ मधील मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ४७४, ४७७, ४८१, ४८७ या जागेत प्ले ग्राऊंड, मार्केट हे आरक्षण राखीव ठेवणेबाबतचा ठराव रद्द करण्यात येत असून सदरच्या जागेमध्ये उपलब्ध चटई क्षेत्राप्रमाणे प्रशासकीय इमारत जागा मालकाडून विनामुल्य बांधून घेण्यासाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

साहेब ‘‘ज’’ च्या प्रस्तावाचा उल्लेख केला तस होते. ही विशेष महासभा आहे. ‘‘ज’’ च्या प्रस्तावात एखादा ठराव झाला होता. या विशेष महासभेत ‘‘ज’’ चा प्रस्ताव मागे घेण्यात आला असे काही होते का ? असे होवू शकते का ?

**नरेंद्र मेहता :-**

मागे घेतलेला नाही. महासभेला तीन महिण्यानंतर ठराव रद्द करता येतो ते आम्ही केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम विषय नसताना कस होते.

**आसिफ शेख :-**

आपण ठराव केलेला आहे. आणि आता ठराव रद्द केलेला आहे. मागे जो ठराव केला होता तो आता तुम्ही ठराव वाचला. त्यात रद्द केला आहे. पण एखादा ठराव तो विषय महासभेत घ्यावा लागतो. त्याच्यानंतर तो रद्द होतो.

**नरेंद्र मेहता :-**

मॉडिफिकेशनचा विषय होता हा ही मॉडिफिकेशनचा विषय आहे. आता शौचालय बांधतो तो विषय आपण दिला होता की नाही मग वेगवेगळे आले ना भाईदरला पाहिजे उत्तनला पाहिजे मग ते होते का?
(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

महानगरपालिकेचा डी.पी.प्लान रिव्हाइस झाला. त्याच्याबद्दल आपली काय सुचना असेल तर बोला आपल्याला काय माहिती असेल तर सांगा त्याच्यामध्ये काय करायचे किंवा काय शंका असेल तर विचारा. कारण २०१७ मध्ये डी.पी.प्लान सबमिट करायचा आहे.कारण पूढे कारवाई करण्यासाठी आपली मंजूरी घेतली आहे.

**प्रमोद सामंत :-**

डी.पी.प्लानचे ठीक आहे. आपल्या बॉडीने जाहिर केला. आपण डी.पी.प्लान रिव्हाईज करणार आहोत. कशाप्रकारे करणार आहोत गेल्यावेळेला नियोजन समिती होती. ह्यावेळेला काय करणार त्याची माहिती द्या.

**जुबेर इनामदार :-**

नियोजन समितीमध्ये कोण असणार.

**दिलीप घेवारे :-**

मा. महापौरच्या परवानगीने बोलतो, आपल्या शहराची जी विकास योजना आहे नगरपरिषद असताना १४.५.१९९७ साली मंजूर झालेले आहे. आणि कलम ३८ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ कलम ३८ मध्ये अशी तरतूद आहे की हा विकास आराखडा २० वर्षातून एकदा रिव्हाईज केला पाहिजे. सुधारित केला पाहिजे किंवा ज्यावेळेस शासन सांगेल तेव्हा केला पाहिजे आपण आज ही प्रक्रिया सुरू करतो आज आपण रिव्हाईज जाहिर केला ह्याच्यात नोटिफिकेशन तयार होईल अधि सुचना तयार होईल ती मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषेमध्ये दोन स्थानिक वर्तमानपत्रामध्ये आणि एक राज्यस्तरीय वर्तमानपत्रात देण्यात येईल आणि गॅझेटमध्ये देण्यात येईल. महाराष्ट्र शासन राजपत्रात ज्यादिवशी ते प्रसिध्द होईल तिथून दोन वर्षाच्या कालावधीमध्ये आपल्याला तो प्रसिध्द करायचा आहे .त्याच्यात आपण जिथे काही अतिक्रमण झाले अशी आरक्षण वगळून किंवा रस्त्याची काही अलाईन बघून नविन जागेची आरक्षण टाकून आणि जो शासनातर्फे टाऊन प्लानिंग ऑफिसर नमूद केला जाईल तो आराखडा तयार करेल पूढच्या २० वर्षात किती लोकसंख्या होईल त्याच्यात किती प्रस्ताव लागते किती लागतील दवाखाने, गार्डन,प्ले ग्रांऊन्ड सगळे विचार करून १९९२ साली प्रसिध्द झाला होता आणि १९९७ ला मंजूर झाला होता. नंतर काय झाले की विकास आराखडयाची प्रक्रिया बरेच काळ लांबत चालली ५-५, १०-१० वर्षे ते तयार करायला वेळ लागायचा कधी शासनाकडे वेळ लागायचा २०११ मध्ये शासनाने त्याच्यात बदल केलेला आहे. आता टाईम लिमिट परफेक्ट केला आहे. इथून जाहिर केल्यापासून २ वर्षाच्या आत प्रसिध्द करायचा आहे. प्रसिध्द करून टाऊन प्लानिंग ऑफिसर आपल्यापूढे सादर करणार आहे.की, आम्ही असे केले आहे. त्यानंतर आपली प्लानिंग कमिटी अपोईन्ट घेईल. आपले तीन सदस्य आणि शासनाची चार सदस्य अशी सात लोकांची प्लानिंग कमिटी कलम २८ खाली तयार होईल ते लोकांच्या सुचना हरकती ऐकतील. त्याच्यावर निर्णय घेऊन पुन्हा महासभेसमोर सबमीट करतील दोन वर्षाच्या कालावधीत तो पब्लिश करून पून्हा आपण शासनाकडे कलम ३० अन्वये सादर करून ह्या प्रक्रियेला सहा महिने लागतात. २६ ते २८ मध्ये आणि ३० मध्ये सादर केल्यानंतर शासनानी सहा महिण्याच्या आत त्याला मंजूरी द्यायची आहे. टोटल पिरेड गॅझेटमध्ये आल्यापासून आपल्याला तीन वर्षात पूर्ण करायचे आहे. त्यामूळे वेळोवेळी तुमच्याकडे यायचे आह. आता जाहिर करतो जनतेच्या सुचना हरकती मागवतो. ह्याच्यात एक बदल झालेला आहे. पूर्वी जो १९ गावासाठी विकास आराखडा तयार केला होता. आता ६ गाव कमी झालेली आहेत. मोरवा, डोंगरी,तारोडी, पाली,चौक आणि उत्तन ह्यासाठी एम.एम.आर.डी.ए ने विशेष प्राधिकरण शासनाने दिले असे नियुक्त केले होते. आणि त्याच्यासाठी त्यांनी २०१३ मध्ये वेगळी विकास योजना मंजूर केली आहे. तो भाग आपल्याला घेता येणार नाही. आपली विकास योजनेसाठी हद्द बदलली आहे. त्यानूसार हद्दीचा नकाशा प्रसिध्द करू. त्याचे नोटिफिकेशन प्रसिध्द करू त्यावर कोणास

सुचनेस पाहून आणि टाऊन प्लांनिंग ऑफिसर नियुक्त करून ते विकास आराखडयाचे काम होईल पून्हा आपल्या सभागृहासमोर मला वाटते हीच बॉडी असेल त्यादृष्टीने आपण काम केल तर आपल्यासमोर आम्ही विकास आराखडा सादर करू.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम विकास आराखडा नया बनाने के लिए आज प्रस्ताव पारित हुआ है। इसके पहले मा. आयुक्त आपको याद दिलाना चाहता हूँ की एक पदनिर्मिती का विषय आया था। जिसके अंदर ठराव हुआ था उस ठराव में कुछ लोगो ने सुचना दि थी। उस समय आपने यह कहाँ था की यह ठराव में वैधता नही रह जाएगी जो विषय दिया गया है। उस विषय को पकड के आप ठराव करोगे तो शासन उसको मंजूरी देगी नही तो यह अवैध रुप से होगा ना मंजुरी मिलेगी ना कोई काम होगा। आज जो इरादा जारी करने के लिए यह प्रस्ताव आया है उसके अंदर सन्मा. सदस्य ने जो दुसरा सर्व्हे नंबर डाल करके उसको कॅन्सल करना यह करना कही ऐसा तो नही की यह आज जो ठराव हुआ है इसकी वैधता को प्रश्नचिन्ह खडा हो जाए। क्योंकी यह आपके ही शब्द है तो इस ठराव के अंदर में यह मिक्स करना उसकी वैधता कितनी है। मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त से जवाब चाहिए।

**दिलीप घेवारे :-**

त्याच्यामध्ये असे आहे तो जो ''ज'' चा प्रस्ताव आहे तो विकास योजनेमध्ये आरक्षण टाकण्यासाठी केला होता. वास्तविक त्यावेळा करताना सुध्दा अजेंड्यावर घेऊन ३७ ची कारवाई करणे आवश्यक होते. आपण त्यावेळेस तो ठराव केला आता आपण नविन विकास योजना तयार करतो. त्याच्यामुळे तो त्याला सुसंगत आहे. आता असा ठराव होतो तो ठराव रद्द होत नाही. त्यांनी असेच सांगितले आहे. ठराव वाचताना मी ऐकले आहे की त्या प्रशासकीय इमारतीच मंजूर करावे असे त्यांनी केलेले आहे. त्यामुळे तसा ठराव सुसंगत आहे. पूर्वी सुध्दा तसाच होता की महानगरपालिकेची काही काम तिथे करावी असा होता.

**भगवती शर्मा :-**

आपको मालूम नही है मा. आयुक्त साहेबने जवाब दिया था।

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा त्या आरक्षणामध्ये जो काही टाऊन सेंटर असेल त्यामध्ये आरक्षण प्रस्तावित केली होती. आता जी आरक्षण आहेत त्याठिकाणी इमारत बांधावी आणि आहे त्या डी.पी. मध्ये आपण सर्व फेरबदल करणार आहोत. म्हणून तो विषय आहे आम्ही केला. मा. आयुक्त साहेब आपण चौकशी करुन नियमाप्रमाणे कारवाई करावी.

**भगवती शर्मा :-**

मा. आयुक्त साहेब आपसे पूछा था आपने जवाब दिया था इसके लिए आप बोलते तो अच्छा लगता और हमको भी संतुष्टी होती क्योंकी उस समय आपने ही कहाँ था की विषय छोडके उसमें दुसरा कुछ भी मिक्स किया तो इस ठराव की वैधता नही रहेगी और शासन मंजूर नही करेगा और यह अवैध ठराया जाएगा। यह विषय अलग है और उसके अंदर यह डालना अलग है। इसकी वैधता कितनी है। कही इसके अंदर यह नही हो की हम यह प्रस्ताव भेजे और आप भी उसकी ४५१ करे और हमारे शहर का विकास आराखडा आगे में रखा जाए। इसके लिए मैं आपको पूछता हूँ।

**मा. आयुक्त :-**

लिगल डिपार्टमेंट का ओपिनियन लेके आगे कारवाई करेंगे।

**प्रकरण क्र. १०६ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना सुधारीत करणेबाबत इरादा जाहीर करणे.

**ठराव क्र. ७६ :-**

मिरा भाईंदर, नगरपरिषदेची स्थापना दि.१२ जून, १९८५ रोजी झालेली असून दि.२८ फेब्रुवारी २००२ रोजी नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये झालेले आहे. शहराचे एकूण क्षेत्र ७९.४० चौ.कि.मी. आहे.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९६/८४७/सीआर-१६२/९६/युडी-१२, दि.१४/०५/९७ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून दि.१५/०७/९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१२९८/९४१/सीआर-८९/९८/युडी-१२, दि.२५/०८/२००० अन्वये मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील मोर्वा, डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी दि.०१/१२/२००७ पासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे व मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने अधिसुचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ नुसार (काही भाग वगळून) दि.१३/०५/२०१३ रोजी मंजूर झालेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार विकास योजना लागु झालेनंतर किमान २० वर्षाहुन एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस नियोजन प्राधिकरणाने विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे.

नियोजन प्राधिकरणाने विकास योजना तयार करणे व त्यासंबंधी कार्यपध्दती याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतुदी विहीत करण्यात आलेल्या आहेत. या वैधानिक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

अधिनियमाचे कलम ३८ नुसार नियोजन प्राधिकरणाने विकास योजना अंमलात आलेनंतर वीस वर्षातुन किमान एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस आपल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार केली पाहिजे व अधिनियमातील विकास योजना तयार करणेचे कार्यपध्दतीबाबत तरतुद अंतर्भुत असलेले कलम २२ ते ३१ मधील तरतुदी अशी सुधारीत विकास योजना तयार करतांना शक्य तितक्या प्रमाणात लागु राहतील.

कलम २३ नुसार नियोजन प्राधिकरणाने आपल्या क्षेत्राचे सर्वेक्षण करुन विद्यमान जमीन बाबत नकाशा तयार करणेपुर्वी आपल्या ठरावाद्वारे विकास योजना तयार करणे संबंधी इरादा जाहीर केला पाहिजे व अशा ठरावासह विकास योजनेत समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचे हद्द दर्शविणारा नकाशा शासनाकडे सादर केला पाहिजे. त्याचप्रमाणे नियोजन प्राधिकरणाने इराद्याबाबत आपली अधिसुचना शासन राजपत्र व एक किंवा अधिक स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याबाबत नागरीकांकडून साठ दिवसांचे आत हरकती सुचना मागविणे आवश्यक आहे.

अधिनियमाच्या वर नमुद तरतुदी विचारात घेवुन महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३(१) मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी इरादा जाहीर करणेसाठी महासभेपुढे खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून अधिनियमाचे कलम ३८ व २३(१) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे क्षेत्र वगळून) सुधारीत विकास योजना तयार करणेचा इरादा जाहीर करणेस मान्यता देणे.
२) सुधारीत विकास योजनेत सामाविष्ट करावयाचे क्षेत्राच्या नकाशासह ठराव शासनाकडे सादर करणेस मान्यता देणे.
३) सुधारीत विकास योजना तयार करणेच्या इराद्या संबंधी कलम २३ प्रमाणे शासन राजपत्र व स्थानिक वर्तमानपत्रात सुचना प्रसिध्द करुन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविणे.

तसेच कलम २४ प्रमाणे उक्त क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणे, विद्यमान जमीन वापर नकाशा (ELU) तयार करणे व त्या क्षेत्रासाठी विकास योजनेचे प्रस्ताव तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करण्यासाठी नगररचना अधिकारी (TPO) नियुक्त करणे.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३(१) मधील तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुधारीत विकास योजना तयार करणेसंबंधी इरादा जाहीर करणेसाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

तसेच विकास योजनेमध्ये सामाविष्ट करावयाच्या आरक्षणाबाबत “ज” च्या प्रस्तावानुसारचा दि.१५/०१/२०१५ रोजीच्या महासभेने पारित केलेला ठराव क्र. ६४ मधील मौजे भाईंदर सर्व्हे क्र. ४७४, ४७७, ४८१, ४८७ या जागेत प्ले ग्राऊंड, मार्केट हे आरक्षण राखीव ठेवणेबाबतचा ठराव रद्द करण्यात येत असून सदरच्या जागेमध्ये उपलब्ध चटई क्षेत्राप्रमाणे प्रशासकीय इमारत जागा मालकाडून विनामुल्य बांधून घेण्यासाठी ही महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्री. प्रशांत केळूसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

